# मिळून साऱ्याजणी

पुणे । वर्ष एकविसावे । अंक पाचवा । डिसेंबर २०२१ (मासिक) । पृष्ठसंख्या ६० । किंमत ₹ ५०/-
Miloon Saryajani | Pune | Vol. 21 | Issue 5th | December 2021 (Monthly) | Pages 60 | Price Rs. 50



'ती', 'ते' आणि 'तो'
यांचा स्वत:शी आणि परस्परांशी
नव्यानं संवाद होण्यासाठी...
मासिक नव्हे चळवळ!


उद्याच्या जगात वावरण्याचा
आत्मविश्वास!
MS-CIT मध्ये आता शिका
चौथ्या औद्योगिक क्रांतीची ओळख
Big Data
Augmented Reality
Machine Learning
Virtual Reality
Artificial Intelligence
Internet of Things
Robotics
3D Printing
MS-CIT
आंतरराष्ट्रीय दर्जाचा परिपूर्ण कंप्यूटर कोर्स
mscit.mkcl.org
करियर ओरिएंटेड 'क्लिक्' कोर्सेस
Tally Prime with GST
Advanced Excel
Digital Freelancing
C & C++ Programming
DTP Corel & Photoshop
Mobile Apps Development
Coding
IT Hardware & Networking
Retail Management
Internet of Things (IoT)
BFSI
IT for Teachers
MKCL
KLiC Courses
Gateway to Knowledge Lit Careers
klic.mkcl.org
MKCL
। ज्ञानदीप लावू जगी ।
www.mkcl.org
नव्या दशकातील, नव्या वर्षात
आजच प्रवेश घ्या डिजिटल करियरच्या जगात !
अधिक माहितीसाठी MS-CIT केंद्राशी संपर्क साधा.
8956537496

पानोपानी
डिसेंबर २०२१

# मिळून साऱ्याजणी

www.miloonsaryajani.in | आरंभ–ऑगस्ट १९८९


- **शांतिसंवाद**
  गीताली । ४
- *मायबाप शेतकऱ्याचं चांगभलं*
  **पडीत शेते, ओसाड खेडी अन् सुजलेली शहरे**
  शिवाजी गायकवाड / ६
- **कविता**
  संदीप मोकळे, संदीप पाटोळे / ९
- *स्मरणांजली*
  **कॉ. विलास सोनवणे : कृती आणि विचारांची प्रयोगभूमी असलेला कार्यकर्ता**
  देवकुमार अहिरे / १०
- **बहुजन स्त्रीवाद**
  वंदना महाजन / १४
- *अमन की ओर (प्रेमाला पर्याय नाही)*
  **कथा : 'ग'ची बाधा**
  साहिल कबीर / १८
- *आकलन निबंध स्पर्धेतील विजेता निबंध*
  **गृहिणींच्या घरकामाचं आर्थिक मूल्यांकन – काळाची गरज**
  प्रियांका तुपे / २२
- *झुंजूमुंजू*
  **आम्ही कर्तृत्ववान कशा?**
  श्वेतल परब / २४
- **सच्चा अमेरिकन कवी : वॉल्ट व्हिटमन**
  सुप्रिया सहस्त्रबुद्धे / ३०
- **कविता :** मंजिरी सरदेशमुख, शोभा बडवे, भारती सातपुते, उत्तमकुमार इंदोरे, मुबारक शेख, योगिता पाटील / ३२
- **डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिलांचे अधिकार**
  छाया बेले / ३४
- *मनोगत*
  **आईविषयी..** / प्रतिमा इंगोले / ३६
- *#हॅशटॅग लैंगिकता*
  **लिंग + लिंगभाव = लैंगिकता**
  जमीर कांबळे / ४०
- **# बकेटलिस्ट**
  सरिता सोमाणी / ४३
- *मनोगत*
  **मोहाची फुले** / यशवंत सुरोशे /४४
- **अभिनव भाऊबीज आणि कन्यामेळावा** / गोपाळ खाडे / ४६
- **कविता** / श्रीकांत राऊत / ४७
- **अनपेक्षित देणगी**
  कल्याणी गाडगीळ / ४८
- **आपल्या वाचनालयात**
  अरुण गद्रे, प्रिया रुपाली सुभाष /५१
- **वाचणारे लिहितात** / ५४
- *'मिळून साऱ्याजणी'चं सामाजिक पालकत्व*
  **बालकांचे हक्क आणि सामाजिक पालकत्व** / क्रांती अग्निहोत्री / ५५
  **मानस–शास्त्रीय दृष्टीकोनातून पालकत्व** / रोहिणी पाटील / ५७
- **प्रतिनिधी यादी** / ५८



संस्थापक–संपादक
**स्मृतिशेष विद्या बाळ**

**संपादक** : गीताली वि. मं.

**व्यवस्थापक** : मानसी घाणेकर

**संपादन साहाय्य** : पूनम बा. मं.

**कार्यालयीन व्यवस्थापन** :
प्रगती सावंत, आशा देशमुख

**मुखपृष्ठ चित्र** :
धनंजय गोवर्धने, नाशिक

**अंक जुळणी–अंक मांडणी** :
सारद मजकूर, पुणे

**आतील सुलेखन व चित्रे** :
राजू देशपांडे,
कमलाकर पाटील आणि
इंटरनेटवरून साभार

**मुद्रितशोधन** : हृषीकेश पाळंदे
आणि साऱ्याजणी

**अक्षरजुळणी** : नीला देशपांडे

**सल्लागार** : दीपा देशमुख,
जमीर कांबळे

**माध्यम संवादक** :
रसिका भट लिमये
मो. ९६५७४७०९२०

**कार्यालयीन पत्ता** :
फ्लॅट नं.१०१, पहिला
मजला, नचिकेत को–ऑप. हौ.
सोसायटी, प्रभात रोड, गल्ली
क्रमांक ४, एरंडवणा,
पुणे–४११००४

**कार्यालयीन संपर्क** :
०२०–२५६५३९३८, ७४४७४४९६६४
saryajani@gmail.com

**कार्यालयीन वेळ** :
सोम. ते शुक्र. दु. १२ ते ५

वार्षिक वर्गणी
व्यक्तीसाठी ५०० रु.
संस्थेसाठी ७०० रु.
(अधिक तपशील पान क्र. २१ वर)

निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्टच्या मालकीचे मिळून साऱ्याजणी मासिक मुद्रक, प्रकाशक गीताली वि. मं. यांनी युनिक ऑफसेट, १५२३, सदाशिव पेठ, आनंदशिल्प, पुणे ४११०३० येथे छापून फ्लॅट नं.१०१, पहिला मजला, नचिकेत को–ऑप. हौ. सोसायटी, प्रभात रोड, गल्ली क्रमांक ४, एरंडवणा, पुणे ४११००४ येथे प्रसिद्ध केले. **संपादक : गीताली वि. मं.**

'MiloonSaryajani' Monthly is owned by Niramaya Public Charitable Trust, Printed and Published by Geetali V. M., Printed at Unique Offset, 1523, Sadashiv Peth, Anandshilp, Pune 411030 and Published at Flat No.101, 1st floor, Nachiket CHS, Prabhat Road, Lane No.4, Erandawana, Pune 411004. **Editor - Geetali V. M.**


महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने या नियतकालिकास अनुदान दिले असले तरी या नियतकालिकातील लेखकांच्या विचारांशी मंडळ व राज्य शासन सहमत असेलच असे नाही. अंकात प्रसिद्ध केलेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.

## शांतिसंवाद



प्रिय वाचक,

जयभीम!

२०२१ या वर्षाला निरोप देताना करोना महामारीलाही अखेरचा सलाम म्हणता आलं, तर किती बरं वाटेल नाही! गेल्या वर्षांत 'साऱ्याजणी'चे सर्व अंक प्रकाशित करू शकलो, एवढं एक समाधान मानण्याजोगं आहे. बाकी अनेक आघाड्यांवर निराशाजनक, उद्वेगजनक परिस्थिती आहे. शेतकरी आंदोलनाला वर्ष होत आलं – 'आम जनतेला आणि शेतकऱ्यांना लुटण्याची परवानगी देणारे तीन काळे कायदे रद्द करा' अशी त्यांची रास्त मागणी आहे, पण त्याकडे दुर्लक्ष केलं जातंय, त्यांनाच दोषी–गुन्हेगार ठरवलं जात आहे. शहरी मध्यम – उच्चमध्यम वर्गाला शेतकऱ्यांचं दु:ख कळत नाही. उलट शेतकरी आळशी आहे, जोडधंदा करत नाही, आदी आरोप केले जातात. शहरी विरुद्ध ग्रामीण अशी देशात फूट पाडून 'फोडा आणि झोडा' ही राजकीय अर्थनीती सर्व देशवासियांसाठी घातक आहे. परस्पर सहकार्य करण्यासाठी एकमेकांना संवेदनशीलतेनं समजून घ्यायला हवं. त्यासाठी 'साऱ्याजणी'चे स्नेही शिवाजी गायकवाड जे स्वत: शेती करतात, त्यांचा या अंकातला सलामीचा लेख जरूर वाचा. शहरी मध्यम– उच्च मध्यम वर्गीय लोक स्वार्थप्रिय नसून समाजप्रिय आहेत, हे सिद्ध करण्याची वेळ आली आहे, हे लक्षात घेऊ या.

पेट्रोल, डिझेल, घरगुती गॅस यांच्या वाढत्या आकाशाला भिडणाऱ्या किमतींमुळे इतरही वस्तूंच्या किंमती वाढत आहेत. गरिबांना अक्षरश: अन्न शिजवणं अवघड झालं आहे. राजधानीच्या शहरात 'काळी आणीबाणी' येऊन परत टाळेबंदीचं गरिबांच्या पोटावर पाय आणणारं संकट उभं ठाकलं आहे. हवामान बदलाचे नानाविध भीषण आविष्कार सर्वत्र थैमान घालत आहेत. घराघरात त्याचे दुष्परिणाम दिसताहेत, तरी आपण 'थंड – सुस्त' राहणार का? असा प्रश्न आ वासून उभा आहे. लाखो वाहनांमधून होणारं वाढतं कर्बोत्सर्जन, पर्यावरणीय नियम न पाळणारे उद्योगधंदे, घराघरातले, दुकानांमधले, कारखान्यांमधले जनरेटर, एसी, प्लास्टिक–
थर्माकोलचे डोंगर असे न संपणारे जगड्व्याळ प्रश्न त्यावर मी एकटी / एकटा काय करणार हे आपलं पळवाट शोधणारं उत्तर! हे सर्व आता बास्स्... 'इनफ इज इनफ' असं म्हणत आता निदान आपापल्या पातळीवर जीवनशैलीत बदल करू या. भले ते अगदी छोटे–छोटे असतील...
एकमेकांना सांगत राहू या.

शाळा–महाविद्यालयं अजूनही अनिश्चितीच्या भोवऱ्यात गरगरत आहेत. देशाचं भवितव्य घडवणाऱ्या या पिढ्यांवर करोना महासाथीचे आणि त्यातून वाढत जाणाऱ्या विषमतेच्या महासंकटाचे काय काय विपरीत परिणाम होतील, याचा अभ्यास करून तज्ज्ञ मंडळींनी त्यावर तातडीनं तोडगा काढण्याची निकड आहे. देशातली राजकीय–सामाजिक–सांस्कृतिक–आर्थिक परिस्थिती हाताबाहेर चालली आहे, असा इशारा त्या त्या क्षेत्रातली तज्ज्ञ मंडळी देताहेत. समाजातलं वाढतच चाललेलं ध्रुवीकरण, हिंसा, क्रौर्य, स्त्रिया–दलित– आदिवासी, अल्पसंख्यांकांवर होणारे अत्याचार यांच्या बातम्या ऐकून – वाचून मन अस्वस्थ होतं. निराश, उद्विग्न, हताश होऊन तर चालणार नाही, मग यावर उपाय काय?

उपाय आहे – संविधान संरक्षण आणि संवर्धन. २६ नोव्हेंबरला संविधान दिन! 'आम्ही भारताचे लोक... यांनी हे संविधान अंगिकृत आणि अधिनियमित करून स्वत: प्रत अर्पण करण्याला बाहत्तर वर्षे पूर्ण झाली.' या बाहत्तर वर्षांत अनेक सरकारं आली आणि गेली. संविधानाच्या प्रास्ताविकातला शब्द न् शब्द अमूल्य आहे. एक एक शब्द त्याच्या अर्थासहित वास्तवात

उतरवण्यासाठी असंख्य भारतीयांनी अक्षरश: आपल्या रक्ताचं पाणी करत आयुष्यं वेचली आहेत. अजूनही वेचत आहेत. पण... सर्व नागरिकांना सामाजिक, आर्थिक व राजनैतिक न्याय मिळतोय का? याचं उत्तर काय आहे, हे सांगायची गरज नाही. सकारात्मक उत्तर असतं, तर आज लोकशाही असणाऱ्या भारतात जात – धर्म – वंश – लिंग – भाषा – प्रादेशिकता यानुसार समाजात उतरंड निर्माण झालेली दिसली नसती. या सर्वांवर आधारित अस्मितांचं ध्रुवीकरण करत तोड–फोडीचं राजकारण केलं गेलं नसतं. व्यक्तिगत स्वार्थ साधणारं धन–दांडग्यांचं गुंडा–पुंडांबरोबर साटंलोटं करणारं लोककल्याणाला तिलांजली देणारं राजकारण लोक थंडपणे बघत बसले नसते. राजकारण गलिच्छ, गुंडा–पुंडांचं तिथं सुशिक्षित, सभ्य–सज्जन माणसांनी जाऊ नये, राजकारणाचा वाराही नको त्यानं भ्रष्ट व्हायला होतं इ. इ. 'सुविचार' तथाकथित सज्जन – सभ्य, मध्यम – उच्च मध्यम वर्गाच्या नसानसांत भिनल्याचे हे सर्व दुष्परिणाम आहेत, हे लक्षात घेऊ या.

आणि... विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा व उपासना यांचे स्वातंत्र्य, दर्जाची व संधीची समानता याविषयी तर काय आणि कसं बोलावं? गेले अनेक दिवस गाजत असलेलं 'पेगॅसस प्रकरण' यासंदर्भात अतिशय बोलकं आहे. ते आपण नीटपणे जाणून घ्यायला हवं. कारण स्वतंत्र विचार करण्याचं स्वातंत्र्य असल्याशिवाय नागरिकांचे कुठलेही हक्क–अधिकार प्रत्यक्षात उपभोगता येऊ शकणार नाहीत. 'पेगॅसस प्रकरणा'त यावरच घाला घातला जातो आहे. नागरिकांना सक्षम करण्याऐवजी त्यांच्यावर पाळत ठेवून ताबा मिळवण्याचा प्रयत्न विविध प्रकारानं, मार्गानं होतोय का असा प्रश्न राजकीय, सामाजिक, आर्थिक क्षेत्रातले तज्ज्ञ गेली अनेक वर्ष विचारत नागरिकांना सजग करण्याचा प्रयत्न करताहेत पण 'झोपेचं सोंग घेतलेल्याला जागं करता येत नाही' म्हणतात, ते काही खोटं नाही. आपण खरंच झोपलो आहोत, ग्लानीत आहोत की झोपेचं सोंग घेऊन निपचित पडलो आहोत? याचं प्रामाणिक उत्तर देण्याची हीच ती वेळ आहे. आणि... काहीही उत्तर आलं तरी 'झालं गेलं गंगेला मिळालं' म्हणून झडझडून उठून संविधानातला शब्द न् शब्द वास्तवात जिवंत होण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा करायला हवी अन्यथा नंतर पश्चात्ताप करून हाती काही लागणार नाही.

दहा देशांमधल्या सोळा माध्यम संस्थांनी उजेडात आणलेलं पेगॅसस प्रकरण संसदेत खूप गाजलं. खरा मुद्दा कायदेकानू, न्यायालयीन चौकशा किंवा न्यायव्यवस्था व सरकार यांच्या अधिकारांचा संघर्ष एवढा मर्यादित नसून सत्ताधाऱ्यांनी लोकशाही मूल्यांवर श्रद्धा ठेवून त्याचं प्रामाणिक पालन करण्याचा आहे. केंद्र सरकारला त्याचीच पत्रास नसेल तर त्या 'उधळलेल्या उडत्या घोड्याला' (पेगॅसस) सुप्रीम कोर्ट तरी लगाम घालू शकणार का असा प्रश्न सजग नागरिकांच्या मनात होता. त्याला २८ ऑक्टोबरच्या सुप्रीम कोर्टाच्या निर्णयानं सकारात्मक उत्तर दिलं, ही लोकशाहीसाठी अतिशय महत्त्वाची घटना आहे. राष्ट्रीय सुरक्षेबाबत कोणतीही तडजोड कधीच करता कामा नये, पण त्याची ढाल करून सरकारने विरोधकांना वेठीस धरण्याचे आणि समाजाला जेरीस आणण्याचे उद्योग करू नयेत. असं होताना आम्ही मूकदर्शक बनू शकत नाही, असं सुप्रीम कोर्टानं ठणकावून सांगितलं. न्यायालयाच्या या ठाम भूमिकेनं अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि व्यक्तिगत खासगीपणा या घटनात्मक हक्क आणि अधिकारांची बूज राखली आहे. व्यक्तीच्या खासगीपणावर होणाऱ्या प्रत्येक अतिक्रमणाला तार्किकता आणि घटनात्मक आवश्यकतेच्या कसोटीवर सिद्ध व्हावं लागेल. घटनात्मक कायद्याशिवाय अशा प्रकारच्या अतिक्रमणाला मान्यता दिली जाऊ शकत नाही. जीवन आणि स्वातंत्र्याचा अधिकार सर्वोच्च आहे. त्यामध्ये संतुलन असणंही आवश्यक आहे. हेरगिरीद्वारा माध्यमांना लक्ष्य केल्यास त्यांच्या अचूकतेवर आणि विश्वसनीय माहिती पुरवण्याच्या क्षमतेवर परिणाम होईल, ही न्यायालयानं व्यक्त केलेली चिंता लोकशाहीच्या चौथ्या स्तंभाचं योगदान आणि त्याची नितांत आवश्यकता नि:संशय अधोरेखित करणारी आहे. सुप्रीम कोर्टाचा हा निकाल पेगॅसस आणि हेरगिरी किंवा पाळत या पुरताच मर्यादित नाही, तर एकूण लोकशाही मूल्यांच्या संवर्धनासाठी अतिशय महत्त्वपूर्ण आहे.

सरकारने पेगॅससची सेवा घेतली काय? असेल तर कोणता कायदा, नियम, मार्गदर्शक तत्त्वं, संकेत समोर ठेवून आणि कोणाच्या आदेशाने हे सगळे केले? त्यामुळे देशवासियांच्या अभिव्यक्ती स्वातंत्र्य, खासगीपणा यांचा भंग झाला आहे का? २०१९ पासून पाळतीचे आरोप होत आहेत, त्याबाबत सरकारने काय केलं? इ. इ. महत्त्वाच्या प्रश्नांची उत्तरं मिळवण्याचं काम सर्वोच्च न्यायालयानं नेमलेल्या कमिटीनं करणं अपेक्षीत आहे. ठरलेल्या मुदतीत ते निर्भीडपणे होतंय की नाही, यावर लक्ष ठेवण्याची आपली जबाबदारी आहे हे लक्षात ठेवूया.

डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या महापरिनिर्वाण दिनी त्यांच्या कार्यकर्तृत्वाला आदरांजली वाहतांना संविधानाचं पालन करण्याचा निर्धार करूया.

जयभीम!

स्नेहांकित

१८/११/२०२१

मायबाप शेतकऱ्याचं चांगभलं

# पडीत शेते, ओसाड खेडी अन् सुजलेली शहरे

शिवाजी गायकवाड

**जून २०20 मध्ये सरकारने जाहीर केलेल्या तीन कायद्यांच्या विरोधात दिल्लीच्या वेशीवर सुरू झालेल्या शेतकरी आंदोलनाला एक वर्ष पूर्ण होत आलं. शेतकऱ्यांचा हा संघर्ष मध्यमवर्गीय आणि शहरी लोकांच्या संवेदनक्षमतेला आव्हान देतो का? हे कायदे शेतकऱ्यांच्या आणि पुढे अर्थातच आपल्या सर्वांच्या हिताचे नाहीत, हे समजावून सांगणारा या अंकातला शेतकरी आंदोलनाला सलाम करणारा हा लेख.**

पायात काटा घुसला तर डोळ्याात टचकन् पाणी येते. संवेदनक्षमता शाबूत असल्यामुळे ही क्रिया झटकन् घडते. समाजात अन्याय-अत्याचार झाल्यावर आपल्या मन-मेंदूवर परिणाम होतो. जर आपल्या मन-मेंदूवर काहीच परिणाम होत नसेल, तर आपली संवेदनक्षमता संपली, असे आपण मान्य करायला हवे. आपली संवेदनक्षमता बोथट झालीय का? संवेदनक्षमतेला महारोग तर झाला नाही ना? असे प्रश्न आपल्याला पडायला हवेत. असे प्रश्न आपल्या डोक्यात निर्माण होणे म्हणजे आपले माणूसपण शाबूत असणे आहे.

मानवी जीवन परस्परावलंबी आहे. काही लोक खेड्यापाड्यात राहतात, म्हणूनच आपण शहरात राहू शकतो. शहरातील लोक आपल्या वस्तू व सेवा घेतात, म्हणून खेड्यापाड्यातील लोक चार घास खाऊ शकतात. खेड्यापाड्यातील लोक विरुद्ध शहरी लोक अशी 'फोडा व झोडा' नीती घातक आहे. शहरी मतदार खूश ठेवण्यासाठी ग्रामीण जनतेची लूट करण्याचे धोरण म्हणजे सर्वांचेच मरण आहे.

गेल्या ३० वर्षांत आपल्या प्राणप्रिय देशातील सुमारे दहा लाख शेतकऱ्यांनी आत्महत्या करून प्राणत्याग केला. दरवर्षी १०-१२ लाख शेतकरी शेती पडीत ठेवून शहरात स्थलांतरित होत आहेत. खेडीपाडी ओस पडत असून शहरे सुजत आहेत. शहरेही आता चांगल्या स्थितीत नाहीत. जगातील प्रदूषित शहरांच्या यादीत पहिली १० शहरे भारतातील आहेत!

वायू प्रदूषण, ध्वनी प्रदूषण, नरकसदृश अस्वच्छता, अपुरे व अशुद्ध पाणी, कोलमडलेली सार्वजनिक दळणवळण व्यवस्था, आरोग्यदायी वातावरण नसणे, वाढत्या झोपडपट्ट्या, अत्याधुनिक अशी संघटित गुन्हेगारी इ. प्रश्नांनी शहरे त्रस्त आहेत.

खेडी व पाडी ओस पडत असल्यामुळे शहरे सलायनवर आहेत. शहरी जनजीवन सुरळीत राहण्यासाठी ग्रामीण जनतेचे स्थलांतर रोखणे आवश्यक आहे. शहराकडे स्थलांतर म्हणजे विकास हा आधुनिक भ्रम आहे. स्थलांतर न करता मानवाला व्यवस्थित जगता येईल, असा विकास म्हणजे स्थायी विकास होय. स्थायी विकास केला तरच खेडीपाडी व शहरे सुखात जगतील.

कोरोना काळात टाळेबंदी असताना जून २०२०मध्ये केंद्र सरकारने तीन अध्यादेश जारी केले. बहुराष्ट्रीय कंपन्या व बड्या भांडवलदारांनी मागणी केली म्हणूनच सरकारने कृषीकायदे केले आहेत. त्यामुळेच कोट्यवधी शेतकऱ्यांचे म्हणणे केंद्र सरकार मान्य करत नाहीत. बहुराष्ट्रीय कंपन्या व बड्या भांडवदारांचा दबाव असल्यामुळेच मोदी सरकारने राज्यघटनेने राज्यसरकारांना व जनतेला दिलेले अधिकार पायदळी तुडवले आहेत. दिल्लीच्या वेशीवर बसलेले शेतकरी आपले लोकशाही हक्क वाचवण्यासाठी संघर्ष करत आहेत. शेतकरी, शेतमजूर, कामगार जात्यात आहेत. पण बाकीच्या सर्वांनी आपण सुपात आहोत, हे विसरता कामा नये. आपण सर्वांनी दिल्लीच्या वेशीवर आंदोलन करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न समजावून घ्यायला हवेत. सहानुभूती द्यावी तसेच शक्य ते सहकार्यही करायला हवे.

**शेतकऱ्यांची तीन कृषी कायद्यांविरोधातील भूमिका :**

२० सप्टेंबर २०२० रोजी केंद्र सरकारने घाईघाईत तीन कृषी कायदे संमत केले. हे कायदे शेतकरीविरोधी

असे काळे कायदे आहेत. या कायद्यांचे दुष्परिणाम थोडक्यात पुढीलप्रमाणे सांगता येतील :

**१. शेतकरी उत्पादने, व्यापार व वाणिज्य (प्रोत्साहन व सुविधा) कायदा २०२० :**


या कायद्यात शेतमालाच्या विक्रीसंबंधी तरतुदी केलेल्या आहेत. कृषी उत्पन्न बाजार समितीच्या बाहेरही शेतमालाची खरेदी–विक्री करण्याचा अधिकार देण्यात आला आहे. देशभरात कुठेही शेतमाल नेता येईल अशीही तरतूद आहे. विक्री व वाहतूक खर्च कमी करून शेतकऱ्यांना अधिक भाव मिळावा म्हणून ही तरतूद केली, असे सरकारचे म्हणणे आहेत. तसेच इ–ट्रेडींगसाठी व्यवस्था उपलब्ध करून देणे इ. तरतुदी आहेत.

वास्तवात हा कायदा अमलात आला तर शेतमालाचे किती उत्पादन झाले, शेतमालाची किती खरेदी–विक्री झाली याची कुठेही नोंद होणार नाही. त्यामुळे भ्रष्टाचार वाढेल; खरे तर कृषी उत्पन्न बाजार समित्या बंद करण्याऐवजी त्यांच्यातील दोष दूर करायला हवे. आडते, व्यापारी, व बाजार समितीतील लोक आता बेकार होतील. तसेच व्यापाऱ्यांबरोबर कृषी उत्पन्न बाजार समितीबाहेर केलेल्या व्यवहारात शेतकऱ्यांची लूट होण्याची शक्यता आहे.

**२. शेतकरी (सशक्तीकरण व संरक्षण) आश्वासन आणि कृषी सेवा करार कायदा २०२० :**


बहुराष्ट्रीय कंपन्या व भांडवलदारांना शेतकऱ्यांबरोबर करार करण्याचा अधिकार या कायद्याद्वारे देण्यात आला आहे. करार केल्यावर वाद झाल्यास शेतकऱ्यांना न्यायालयात न जाता महसूल यंत्रणेकडे न्याय मागण्यासाठी जाण्याचे बंधन या कायद्यात आहे. भ्रष्ट महसूल यंत्रणा शेतकऱ्यांना










न्याय न देता बहुराष्ट्रीय कंपन्या व भांडवलदारांना झुकते माप देईल असे शेतकऱ्यांना वाटते.

जमीनधारणा कायदा आल्यामुळे जमीनदारी गेली. आता या नव्या कायद्याने जमीनदारी परत येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. कारण शेतकऱ्यांची मुले शेती करण्याऐवजी करार करून जमिनीची मालकी भांडवलदारांना देतील. भांडवलदारही जमिनी घेतील. कारण कायद्याने जमीनधारणेवर टाकलेली मर्यादा काढलेली आहे. यामुळे शेतकरी भूमिहीन होऊन ग्रामीण भागात बेकारी, गुलामी, शोषण व विषमता वाढेल, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

**३. अत्यावश्यक वस्तू (दुरुस्ती) कायदा २०२० :**

१९५५मध्ये अमलात आलेल्या कायद्यात मोदी सरकारने बदल करून हा कायदा आणला आहे. १९५५च्या कायद्यामध्ये सरकारला शेतमालाची साठेबाजी व शेतमालाच्या किमतीवर नियंत्रण ठेवण्याचा अधिकार होता. हा अधिकार मोदी सरकारने बहुराष्ट्रीय कंपन्या व बड्या भांडवलदारांना बहाल केला आहे. परिणामत: हंगामात सर्व भांडवलदार संघटित होऊन शेतमालाच्या किमती कमी करतील. कमी भावात शेतमाल घेऊन त्याचा साठा करतील. शेतमालाची साठेबाजी करून मक्तेदारी निर्माण करतील आणि ग्राहकांनाही लुटतील तसेच शेतकऱ्यांना हमीभाव मिळणार नाही.

थोडक्यात, शेतकऱ्यांना कमी भाव व ग्राहकांना जास्त भाव देऊन शेतमाल घ्यावा लागेल. अन्नधान्य, डाळी, कडधान्य, तेलबिया, कांदा व बटाटा अत्यावश्यक वस्तूंच्या यादीतून केंद्र सरकारने वगळले आहेत. यामुळे अन्नसुरक्षा संपुष्टात येऊन गरिबी व विषमता वाढेल.

तसेच साठेबाज मोकाट सुटतील, असे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे.

शेतकऱ्यांची मागणी नसूनही सरकारने २०२०मध्ये तीन कायदे केले. या कायद्यामुळे शेतकऱ्यांना मिळणारा हमीभाव गायब होणार आहे. तसेच आम जनतेची अन्न सुरक्षा बहुराष्ट्रीय शेठजींच्या हातात जाणार आहे. आणि म्हणून दिल्लीच्या वेशीवर बसलेले शेतकरी म्हणत आहेत की, तीन काळे कृषी कायदे रद्द करा व शेतमालाला हमीभाव देण्यासाठी नवा कायदा करा. या दोन मागण्यांवरच शेतकरी ठाम आहेत.

शहरी नागरिकांनी सजग होऊन ग्रामीण जनतेला आधार देणे आवश्यक आहे. संवेदनक्षम होऊन ग्रामीण जनतेला प्रश्न सोडवण्यासाठी मदत केली पाहिजे. 'जगा आणि जगू द्या' अशी आपली भूमिका असायला हवी. ग्रामीण जनतेचे प्रश्न आपलेच प्रश्न आहेत असा विचार शहरी लोकांनी करणे आवश्यक आहे. शहरी लोकांनी खेड्यापाड्यातील जनतेच्या प्रश्नांसंदर्भात सहानुभूतीने विचार करायला हवा. तसेच शक्य ती मदत करणेही शहरी लोकांची नैतिक जबाबदारी आहे. ग्रामीण भारत विरुद्ध शहरी इंडिया असे विभाजन होता कामा नये. आणि म्हणून शेतकरी, शेतमजूर, कामगार यांचे प्रश्न शहरी लोकांनी व मध्यमवर्गीयांनी सहानुभूतीने समजून घ्यायला हवेत. कष्टकरी लोकांच्या प्रश्नाकडे अलिप्त होऊन पाहाणे अमानुषपणाचे आहे. २६ नोव्हेंबर २०२१ पासून दिल्लीच्या वेशीवर लाखो शेतकरी अहिंसक संघर्ष करत आहेत. दिल्लीच्या वेशीवर आजवर ३१५ शेतकरी हुतात्मा झाले आहेत!

९७% खासदार करोडपती आहेत. त्यामुळे 'काळे कृषी कायदे' अगदी सहज संमत झाले आहेत. अन्यायाच्या विरोधात लढणाऱ्या (शेतकऱ्यांना नैतिक बळ देण्याचे काम शहरी नागरिकांनी करणे ही काळाची गरज आहे.) नवभांडवलशाहीच्या कचाट्यातून कुणीही सुटणार नाही. याचे भान कायम ठेवून आपण वर्तन करायला हवे. (शेतकरी व कष्टकऱ्यांना साथ द्यायला हवी. ग्रामीण भारतातील लोक शेतकरी आंदोलनाला साथ देत आहेत. शहरी इंडियात मात्र सर्व काही सामसूम आहे. त्यामुळे ग्रामीण भारत विरुद्ध शहरी इंडिया असे विभाजन होण्याचा धोका निर्माण झाला आहे.)

खेड्यापाड्यातील जगणे यातनामय झालेले आहे. तरुणाईचा ओढा शहराकडे आहे. पन्नाशी पार केलेले लोकच शेती करत आहेत. शेतकऱ्यांच्या मुलांची सोयरिक नको म्हणणाऱ्यांची संख्या वाढतेच आहे. प्रत्येक खेड्यात पाच-पन्नास 'घोड-नवरदेव' आहेत. चाळिशी ओलांडणारे अविवाहित तरुण हा 'घोड-नवरदेव'. तरुणाई परेशान व शेती ओस पडण्याच्या मार्गावर आहे. कमी व अशुद्ध पाणी, तोकडे उत्पन्न, बेरोजगारी, अपुरा व अवेळी वीजपुरवठा, खराब रस्ते, शिक्षण व आरोग्य सुविधांची वानवा इ. कारणांमुळे ग्रामीण जनतेचा ओढा शहराकडे आहे. खेड्यांचा देश आता इतिहासात जमा होण्याच्या मार्गावर आहे. बकाल शहरांचा व ओसाड गावांचा भारत देश आपण निर्माण करत आहोत. 'उत्तम व्यापार, मध्यम नोकरी व कनिष्ठ शेती' असे वास्तव आपण साकार केले आहे.

मोदी सरकारने ऐन सुगीच्या दिवसात नोटबंदी केली. त्यामुळे व्यापाऱ्यांची चांदी झाली. शेतमालाची खरेदी स्वस्तात करून त्यांनी अक्षरशः लूट केली.

कधी कधी ३ रु. किलो मोसंबी, एक रुपया किलो टोमॅटो, दिड रुपया किलो पत्ता कोबी, १८ रु. लिटर दूध असा भाव शेतकऱ्यांना मिळतो! इतकेच नाही, तर कधी कधी वजा भाव येतो. शेतमालाची किंमत इतकी कमी येते की, वाहतूकखर्च पदरमोड करून करावा लागतो. पडलेले भाव ऐकून आपल्या मेंदूला शॉक बसायला हवा. नोटबंदी व जी.एस.टीमुळे तर शेतकरी गर्भगळीत झाले. अवजारे, खते, बियाणे, डिझेल, पेट्रोल, शेतमजूरी इ. वाढ झाल्यामुळे उत्पादन खर्च वाढला आहे. तशात प्रदूषणामुळे उत्पादकताही घटली असल्याने शेती व्यवसाय पूर्णतः आतबट्ट्याचा व्यवसाय झाला आहे.

परिणामतः शिवारातील झाडे, वाळू, माती व पाणी विकून शिवारं बोडकी केले जात आहेत. तरुणाई तर शेती विकायला एका पायावर तयार आहे. गावांचे शिवार उजाड होत आहे. गावाच्या गंगेची गटार झाली आहे. कष्टाचा मोबदलाही मिळत नाही, म्हणून शेती पडीत ठेवणारे वाढत आहेत.

गोवधबंदीचा फटका हा शेतकऱ्यांनाच बसला. बिचारे तोंड दाबून बुक्याचा मार सहन करत आहेत. या भाकड जर्सी गायीचे शेतकऱ्यांला ७-८ हजार रु. मिळत होते त्या गाईचे आता मोठ्या मुश्किलीने १४००-१५०० रु. मिळतात. गोवध बंदीतही गोवध सुरू आहे. 'गो-गुंड' मजा मारत आहेत. म्हातारे आई-बाप न सांभाळणारे लोक म्हाताऱ्या जर्सी गायी कशा सांभाळतील?

जर्सी गायीची वासरे १५००-२००० रु. विकली जात असत. आता फुकट दिली जातात. हप्ते देणे-घेणे व गोवध करणे सुरू आहे. शेतकरी व गोपालक सोडून बाकीचे मजा मारत आहे. गोवध बंदी नंतर देशभरात गोधन वाढायला हवे होते, पण वाढले नाही. असे का? असा

प्रश्न सर्व स्तरातून विचारला जाणे आवश्यक आहे.

शेतमालाचा उत्पादन खर्च जास्त व शेतमालाला मिळणारी किंमत कमी. सतत येणारी अस्मािी व सुल्तानी संकटे आता असह्य झाली आहेत. 'शेती केली तर चावते व सोडली तर पळते' अशा भयंकर पेचात शेतकरी अडकल्यामुळे जगणे मुश्कील झाले आहे. दरवर्षी १०–१२ लाख लोक शेती सोडून शहरात स्थलांतर करत आहेत. शहरातील लोकसंख्येचा भार वाढतो आहे.

थोडक्यात, बहुराष्ट्रीय कंपन्या व भांडवलदार संघटित होतील. भाव देऊन खरेदी करतील. साठेबाजी करून मक्तेदारी निर्माण करून ग्राहकाकडून अधिक किंमत वसूल करतील. शेतकऱ्यांना हमी भाव देणारी यंत्रणा मोडीत टाकली जाईल. सार्वजनिक वितरण व्यवस्था मोडीत काढल्यामुळे अन्नसुरक्षा धोक्यात येईल. आम जनतेला आणि शेतकऱ्यांना लुटण्याची परवागी देणारे हे कायदे रद्द करा, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे.

आम्ही मध्यमवर्गीय लोक स्वार्थप्रिय प्राणी नसून समाजप्रिय मानव आहोत. आम्ही स्वार्थात मशगुल राहणार नाही. आम्ही मोहात पडून दु:खी होणार नाही. कारण आमची संवेदनक्षमता शाबूत आहे. शेतकरी व कष्टकरी लोकांना मदत करणे ही आमची नैतिक जबाबदारी आम्ही निभावणार आहोत. अशी ठाम भूमिका शहरी लोकांनी घेतली तरच परस्परावलंबी मानवी जीवन सुखी व समृद्ध होईल.

***शिवाजी गायकवाड,*** *संगमनेर.*
*मोबाइल : ९९२१३३५८८८.*

•••

## महिला कास्तकार...

शेतकऱ्याची लेक मी
शेतकरीच माझा धनी
बालपणापासून कष्ट
तरी असते आनंदी मनी


पिकत नाही सुगी
तरी कष्टाची पेरणी
करेल पाऊस कृपा
भिजेल सारी धरणी

उन्हातान्हात राबतो
पोटाची भरण्या खळगी
कामे सुटतात तेव्हा
जेव्हा बांधतात थडगी

तूच असते माझी आशा
खांद्याला लावते खांदा
कष्टाला नाही कधी सीमा
तरीही खाण्याचा वांदा

तूच आहेस अन्नदात्री
तूच आहेस सावित्री
तुझ्याच मुळे भाकर
याची हमखास खात्री

***संदीप पाटोळे,*** *नंदुरबार*
*मोबाईल : ९४२१८९०७७०*



## रामू

रामूचा बाप रब रब राबतो
रामूची मे दुसऱ्याच्या
शेतात कापूस वेचते
रामू शाळा शिकतो
माय म्हणते महा लेक
मोठा अधिकारी होणार
माझ्या नवऱ्याचं
राबणं आता जाणार
आम्ही वर्षातून एकदा
पुरणपोळी खातो
मग मी रोज पूर्ण खाईन
लेक शिकून अधिकारी होतो
अमेरिकेत जातो आणि
अमेरिकेच्या पोरी संग लगीन
करतो
मे बाप म्हातारी होतात
व लेकाचं नाव घेऊन तडफडतात
शेवटी रामू रामू म्हणून
आपला जीव सोडतात ...

***संदीप मोकळे***
*मु.पो.वडीगोद्री, ता.अंबड, जि.जालना*
*मोबाईल : ९९२२२४०८३*

स्मरणांजली!

# कॉ. विलास सोनवणे : कृती आणि विचारांची प्रयोगभूमी असलेला कार्यकर्ता, विचारवंत!

देवकुमार अहिरे

**महाराष्ट्रातील सांस्कृतिक राजकीय चळवळीमध्ये महत्त्वाची भूमिका निभावणारे कॉ. विलास सोनवणे यांचे नुकतेच निधन झाले. सी.पी.एम., सत्यशोधक कम्युनिस्ट पार्टी, नक्षलवादी चळवळ, मुस्लीम मराठी व मुस्लीम ओबीसी चळवळ - अशा अनेक चळवळींचे नेते, कार्यकर्ते कॉ. विलास सोनवणे यांच्या समग्र विचाराचे चिंतन करणारा लेख.**

हा देश, हा समाज माझा आहे आणि तो शांत व समृद्ध राहावा म्हणून या समाजातील-देशातील वाईट धोरणांविरुद्ध, चुकीच्या धोरणांविरुद्ध मला लढत राहिले पाहिजे. ही माझी आंतरिक व प्रामाणिक गरज आहे.

***- कॉ. विलास सोनवणे.***


'समाजामध्ये अनेक प्रश्न असतात आणि त्या त्या वेळची समाजामध्ये असलेली जी काही घुसळण असते, ती कुठल्या ना कुठल्या निमित्तानं चालू असते. ते निमित्त कधी सांस्कृतिक असू शकतं, कधी सामाजिक असू शकतं, कधी राजकीय असू शकतं... कुठल्याही निमित्ताने जी काही घुसळण होते, ती राजकीय सत्तेला आव्हान देणारी असते. कुठलीही घुसळण कुठल्याही निमित्ताने होऊ द्या.' अशी सर्वधर्मीय सर्वपंथीय सामाजिक परिषदेची राजकीय भूमिका मांडणारे कॉ. विलास सोनवणे यांचे दीर्घकाळ पार्किन्सनच्या आजाराने निधन झाले. कॉ. विलास सोनावणे महाराष्ट्रातील सांस्कृतिक, राजकीय चळवळीतील अत्यंत महत्त्वाचे नाव होते. त्यांच्या राजकीय चळवळीची सुरुवात ही एस.एफ.आय या विद्यार्थी संघटनेपासून झालेली होती. त्यानंतरच्या काळात त्यांनी विविध संघटना स्थापन करण्यामध्ये आणि चळवळी सुरू करण्यामध्ये महत्त्वाची भूमिका निभावली आहे. सी.पी.एम., सत्यशोधक कम्युनिस्ट पार्टी, नक्षलवादी चळवळ, मुस्लीम मराठी आणि मुस्लीम ओबीसी चळवळ, संवाद प्रक्रिया, सकल साहित्य संमेलन, युवा भारत आणि सर्वधर्मीय सर्वपंथीय सामाजिक परिषद- यासारख्या चळवळी आणि संघटना स्थापण्यात त्यांचा कधी सदस्य, कधी संस्थापक आणि कधी मार्गदर्शक म्हणून महत्त्वाचा वाटा आहे. तसेच, सेझविरोधी चळवळ, डाऊविरोधी चळवळ यामध्ये नेता म्हणूनही त्यांची महत्त्वाची भूमिका होती. संस्था, संघटना आणि चळवळीसोबतच महाराष्ट्रातील आणि देशातील वैचारिक आणि बौद्धिक चर्चाविश्वांमध्येही त्यांनी महत्त्वाचे बौद्धिक हस्तक्षेप केले आहेत. या सर्व घटना, प्रक्रिया आणि मुद्द्यांच्या माध्यमातून कॉ. विलास सोनवणे यांची कृती आणि विचार आपण समजावून घेण्याचा प्रयत्न करणार आहोत.

१. खानदेशातील सत्यशोधक चळवळीची पार्श्वभूमी असलेल्या कुटुंबात कॉ. विलास सोनावणे यांचा जन्म झाला. तरीही, आयुष्याच्या सुरुवातीच्या काळात त्यांचा सत्यशोधक विचारांशी संबंध नव्हता असे त्यांनी नोंदवले आहे. कारण, त्यांचे वडील मुंबईत पोलीस असल्यामुळे त्यांचे बालपण आणि तरुणपणाचा मोठा काळ हा मुंबई या औद्योगिक नगरीतच गेला. १९६०-१९७० ही दशके मुंबईच्या नव्हे, तर संपूर्ण भारताच्या आणि जगाच्या इतिहासाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाची आहेत. या काळात संपूर्ण जगात तरुणाईने जग बदलण्यासाठी आंदोलने उभी केली होती. त्याचा परिणाम मुंबईतील तरुणांवरही होत होता. त्यामुळे मुंबई शहरात वेगवेगळ्या विचारांच्या चळवळी झपाट्याने वाढत होत्या. कॉ. विलास सोनवणे यांच्यावरही या सर्व घटनांचा प्रभाव पडत होता. तरुणपणाच्या सुरुवातीच्या टप्प्यांमध्ये विलास सोनवणे घरातून पळून गेले होते. त्यावेळी, त्यांना एका मार्क्सवादी कुटुंबाने सहारा दिला होता. अशा स्वरूपात मार्क्सवादी मंडळींचा आणि विलास सोनवणे यांचा पहिल्यांदा परिचय झाला, असे त्यांनी एका मुलाखतीत सांगितले आहे.

कॉ. विलास सोनवणे हे डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्थापन केलेल्या सिद्धार्थ महाविद्यालयाचे पहिले 'कम्युनिस्ट जी.एस.' होते. त्यांनी स्वतःच याविषयी बऱ्याच ठिकाणी

लिहिले आहे. मराठा जातीची पार्श्वभूमी असली तरी 'सोनवणे' या आडनावामुळे आरंभी इतर विद्यार्थी मंडळी त्यांना 'दलित' समजत होते, असेही त्यांनी नोंदवले आहे. त्यावेळी, सिद्धार्थ महाविद्यालय हे दलित चळवळीचे केंद्र असल्यामुळे मोठमोठी मंडळी तिकडे भेटी देत होती. सोबतच, जातीची चर्चाही खूप होत होती. त्यामुळे एका वेगळ्या सामाजिक विश्वाची ओळख कॉ. विलास सोनवणे यांना सिद्धार्थ महाविद्यालयाने करून दिली असेही त्यांनी नोंदवले आहे. महाविद्यालयात कम्युनिस्ट चळवळीचे काम करायला सुरुवात केल्यामुळे त्यांना काही अडचणींना सामोरेही जावे लागले. कारण, त्या काळात कम्युनिस्ट चळवळ आणि दलित चळवळ यांची ध्येयं वेगवेगळी आहेत असेही म्हणणारी काही मंडळी होती. नामदेव ढसाळ आणि राजा ढाले यांच्या वादाचीही पार्श्वभूमी याला असावी असेही आज वाटते. कारण, त्याकाळी असे म्हटले जात होते की, दलित पँथरच्या स्थापनेमागे नक्षलवादी चळवळीचा हात आहे.

मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाच्या विदयार्थी संघटनेचे महाराष्ट्राचे संस्थापक सचिव म्हणूनही कॉ. विलास सोनवणे यांची ओळख आहे. ज्यावेळी विलास सोनवणे एस.एफ.आय. या विदयार्थी संघटनेचे सचिव होते. त्यावेळीच कॉ. शरद पाटील आणि त्यांची ओळख झाली होती. पुढील काळात ज्यावेळी मा.क.पक्षामध्ये कॉ. शरद पाटील आणि पक्षश्रेष्ठी यांच्यामध्ये वैचारिक वाद निर्माण झाला होता. त्या वादामध्ये कॉ. शरद पाटलांची भूमिका योग्य, अशी भूमिका घेतल्यामुळे कॉ. शरद पाटील यांच्यासोबत कॉ. विलास सोनवणे यांनाही पक्षाने काढून टाकले होते. एकीकडे कॉ. शरद पाटील पक्षातील लोकांशी वाद घालत होते आणि दुसरीकडे मार्क्सवादासोबत फुले–आंबेडकरवादाचा संयोग करत



होते. त्यामुळे मा.क.पक्षामधून काढून टाकल्याबरोबर त्यांनी सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षाची स्थापना केली. त्यामध्ये कॉ. विलास सोनवणे यांचाही सहभाग होता. परंतु, काही महिन्यांनीच कॉ. विलास सोनावणे सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षापासून वेगळे झाले आणि त्यांनी नक्षलवादी चळवळीत सहभाग घेतला. सत्यशोधक कम्युनिस्ट पक्षापासून आपण नेमक्या कोणत्या कारणांमुळे वेगळे झालो याचे म्हणावे तसे स्पष्टीकरण कॉ. विलास सोनवणे यांनी दिलेले नाही. कॉ. शरद पाटील यांचे निधन झाल्यावर स्मृतीप्रित्यर्थ लिहिलेल्या लेखात त्यांनी काही कारणांचा ऊहापोह केला आहे; पण त्याची सत्यता पडताळून पाहण्यास वेगळी साधने नाहीत. मार्क्स–फुले–आंबेडकरवादासंदर्भात त्यांचे काही मतभेद होते, असे मात्र त्यांच्या मांडणीत वारंवार आलेले आहे.

कॉ. सोनवणे यांनी ज्यावेळी नक्षलवादी चळवळीत प्रवेश केला. त्यावेळी देशभरात नक्षलवादी गटांचे अनेक पक्ष देशभरात कार्यरत होते. त्यांच्यामध्ये राजकीय भूमिकेवरून विविध प्रकारचे मतभेद होते. त्यामध्ये संस्कृती, भाषा, धर्म, जात अशा अनेक गोष्टींचा समावेश करता येऊ शकतो. सी.पी.आय. (एम.एल.– सी.आर. सी.) या पक्षाचे ते कार्यकर्ते होते आणि कोणत्याही प्रकारची राष्ट्रीय समिती या पक्षाची नव्हती. कारण, भारत हे एक राष्ट्र नसून ते अनेक राष्ट्रांचा एक संघ आहे म्हणून प्रत्येक राष्ट्राच्या पक्षाला स्वायत्तता असावी असे म्हणत देशाच्या वेगवेगळ्या भूभागात त्यांच्या पक्षाची स्थापना झाली होती. तसेच, त्यांचा पक्ष हा प्रामुख्याने ब्राह्मणेतर कम्युनिस्टांचा पक्ष होता, असेही त्यांनी काही वेळा नोंदवलेले होते. पुढे, वर्गेतर सामाजिक रचनांविषयी पक्ष कोणतीही ठोस भूमिका घेत नाही. तसेच, पक्षाचा कृतीकार्यक्रमही नाही म्हणून त्यांनी पक्ष विसर्जित करून टाकला. त्यामुळे त्यांना डाव्या वर्तुळात 'विसर्जनवादी' असे म्हणून हिणवलेही गेले आहे.

२. १९८०–९० दशकामध्ये घडलेल्या सामाजिक, राजकीय आणि आर्थिक बदलांमुळे भारतीय राजकारणाची दिशाच बदलली. मंडल, कमंडल आणि खा.उ.जा. धोरणामुळे भारतीय बऱ्याच घडामोडी झाल्या. जनार्दन पाटील यांच्या नेतृत्वाखाली ओबीसी चळवळ कार्यरत होती. त्यावेळी, कॉ. विलास सोनवणे हे जनार्दन पाटील यांच्याशी जोडले गेले. त्यातून पुढे मुस्लीम ओबीसी चळवळ, सर्वधर्मीय ओबीसी चळवळ संघटीत करण्यात आली. एकीकडे हिंदू–मुस्लीम ध्रुवीकरणाला छेदण्यासाठी आणि दुसरीकडे मुस्लीम उत्पादक जातींनाही

मंडल कमिशनचा फायदा मिळावा म्हणून मुस्लीम ओबीसी चळवळ संघटित करण्यात आली होती. यामध्ये प्रामुख्याने कॉ. विलास सोनवणे यांचा मोठा वाटा होता. सर्वधर्मीय ओबीसी चळवळीचे संघटन करूनही व्यापक ओबीसी हिताची मांडणी त्यांनी केली आहे. मात्र, मुस्लीम ओबीसी चळवळीप्रमाणे सर्वधर्मीय ओबीसी चळवळीचा म्हणावा तसा प्रसार झाला नाही. हिंदू-मुस्लिमांच्या जमातवादी राजकारणाच्या प्रचाराला ध्वस्त करण्यासाठी आपल्या काही सहकारी दोस्तांसह त्यांनी मुस्लीम मराठी चळवळीची सुरुवात केली. त्यामध्ये इक्बाल मिन्ने, फकरुद्दीन बेन्नूर यांच्यासारखी अजून काही मंडळी त्यांच्यासोबत होती. मुस्लीम मराठी साहित्य चळवळीने साहित्य संमेलन घेऊन सांस्कृतिक राजकारणात हस्तक्षेप केला. त्यामुळे उर्दू हीच सगळ्या मुस्लिमांची भाषा आहे हा जमातवादी गैरसमज दूर झाला. देशोदेशीचे आणि प्रांतोप्रांतीचे मुसलमान हे भाषिक, सांस्कृतिक, पेहराव आणि खाद्यसंस्कृतीच्या दृष्टीने वेगवेगळे आहेत अशी मांडणी करत त्यांनी मुस्लिमांच्या एकसाचीकरणाच्या इस्लामी आणि हिंदुत्ववादी प्रयोगांची चिकित्सा केली. यासंदर्भात, 'मुस्लीम प्रश्नाची गुंतागुंत' हे त्यांचे पुस्तक अत्यंत महत्त्वाचे आहे.

१९९०च्या दशकात अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या 'ब्राह्मणी वृत्ती'च्या व्यवहाराला प्रतिक्रिया म्हणून महाराष्ट्रातील दलित, डाव्या आणि पुरोगामी चळवळीतील साहित्यिक, कार्यकर्ते मंडळींनी विद्रोही साहित्य संमेलनाची सुरुवात केली. त्यातूनच विद्रोही सांस्कृतिक चळवळीची सुरुवात झाली. कॉ. विलास सोनावणे यांनाही अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या 'ब्राह्मणी वृत्ती'ला नकार होता. सोबतच, त्यांना विद्रोहाची भूमिका मान्य नव्हती. त्यामुळे त्यांच्या सहकाऱ्यांसोबत त्यांनी सकल संमेलनाचे पर्यायी आयोजन केले. 'अखिल'मध्ये सर्वांना स्थान नसते. त्यामुळे 'सकल'मध्ये सर्वांना सामावून घेणे अशी त्यांची भूमिका होती. तुम्ही आम्हाला सामावून घेत नाही म्हणून आम्ही तुमच्यावर बहिष्कार टाकू अशी त्यांची भूमिका नव्हती. बहिष्काराची भूमिका त्यांना मान्य नव्हती म्हणून त्यांनी प्रतिक्रियावादी नव्हे तर पर्यायी 'सकल संमेलन' आयोजित केले होते, असेही त्यांनी म्हटले आहे. आज बऱ्याच वर्षांनी मागे वळून पाहिले तर असे दिसते की, सकल साहित्य संमेलन एकदाच झाले. विद्रोही सातत्याने होते; पण त्याच्यामध्ये खूपच गटबाजी झालेली आहे. त्यामुळे त्याला म्हणावं तसं लोकबळ अजूनही मिळालेले दिसत नाही. मात्र, एक गोष्ट खरी आहे. ती म्हणजे सकल आणि विद्रोही या दोन्ही संमेलनांनी काही मूलभूत प्रश्न सांस्कृतिक आणि साहित्यिक विश्वासमोर उभे केले होते आणि त्यामध्ये कॉ. विलास सोनवणे यांची महत्त्वाची भूमिका होती.

खा.उ.जा. धोरणाच्या माध्यमातून एका नव्या प्रकारचा आर्थिक साम्राज्यवाद देशात येऊ घातला आहे, अशी भूमिका घेऊन वेगवेगळ्या विचारसरणीच्या मंडळींना एकत्रित करून नवीन चिंतन, मंथन आणि संघटन घडवून आणण्याच्या दृष्टीने प्रारंभी छात्र युवा संघर्ष वाहिनी आणि जे. पी. आंदोलनाची पार्श्वभूमी असलेल्या मंडळींनी बिहारमध्ये संवाद-प्रक्रियेला सुरुवात केली. त्या प्रक्रियेत कॉ. विलास सोनवणे जोडले गेले आणि त्यांनीही त्या प्रक्रियेत महत्त्वाची भूमिका निभावली. या संवाद-प्रक्रियेत गांधीवादी, सर्वोदयवादी, लोहियावादी, मार्क्सवादी, आंबेडकरवादी अशी देशातील विविध भागातील मंडळी सहभागी झाली होती. संवाद-प्रक्रियेतूनच नव्या भारताचे स्वप्न पाहणाऱ्या युवा भारत या संघटनेची स्थापना झाली. या संघटनेच्या अनेक संस्थापक सदस्यांपैकी एक सदस्य म्हणून कॉ. विलास सोनवणे ओळखले जातात. युवा भारतच्या माध्यमातून देशभरात आंदोलने, चळवळी आणि मोर्चे झालेत. वेगवेगळ्या विचारसरणीच्या मंडळींशी संबंध आल्यामुळे कॉ. विलास सोनवणेंच्या दृष्टिकोनातही बराच बदल झालेला दिसतो. प्रामुख्याने, महात्मा गांधींच्या चळवळीचे आणि विचारांचे कॉ. विलास सोनवणे यांचे मार्क्सवादी आकलन अनेक गांधीवादी मंडळींना आकर्षित करणारे ठरले आहे. कॉ. शरद पाटील यांच्या 'माफुआ'शी मतभेद नोंदवणारे कॉ. विलास सोनवणे 'माफुगा' (मार्क्स-फुले-गांधी) अशी मांडणी करत होते. त्यामुळेही, गांधीवादी वर्तुळात साम्राज्यवादविरोधी आणि जातीकडे उत्पादन व्यवस्था म्हणून पाहणारा कॉ. विलास सोनवणेंचा गांधी प्रभावी ठरला आहे आणि म्हणूनच आयुष्याच्या शेवटच्या टप्प्यात कॉ. विलास सोनवणे हे डॉ. भालचंद्र नेमाडेंच्या देशीवादाने प्रभावित होते असेही दिसते.

३. सेजच्या (विशेष आर्थिक क्षेत्र) माध्यमातून रायगड जिल्ह्यात शेतकऱ्यांच्या जमिनी बळकावण्याचे षडयंत्र भांडवलदारांनी केले होते. त्यावेळी सेझविरोधी लढ्याचे नियोजन करून न्या. सावंत आणि न्या. कोळसे पाटील यांच्यासोबत कॉ. विलास सोनवणे यांनी अंबानीच्या विरोधात लढा दिला. तसेच, कोकणातील कुणबी शेतकऱ्यांच्या चळवळीला मार्गदर्शन आणि दिशादर्शनही केले. सोबतच, पुणे शहराजवळ असलेल्या डाऊ या कंपनीच्या विरोधात वारकरी नेते बंडातात्या कराडकर, न्या. सावंत आणि न्या. कोळसे पाटील यांच्यासोबत कॉ. विलास सोनवणे आंदोलन केले

आणि डाऊ कंपनी जाळून टाकली. यावेळी, कॉ. सोनवणे हे लोकशासन आंदोलन या चळवळीत न्या. सावंत आणि न्या. कोळसे पाटील यांच्यासोबत काम करत होते. डाऊ कंपनीच्या विरोधातील चळवळीचे डावपेच, धोरणे हे सर्व कॉ. विलास सोनवणे आखत होते, अशी कबुली स्वतः बंडातात्या कराडकर यांनी दिलेली आहे. वारकरी संप्रदायाला डाऊ विरोधी आंदोलनात सामावून घेतल्यामुळे, बंडातात्या कराडकर यांची विश्व हिंदू परिषदेची असलेल्या जवळकीमुळे अनेकांनी कॉ. विलास सोनवणे यांच्यावर टीका केली. पण, डाऊ कंपनी वारकरी मंडळींनी जाळल्यावर अनेकांना धक्का बसला. धर्म, संस्कृती आणि पर्यावरण याची सांगड घालून जनआंदोलन कसे उभे करता येते याचे उत्कृष्ट उदाहरण म्हणजे डाऊविरोधी आंदोलन.

मार्क्सवादी बैठकीने कॉ. विलास सोनवणे ध्येयसृष्टी घडवलेली असल्यामुळे सातत्याने भांडवलशाही, आणि तिच्या सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक आणि वैचारिक परिणामांची चिकित्सा करणे, हे त्यांचे काम होते. वर्ल्ड ट्रेड ऑर्गनायझेशन (डब्लू.टी. ओ.) ही आंतरराष्ट्रीय संघटना भांडवली धोरण राबवते. आर्थिक साम्राज्यवाद पसरवते. तिला पर्याय म्हणून वर्ल्ड सोशल फोरमची (डब्लू.एस.एफ.) स्थापना जगातील समाजवादाकडे झुकणाऱ्या देशांनी केली होती. परंतु, वर्ल्ड सोशल फोरममध्ये अनेक स्वयंसेवी संस्थांनी भांडवली पैसा गुंतवला आहे. त्यामुळे काही मंडळींनी मुंबईत होऊ घातलेल्या फोरमच्या सभेला प्रतिक्रिया म्हणून 'मुंबई–०४ प्रतिरोध' ही पर्यायी सभा भरवली होती. कॉ. विलास सोनवणेंचा वर्ल्ड सोशल फोरमच्या भूमिकेला विरोध होताच; पण सोबतच त्यांचा विरोध 'मुंबई–०४ प्रतिरोध' या सभेलाही होता. कारण, फोरमच्या सभेमध्ये बोलणाऱ्या अरुंधती रॉय याच प्रतिरोधच्या सभेतही बोलणार होत्या आणि कॉ. सोनवणे यांना हे विसंगत वाटत होते म्हणून त्यांनी विरोध केला. परिवर्तनाचा वाटसरूमध्ये त्यांनी यासंदर्भात एक सविस्तर लेखही लिहिला आहे.

महाराष्ट्रातील जातीचिंतनामध्येही कॉ. विलास सोनवणे यांचे महत्त्वाचे योगदान आहे. प्रामुख्याने ओबीसी – कारागीर जातींना केंद्रस्थानी ठेवून त्यांनी 'जात : एक उत्पादन व्यवस्था' अशी मांडणी केली आहे. मुस्लीम ओबीसी जातींचीही अशी चर्चा ते करतात. त्यामुळे त्यांची जातीचर्चा ही वेगळी ठरते. अस्पृश्यता आणि जातिव्यवस्था यामध्येही ते फरक करतात. त्यामुळे अस्पृश्य जातींच्या धर्तीवर कारागीर जातींची चर्चा आपण करू शकत नाही, असेही ते नोंदवतात. खोती विरुद्ध चरीच्या संपाविषयी भरभरून बोलणारे कॉ. विलास सोनवणे डॉ. आंबेडकरांची जातीचिकित्सा समजावून घेण्यास काहीसे कमी पडतात, असे एकीकडे होत असले तरी दुसरीकडे ते स्वतःच्या चिंतनाने आणि निरीक्षणाने जातीचर्चा व्यापकही करतात हेही तेवढेच सत्य आहे. साहित्यिक व्यवहारात त्यांनी उघडपणे डॉ. नेमाडेंच्या देशीवादाचा पुरस्कार केला होता, याचा वर उल्लेख आला आहे. त्यामुळे त्यांना समर्थन मिळाले आणि विरोधही झाला. नेमाडेंच्या देशीवादाला सकारात्मक दिशा द्यायची गरज आहे, असे सुरुवातीला म्हणणारे कॉ. विलास सोनवणे देशीवादसंदर्भात काहीसे अचिकित्सक होतात. कारण, याबाबतीत त्यांच्यातील मार्क्सवादी व्यक्तीवर त्यांचे गांधीवादी आकलन भारी पडताना दिसते. तसेही, जगभरात साम्राज्यवादाला, जागतिक भांडवलशाहीला प्रतिक्रिया म्हणून आलेल्या देशीवादी प्रतिक्रियांना कसे सामोरे जावे हा जागतिक कम्युनिस्ट चळवळीसमोरील प्रश्न आहे.

पुढील काळात सांस्कृतिक संघर्ष अधिक ठळक होतील, असे कॉ. विलास सोनवणेंना वाटत होते. त्यामुळेच त्यांना सर्वधर्मीय सर्वपंथीय सामाजिक परिषद अत्यंत महत्त्वाची आहे, असे त्यांचे म्हणणे होते. समाजातील लोक, आजूबाजूचे पर्यावरण आणि निसर्ग जिवंत राहिला तर आपापले धर्म, संप्रदाय जिवंत राहतील. त्यामुळे लोकांच्या प्रश्नावर, पर्यावरण, निसर्ग, आर्थिक प्रश्न यावर सर्वधर्मीय सर्वपंथीय समाजिक परिषदेने भूमिका घेतली पाहिजे, असे त्यांचे आग्रही प्रतिपादन होते. म्हणूनच, महाराष्ट्रात बौद्ध, महानुभाव, वारकरी, लिंगायत, मुस्लीम, शीख, जैन अशा सर्वधर्मीय सर्वपंथीय विद्वतजनांना सोबत घेऊन महाराष्ट्राच्या अनेक शहरांमध्ये परिषदांचे आयोजन केले. या परिषदांच्या माध्यमातून सामाजिक सलोखा, पर्यवरण संवर्धन आणि आर्थिक–सामाजिक विषमता याविषयी भूमिका घेण्यात आल्या.

मागील चार–पाच वर्षांपर्यंत कॉ. विलास सोनवणे गतिशील आणि कृतिशील होते. आजाराने ग्रस्त झाल्यामुळे त्यांची भटकंती थांबली होती; पण, त्यांनी संपूर्ण आयुष्यात राजकीय आणि वैचारिक क्षेत्रात खूपच मुशाफिरी केली. त्यामुळे ते सातत्याने विकसित झालेले आणि बदलत गेलेले दिसतात. कृतीमुळे विचार बदलणे आणि विचारामुळे कृती बदलणे असे त्यांनी संपूर्ण आयुष्यभर केले. त्यामुळेच त्यांच विचारविश्व विविध गोष्टींनी विणलेले आहे. त्यांच्या निधनाने मराठी विचारसृष्टीने कृती–विचार मेळ घालणारा अत्यंत महत्त्वाचा कार्यकर्ता–विचारवंत गमावला आहे.

***देवकुमार अहिरे,*** *पुणे*
*devkumarahire@gmail.com*

●●●

चिकित्सा

# बहुजन स्त्रीवाद

वंदना महाजन

**महाराष्ट्रातील स्त्रीवादाचा आजवरचा इतिहास पाहता, दलित आणि बहुजन स्त्रीवादाचा उगम झाला तेव्हापासून तो वास्तवात दुर्लक्षितच राहिला आहे. बहुजन कष्टकरी स्त्रियांची प्रत्यक्ष परिस्थिती 'जैसे थे' अशीच आहे. या विषयावर झालेल्या सैद्धांतिक मांडणीची आणि प्रत्यक्ष वास्तवाची तुलनात्मक चिकित्सा करणारा लेख.**

भारतातील स्त्रीवादी सिद्धान्ताचा विचार करताना तो धर्म, वर्ण, जात आणि वर्ग यांच्या चिकित्सेच्या संदर्भात करावा लागतो. पाश्चात्त्य स्त्रीवादाने वंशाधारित भेदभावाची चिकित्सा करून वेगवेगळ्या प्रवाहांची आणि सिद्धान्ताची निर्मिती केली. पुरुषसत्ताक समाजव्यवस्थेने निर्माण केलेला ढाचा स्त्रियांवर कसा बंधनकारक असतो आणि त्यातून त्यांच्या गुलामगिरीचे पाश कसे घट्ट आवळले जातात, याची चर्चा करताना स्त्रीवादी सिद्धान्ताने अधोरेखित केलेली मुक्तीची संकल्पना समजून घेत पुढे जाणे आवश्यक आहे. कॉम्रेड विलास सोनवणे यांनी 'बहुजन स्त्रीवादाच्या दिशेने' या पुस्तिकेत याविषयी भाष्य करण्याचा प्रयत्न केला आहे. यातील बऱ्याच लेखांचे शब्दांकन केलेले असल्यामुळे ते मुक्तचर्चेच्या स्वरूपात आहेत. बहुजन स्त्रीवादाच्या संदर्भात चर्चा करताना विलास सोनवणे गावगाड्यातील स्त्रियांना डोळ्यासमोर ठेवून ही चर्चा करताना दिसतात. 'बहुजन स्त्रीवाद' असे म्हणताना बहुजन म्हणजे नेमके कोण? याची काटेकोर व्याख्या करण्याची गरज आहे. युरोप/अमेरिकेत गोऱ्या स्त्रीवादी विचारांना आव्हान देत काळा स्त्रीवाद पुढे आला. वंश आणि गुलामी यांची चिरफाड करत ब्लॅक फेमिनिझमने काळ्या स्त्रियांच्या सामाजिक स्थानाची, दुःखाची आणि अगदी लैंगिक प्रश्नांची मांडणी करत आपल्या वर्गीय स्थानाची चिकित्सा केली. सरंजामशाही आणि नंतरच्या भांडवलदारी व्यवस्थेत काळ्या स्त्रियांचे होणारे शोषण अधोरेखित केले. 'बहुजन स्त्रीवाद' असे म्हणत असताना आणि बहुजन स्त्रियांच्या मुक्तीचा विचार करताना, तो आधी धर्माची चिकित्सा करून जात आणि समूह यांच्या आधारेच करावा लागतो. वर्णव्यवस्था आणि जातिव्यवस्थेत स्त्रियांचे स्थान भक्कम करून पुरुषसत्ता आणि पुरुषांनी निर्माण केलेली 'जात, वर्ण आणि वर्गव्यवस्था' यात स्त्रियांची गुलामी कशी निहीत केली गेली, याची सखोल मांडणी झाल्याशिवाय बहुजन स्त्रियांचे प्रश्न आणि बहुजन स्त्रीवादी सिद्धान्तन उभे करता येणार नाही. परत 'ब्राह्मण आणि बहुजन' अशी मांडणी करताना मुक्तीचा विचार प्रमाण मानणाऱ्या व्यक्तींना आपण कोणत्या गटात ढकलणार आहोत याचेही उत्तर स्त्री–मुक्ती अभिप्रेत असलेल्या विचारी स्त्री–पुरुषांना प्रामाणिकपणे द्यावे लागेल.

बहुजन स्त्रिया म्हटल्यावर ब्राह्मण सोडून सगळ्या स्त्रिया असे म्हटले तर त्यात मराठा, ओबीसी, दलित, आदिवासी, मुस्लीम या सगळ्याच स्त्रिया येतात. या सगळ्या स्त्रियांची एकत्र मोट बांधून त्यांच्या गुलामगिरीचे खरे स्वरूप लक्षात येणार नाही. धर्म आणि जातीच्या उतरंडीनुसार, सामाजिक स्थानानुसार या स्त्रियांचा प्रश्नांमध्ये खूप मोठी तफावत आहे.


शेती व्यवस्था आणि शेती व्यवस्थेतील मालक ते मजूर या आधारे निर्माण झालेल्या वर्गांची चिकित्सा जातीच्या आधारे करताना प्रत्येक वर्ग आणि जातीतील स्त्री ही त्या वर्गाच्या पुरुषसत्ताक मानसिकतेची बळी असते, हे नीटपणे लक्षात घ्यावे लागेल. भांडवलशाही व्यवस्थेत विशेष करून १९९० नंतर जागतिकीकरणानंतरच्या नवभांडवलशाही व्यवस्थेत 'सामूहिकतेचा बळी गेला' असा मुद्दा विलास सोनवणे मांडतात. यात परत गावगाड्यापर्यंत हिंदू–मुस्लीम अंतर कसे वाढत गेले ही वस्तुस्थिती ते विशद करतात. या सगळ्या प्रक्रियेत माझी कुणबी पाटलांची लेक असलेली आई ही हिंदू कधी झाली व तिला भाऊबीज घालणारा अब्दुल करीम तांबोळी हा मुसलमान कधी झाला हे त्या दोघांनाही कळले नाही, हे सांगायला ते विसरत नाहीत. जातीय आणि धार्मिक कायदे आयडेंटिटीचा प्रश्न बदलत गेला. पण

त्या आधीही आई कुणबी पाटील होती आणि करीम तांबोळी होता यावर मात्र ते मौन बाळगतात. गावगाडा, अलुतेदारी–बलुतेदारी यातील प्रथा, परंपरा आणि यातील सामाजिक एकोपा काही प्रमाणात वस्तुस्थिती असली तरी या व्यवस्थेत स्त्रिया मुक्त होत्या असे म्हणता येत नाही. विलास सोनवणे त्या परिसरातील स्त्रियांविषयी बोलत आहेत, त्याच परिसरातील कदाचित त्यांच्या आईच्या पिढीनंतरच्या पिढीतील माझी आई (माळी समाजाची) तिच्या बरोबरीच्या स्त्रिया शेतात जाताना गावाबाहेर पडेपर्यंत हातात चपला घेऊन चालताना मी बघितल्या आहेत. या स्त्रिया पुरुषांपेक्षा अधिक कष्ट करणाऱ्या घर आणि शेत सांभाळणाऱ्या मुलं सांभाळणाऱ्या होत्या हे खरे आहे. जसे त्यांचे शोषण तिहेरी होते/आहे; तसेच त्या तिहेरी श्रमाच्याही बळी होत्या. ज्या लग्नव्यवस्थेचे उदात्तीकरण विलास सोनवणे करतात त्या लग्नव्यवस्थेत लहानपणी (अनेकदा बालविवाहच) लग्न करून या स्त्रियांना सासरी पाठवले होते. सासरी त्या उपऱ्या असूनही मनोभावे राबत होत्या/राबत असतात. या स्त्रियांच्या लैंगिक प्रश्नाविषयी विलास सोनवणे या पुस्तकात काहीच बोलत नाहीत. जणू या स्त्रियांना लैंगिक भावना नव्हत्याच. मुळात या स्त्रियांच्या मुक्तीचा प्रश्न आज जेवढा जटील आहे; तेवढाच जटील त्या काळातही होता. गावगाड्यातील लग्न–नवस–जावळ–जत्रा यात सामुदायिकता होती, ही वस्तुस्थिती असली, तरी तो बंधुभाव होता. स्त्रिया आतून थेटपणे आपला भगिनीभाव जपत असल्या तरी ती त्यांची खाजगी बाब होती त्याला व्यवस्थेत मान्यता नव्हती. पुरुषी व्यवस्थेत हस्तक्षेप करण्याचे सामर्थ्य त्यांच्याकडून हिरावून घेतलेले होते. शेती आणि घर पुरुषांच्या मालकीचे होते/आहे. घरात किंवा शेतात मजुरी करणाऱ्या स्त्रियांना तेव्हाही आणि आजही आपल्या पैशांचा हिशोब नवऱ्याला द्यावा लागतो.

कष्टातील सहभागामुळे त्या त्या जातीतील या पुरुषांना त्या बाईवर दादागिरी करता येत नव्हती, या विलास सोनवणे यांच्या म्हणण्यात फार तथ्य नाही व भांडवलशाही व्यवस्थेचा स्वीकार केल्यानंतर शहरातील स्त्रियांचे मादीकरण झाले. तसे छोटे उद्योगधंदे नष्ट झाल्यामुळे गावगाड्यातील स्त्रिया अकुशल झाल्या म्हणून त्यांचे मादीकरण झाले असे नव्हे. मुळात या स्त्रिया लैंगिक शोषणाच्या आधीपासूनच बळी होत्या.

जागतिक स्त्रीवादाची चर्चा करताना तेथील वतनदारांच्या बायकांनी मतदानाचा अधिकार मागितला असे म्हणताना कामगार स्त्रियांनी मांडलेला मुक्तीचा प्रश्न, तसेच कामाच्या तासांपासून लैंगिक शोषणाच्या विरोधात उठवलेला आवाज दुर्लक्षित राहतो. ऐतिहासिक दृष्टिकोनातून मांडणी करतानाही आपले लक्ष प्रस्थापित इतिहासावर केंद्रित होते, जे खऱ्या अर्थाने शोषणाला सामोरे जात समतेचा पाया शोधत होते. त्यांची ऐतिहासिक कामगिरी दुर्लक्षित राहते. कामगार चळवळ, वर्णभेद विरोधी चळवळ आणि समाजवादी चळवळीतून पुढे आलेल्या स्त्रिया आपल्या शोषणाविषयी आणि मुक्तीच्या संकल्पनेविषयी वेगळ्या पद्धतीने या काळातही बोलत होत्याच.

इंग्रजांनी १८७० ते १९८०च्या दरम्यान भारतात स्थानिक स्वराज्य संस्थांची स्थापना केली. या संस्थांमध्ये मतदान करण्याचा अधिकार मालम त्ताधारक पुरुषांना होता. कुणबी, पाटील, वतनदार, देशमुख यांना आणि त्यांच्या घरातील स्त्रियांना (आई–बहीण–पत्नी) तो अधिकार देण्यात आला आहे, ही वस्तुस्थिती विलास सोनवणे विशद करतात. अर्थात, ही विषमता ब्रिटिशांच्या निर्णयामुळे निर्माण झाली असे म्हणता येत नाही, मुळात ही




विषमता इथल्या सामाजिक स्तरांमध्ये अस्तित्वात होतीच. त्यामुळे वसाहत काळात वरच्या वर्गांना आणि जातींना हाताशी धरून खालच्यांचे शोषण करण्याची नीती ब्रिटिशांनी अवलंबली. बहुजन स्त्रिया आणि मातृसत्ताकता ते स्त्रीसत्ताकता यांचा संबंध जोडताना वेद काळापासूनच मातृसत्ताकता संपुष्टात आलेली होती. आर्य–अनार्य संघर्ष आणि मातृसत्ताकता असा विचार केला तर अनार्य संस्कृती ही स्त्रीप्रधान होती, असे म्हणायला बराचसा वाव आहे. अनार्यांच्या लिंगपूजकतेचा दाखला विलास सोनवणे देतात. या स्त्रीप्रधानतेचे अवशेष इथल्या बहुजन कष्टकरी स्त्रियांमध्ये, त्यांच्या जाणिवेत आहेत याचे ऐतिहासिक पुरावे मिळतात. याचा अर्थ बहुजन पुरुष हे स्त्री–पुरुष समानतेचे पुरस्कर्ते होते, असा होत नाही. पुरुषसत्ताक सामाजिकीकरणाच्या प्रक्रियेत स्त्री–पुरुष संबंध पुरुष हा शोषक आणि स्त्री ही शोषित असेच राहिले आहेत. ताराबाई शिंदे या 'स्त्री–पुरुष तुलनेत' वर्णन करतात, ती पाठ लावण्याची पद्धत बहुजनांच्या खालच्या जातीमध्ये असली तरी योनिशुचिता आणि पुरुष जन्माचा आग्रह संपत्तीचा

मालकी हक्काशी संबंधित होता, तो बहुजनांमध्ये दिसतोच. येथे स्त्री ही खाजगी मालमत्ता म्हणून बघितले जाते. मुलीला गर्भात मारणे किंवा जन्मानंतर तिचा तिरस्कार करणे. तिची वाढ बाई म्हणून कशी होईल (मादी म्हणून) याची काटेकोर नियमावली उच्च जातीप्रमाणे बहुजन समाजातही होती. अर्थात, सोनवणे म्हणतात त्या पद्धतीने या स्त्रिया तिहेरी गुलामगिरी करत होत्या. श्रमव्यवस्थेशी बांधलेल्या होत्या.

फेड्रीक डग्लस यांनी काळ्या स्त्रियांना होणाऱ्या अमानुष मारहाणीचे वर्णन केले आहे. येथल्या कष्टकरी स्त्रियांच्या बाबतीतही ते घडत होते. श्रमसंस्कृतीशी बांधील असणाऱ्या स्त्रियांच्या शोषणाविषयी बोलताना बहुजन पुरुष आपली जबाबदारी झटकू शकणार नाहीत. या स्त्रियांच्या शोषणाचे सगळे पदर उलगडण्याशिवाय बहुजन स्त्रीवादाचे सिद्धान्तन संभवत नाही. भोगाचे नाते फक्त भांडवलशाही व्यवस्थेशी नाही जातीच्या आणि वर्गाच्या उतरंडीत स्त्री भोगाच्या पुरुषी कल्पना कशा बदलत गेल्या, हे इतिहासाचे अवलोकन केल्यास सहज लक्षात येते. वेद–श्रुती–स्मृती–पुराण काळात स्त्रियांची गुलामगिरी ही धर्माचे नाव घेत; दैवतशास्त्राचा काल्पनिक आधार घेऊन त्याला वास्तवाशी जोडून पुरुषसत्ताक आर्थिक व्यवस्थेत भरण–पोषण करण्यासाठी अधिक गडद केली गेली. इतिहासाच्या विशिष्ट टप्प्यावर निर्माण झालेल्या समानतेच्या चळवळींशी स्त्रियांच्या हक्कांचा काही प्रमाणात का होईना पुरस्कार केला. पण धर्म व्यवस्थेला जोडली गेलेली आर्थिक व्यवस्था आणि त्याआधारे निर्माण झालेल्या सामाजिक आणि सांस्कृतिक परिकल्पना या निर्विवादपणे पुरुषी वर्चस्व बळकट करणाऱ्या आणि स्त्रियांना अधिक गुलामगिरीत ढकलणाऱ्या होत्या. धर्माचा आधार घेऊन निर्माण झालेल्या जातीय उतरंडीत स्त्रियांचा उपभोग कसा घ्यावा याचे धर्मशास्त्रीय मार्गदर्शन करणाऱ्या पद्धती गणिकेपासून वेश्येपर्यंतचा प्रवास, कामसूत्राची वर्णीय आणि जातीय मांडणी, कोणत्या जातीतील स्त्रियांचा कसा उपभोग घ्यावा इथपासून ते तंत्रमार्गात स्त्रियांच्या शरीराचा होणारा वापर इथपर्यंत संमिश्र शोषण परंपरा भारतात अस्तित्वात होत्या. त्यामुळे मादीकरण जैविक भेदांचा दाखला देत येथल्या पुरुषसत्तेने स्त्रियांच्या माथी मारले होते. अगदी कामशिल्पांचे उदाहरण घेतले, तरी स्त्री–पुरुष संभोग, लैंगिक कृतींचे प्रदर्शन आणि कामवासनेचा सरळ आविष्कार भारतीय शिल्पकलेत दिसतो. हे कलाकार श्रमव्यवस्थेशी बांधील असलेले बहुजन पुरुष होते, याचे दाखले इतिहासात मिळतात. या कलेचा आजचा इतिहास जाणून घेतला म्हणजे सफलता व सर्जनाची चिन्हव्यवस्था प्राचीन गुहांमधील चित्रांमध्येही लक्षात येते. अर्थात, पुरातत्त्वशास्त्राच्या आधारे यावर वेगळा प्रकाश टाकला जाऊ शकतो. भारतीय काम शिल्पांचा उगम सिंधू संस्कृतीत आढळतो, असे मत अभ्यासकांनी मांडले आहे. योनीपूजा आणि लिंगपूजा या काळापासून अस्तित्वात होती, असे म्हणायला आधार आहे. वैदिक पुरुषसत्ताक काळापासून याच प्रतिमा अधिक नकारात्मकरीत्या दृढमूल होत गेल्या. स्त्रियांबद्दल प्रचलित असलेल्या मिथकांचा, पुराण प्रतिमांचा ऐतिहासिक उलगडा केला तर स्त्रिया भोगाचे साधन कशा बनल्या गेल्या आणि त्यांचे वस्तूकरण कसे झाले, त्यांच्या गुलामगिरीचे स्तर कसे बदलत गेले यावर प्रकाश पडू शकतो.

शिल्पकलेच्या उत्तान प्रतिमांमधून जगण्यासाठी, सर्जनासाठी पुरुषांची नव्हे तर स्त्रियांची आवश्यकता आहे, हे स्पष्टपणे अधोरेखित केले गेले. प्रसवक्षम स्त्रियांची पूजा आणि त्यांची मुक्त लैंगिकता हे या कलेचे वैशिष्ट्य दिसते. मानवी वंश वाढवणारे यंत्र म्हणून स्त्रियांचा उपयोग प्रत्येक काळात झाला, याविषयी धर्मानंद कोसंबी यांनी मांडलेले मत महत्त्वाचे आहे. 'भारतीय धार्मिक तत्त्वज्ञानाची मुळे आदिम समाजव्यवस्थेत आहेत हे मान्य करण्याची आणि आदिम काळातून टिकून राहिलेल्या श्रद्धांच्या अस्तित्वास सामोरे जाण्यास असणारी देशातील भारतीय विचारवंतांची स्वाभाविक नाखुशी ही बहुदा साम्राज्यशाही काळात सहन कराव्या लागलेल्या आणि अद्यापही तिची स्मृती जिवंत आहे, अशा दडपशाहीची सहज प्रतिक्रिया असणे शक्य आहे.' वासाहतिक काळात सांस्कृतिक इतिहास लेखनाच्या पद्धती ब्रिटिशांनी त्यांच्या सोयीने वापरल्यामुळे भारताचा सांस्कृतिक इतिहास क्रिया–प्रतिक्रियांमध्ये अडकला. ब्रिटिशांनंतर उच्चवर्णीयांचे प्राबल्य इतिहासावर कायम राहिले. आधुनिक ज्ञान परंपरा, प्राचीन ज्ञान परंपरेसारख्याच पुरुषकेंद्री राहिल्या. त्यामुळे स्त्रियांकडे असलेले ज्ञान 'ज्ञान' म्हणून स्वीकारले गेले नाही. पुरुषीव्यवस्थेने त्यांच्या शोषणाला शोषण म्हणून स्वीकारले नाही. तसेच त्यांच्याकडे असलेल्या ज्ञानाला ज्ञान म्हणून स्वीकारले नाही. या अर्थाने स्त्रिया प्रत्येक काळात गुलाम राहिल्या, दुय्यम राहिल्या. अनुभवनिष्ठ ज्ञान परंपरेचा सगळ्यात मोठा साठा येथील कष्टकरी बहुजन स्त्रियांकडे होता/आहे; पण तथाकथित ज्ञान संकल्पना ग्रंथनिष्ठ असल्यामुळे आणि येथील ब्राह्मणी मौखिक ज्ञान परंपरा वैदिक धर्माच्या दावणीला बांधली गेल्यामुळे कष्टकरी बहुजन स्त्रियांची अनुभवनिष्ठ ज्ञानपरंपरा दुर्लक्षित केली गेली. या अर्थाने कष्टकरी बहुजन स्त्री या ज्ञानाच्या आणि श्रमाच्या परिघावर फेकल्या गेल्या. मार्क्सने स्त्रियांना व्यक्ती म्हणून त्यांच्या श्रमाची दखल घेतली, ही वस्तुस्थिती असली, तरी जाती अंतर्गत भारतीय स्त्री

शोषणाचे प्रारूप मार्क्सच्या लक्षात आले नाही.

भारतात बाराव्या शतकानंतर सुरू झालेल्या समताधिष्ठित एकेश्वरवादी चळवळीत स्त्रियांचा महत्त्वपूर्ण सहभाग होता. या स्त्रिया मोठ्या प्रमाणावर बहुजन स्त्रिया होत्या, पण या स्त्रियांनी त्या चळवळीचे संपूर्ण नेतृत्व केले, असे बौद्ध काळापासून वारकरी संप्रदायाच्या चळवळीपर्यंत कोठेही दिसत नाही. या संपूर्ण काळाच्या पटावर थेरीगाथेपासून महदंबेचे ढवळे ते मुक्ताबाई–जनाबाई–बहिणाबाईपर्यंतची अभंग निर्मिती ही पुरुष नेतृत्व केंद्रस्थानी आणि स्त्रिया शिष्य स्वरूपात असेच चित्र दिसते. या स्त्रियांनी तत्कालीन पंथीय प्रारूपात निर्माण केलेल्या साहित्याची वस्तुनिष्ठ चिकित्सा केली, तर त्यांच्या मनात असलेली मुक्तीची आस ते शोधत असलेला मुक्त अवकाश एकीकडे दिसतो, तर दुसरीकडे पुरुषसत्ताक व्यवस्थेशी असलेले बांधलेपण त्यातून लादलेल्या गुलामगिरीची जाणीव आणि मुक्तीसाठीची धडपड दिसते. पंढरपुरात विठोबाच्या पायाशी सगळे एकरूप होत असले, तरी प्रत्यक्षात ती एक परिकल्पना ठरते. तिथून परतलेला वारकरी व्यवस्थेचा घटक असल्यामुळे तो स्त्रियांचे शोषण करीत होता. यातून राजकीय व्यवस्थांवर काही परिणाम झाला आणि त्यातून चांदबिबी, जिजाऊ अशा स्त्रिया काळाच्या विशिष्ट टप्प्यावर उभ्या राहिल्या, असे विलास सोनवणे म्हणतात. ही स्त्रियांची नेणीव मातृसत्ताक–स्त्रीसत्ताक आणि पुरुषसत्ताक बदलांच्या टप्प्यांवर मुक्ततेचा अवकाश शोधणारी होती असे म्हणता येते. पण परत या स्त्रियांचे कार्य समजून घेतांना ते पुरुषी पद्धतीनेच मांडले जाते.

वासाहतिक काळात उच्चवर्णीय स्त्रियांचे मडमीकरण सुरू झाले, हे विलास सोनवणे यांचे म्हणणे खरे आहे. शिक्षणाचे दरवाजे बहुजन स्त्रियांच्या मानाने लवकर खुले झाल्यामुळे या स्त्रिया या प्रतिमेतून बाहेर येऊन त्यांच्या पुरुषसत्ताक वर्गीय आणि वर्णीय स्थानात मुक्ततेचा अवकाश शोधू लागल्या. आपल्या भौतिक अधिकारांपासून लैंगिक अधिकारांची चर्चाही करू लागल्या. 'पर्सनल इज पॉलिटिकल' : माझ्या शरीरावर माझा अधिकार, विवाहांतर्गत बलात्कार आणि कायद्यापासून ते पुरुषी सांस्कृतिक, साहित्यिक विश्वापर्यंतचे 'फेमिनिस्ट रीडिंग' युरोपियन जहाल स्त्रीवादाप्रमाणे इकडेही काही प्रमाणात झाले. परत याला जातीच्या, वर्णाच्या मर्यादा पडल्या ही वस्तुस्थिती नाकारता येत नाही. येथे सर्वसामान्य कष्टकरी बहुजन स्त्रिया कोठे आहेत? हा प्रश्न उरतोच. दलित फेमिनिझम व ब्लॅक फेमिनिझम अशी तुलना करून शर्मिला रेगे यांनी मांडलेला दलित स्त्रीवाद हा दलित स्त्रियांच्या जातीय उतरंडीतील स्थानाविषयी चर्चा करणारा असला, तरी जोतिबा फुले यांनी स्त्रिया आणि शूद्रातिशूद्र यांची केलेली एकत्रित मांडणी इथल्या बहुजन पुरुषांनी का स्वीकारली नाही? हा प्रश्न उरतोच. सावित्रीबाई फुले, फातिमा शेख, मुक्ता साळवे, ताराबाई शिंदे यांची उज्ज्वल परंपरा पुढे का प्रवाहित झाली नाही? याची वास्तवदर्शी उत्तरे बहुजन स्त्रीवादाच्या समग्र मांडण्यासाठी काटेकोरपणे शोधावी लागतील. आंबेडकरी चळवळीनंतर दलित स्त्री प्रश्नांना नवे आयाम मिळाले. परत ते मूठभर स्त्रियांमध्ये बंदिस्त झाले यातही त्या त्या जातीतल्या, तळातल्या स्त्रिया उपेक्षितच राहिल्या. अगदी स्त्री चळवळीचे नाव घेत बोलणाऱ्या स्त्रियांची जातजाणीव संपली नाही, ही चर्चा त्यांनी जातीपुरतीच मर्यादित केली. परत आपल्या जातीतल्या पुरुषांना पंखाखाली घेत नवे जातीय आणि वर्गीय हितसंबंध निर्माण केले. या अर्थाने सगळ्यात उपेक्षित राहिली ती प्रत्येक जातीतील कष्टकरी स्त्री. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत तिच्या हातातले काम काढून घेण्यात आले. त्यामुळे ती अधिक दुर्बळ झाली. शेतीव्यवस्थेला लागलेली घरघर या स्त्रियांच्या मुळावर उठली. स्वातंत्र्यानंतर शिक्षणाचे सार्वत्रिकरण झाले तरी ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाची दुरवस्था थांबली नाही. राष्ट्राच्या कल्याणासाठी स्त्रिया आणि शूद्रातिशूद्रांच्या ऊर्जेचा उपयोग व्हावा ही वल्गना ठरली. राष्ट्रवादाच्या आधुनिक कल्पनादेखील पुरुषसत्ताक वर्गीय आणि सत्ता+बळ यांच्या साट्यालोट्यात जीर्ण धर्म परंपरेशी जोडल्या गेल्या. या स्त्रियांना परिघाबाहेर फेकण्याची वृत्ती वाढत गेली. त्यामुळे वर्गीय चिकित्सेबरोबर वर्ण– जाती चिकित्सा करून स्त्रियांच्या प्रश्नांचा विचार करावा लागतो. मुक्तिदायी चळवळींनी देखील या स्त्रियांना कायम परिघाबाहेर ठेवण्यात धन्यता मानली. या सर्व बाबींची दखल घेऊन येथील या कष्टकरी स्त्रियांच्या प्रश्नांचे सिद्धान्तन करावे लागेल. विलास सोनवणे यांनी वर्गीय परिप्रेक्ष्यातून या प्रश्नांची मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे. त्यामुळे त्यांच्या मांडणीला अनेक मर्यादा पडल्या आहेत.

मंडल आयोगाने ज्या ३७४५ जातींच्या दर्जाविषयी प्रश्न उपस्थित केले. त्या स्त्रियांची अवस्था आज सगळ्यात वाईट आहे. त्याला केवळ आरक्षणाशी जोडून त्याचा राजकीय उपहास करणे बरोबर नाही. सामाजिक विषमतेच्या बळी ठरलेल्या स्त्रियांनी इथल्या श्रमव्यवस्थेचा भार वाहिलेला आहे. त्यांच्या मुक्तीचा प्रश्न स्त्री चळवळीच्या अजेंड्यावर येणे गरजेचे आहे.

***वंदना महाजन,***
*विभाग प्रमुख, मराठी विभाग,*
*मुंबई विद्यापीठ, मुंबई.*
*dr.vandanamahajan@gmail.com*

●●●

अमन की ओर
(प्रेमाला पर्याय नाही)

**कथा**

# ‘ग’ ची बाधा

साहिल कबीर

**गाय आता नुसती गाय उरली नव्हती, तिची ‘गोमाता’ झाली होती. तिच्या नावाखाली निर्दोष माणसांचा निर्दयी खून केला जात होता. देशाची ही बदललेली हवा गावाचे वातावरणही गढूळ करत चालली होती. काय करावं अशा वेळी गुल्लीनं त्याच्या गाईचं?...**

आपण लिहितो, कागदावर खरडतो, म्हणजे नेमकं काय करतो? लिहिणं म्हणजे तेही कामच.

कुणी चेष्टेत जरी लेखक म्हटलं की बरं वाटतं.

लिहिणारा वगैरे समाजाचा डोळस घटकबीटक.

आसपास घडणाऱ्या, भिडणाऱ्या, बारीकसारीक गोष्टी आत झिरपून घेत असतो की झिरपलेलं उपसून काढण्याचा प्रयत्न करत असतो?

घाणीवर घोंगावणाऱ्या चिल्ट्याकिड्यांप्रमाणे प्रश्न वळवळत छळत-हसत असतात मनावर.

सुख, वेदना, दुःख, द्वेष, ईर्ष्या, मत्सर, यातना, ताणतणाव, जखम खपली, ओल, एकाकीपण, वैताग, उदासी, हतबलता, नैराश्य, चिडचिड, नाराजी, जळजळ, कळकळ, निदान उपाय उपचार, आजार-शेजार, प्रेमविरह, गोडीगुलाबी, आनंद उघडेपण, संथपण, संतपण, संसार, प्रपंच, नातीगोती, गणगोत, गोतावळा, परिवार, गुंता, सुटका, बंदी-निर्णय सामीलकी मोकळिकी असं बर बरंच खरं काही. या साऱ्या शब्दांतून, शब्दांमागून असंख्य प्रश्न आणि उत्तरांसाठीच्या पर्यायांचे कोलाहली गाव वसत राहतं मनात.

मनाचा तळ ढवळत, ओरबाडत, स्वस्थअस्वस्थ घुसळण घुसमटीतून निर्मितीरचना तयारते.

मी उतरतो म्हणजे शब्द येतात भरभर गाळ उपसत कागदभर, मी व्यक्तबिक्त होतो. या सगळ्याला लेखन म्हणूयात की शब्दभावाची डिलिव्हरी. मिश्रित जाणिवांची शब्द उधळण की, शिंपणलिंपण कागदावर? कधी हे सगळं वेगीआवेगी, उत्स्फूर्त कधी साचून साचेबद्ध, कधी मोकळे सैलसर, कधी सोपे-गूढ तर्क अतर्की, मीच गोंधळतो अशावेळी. मी शब्दांचा गोंधळी याला संवेदनांची भाषिक लक्तरे म्हणतो.

हातमागावर काम करत गारबाबा शहरात जायचा, छान नक्षी काढायचा ताग्यावर, कडेला बारीक बारीक सुईचं नक्षीकाम किंवा घरातली आज्जी ठिगळांच्या चिंध्याचपाट्या गोळा करून, जीर्णजुन्या कपड्यांतून दाभणीनं वाकळं शिवायची. गोधडी व्हायची. यांच्यासारखंच होतंय माझं. आठवांचे, समज-अपसमजाचे, आकळप्रसंगाचे, सलत्या क्षणांचे, अंकुरणाऱ्या मोहाचे शब्द उतरवण्याचा धसमुसळेपणा होतो. लेखणीचं दाभण होते किंवा कारखान्यातला धोटा. मग ही अनुभवाची वाकळगोधडी की वस्त्रनक्षी!

आज्जीच्या गोधडीनं पैसे मिळायचे.

बाबांना कामाचा पगार मिळायचा.

टाके घालताना दोघांची चुकायची नै नजर.

भावना ओवून कापड तयार व्हायचं. माझा कागद तयार होतोय. मला काय मिळेल, मिळतं बरं?

मला माणसांपर्यंत पुन्हा माझ्यापर्यंत पोहचायचे असते. शब्द सांडत राहतात. मी हुंदडत राहतो. शब्द सवंगड्यासारखे फिरवतात. कारखान्यातील खडखडाटातून, गळक्या घराच्या थेंबदार संगीतापर्यंत, संगमनदीच्या तीरावरून, गच्च गर्द हिरव्या शेतमळ्या डोंगरझाडीतून, वस्तीवाडीतून, पाऊसपाण्यातून, दर्दभरल्या गाण्यातून, कधी मृगजळी रणरणत्या वाळूतून उन्हांतून, निर्जन डोंगरकपारीतून, वसलेल्या गावांतून, धुमसत्या शहरांतून, जातीपातीधर्मातून उसना आवेशी स्वाभिमान शिकवत, वर्तमान स्वस्त आणि अस्मिता घट्ट करणाऱ्या इतिहासाच्या पानापानांतून, पिवळ्याजर्द वाळवीच्या पुस्तक कपाटातून, वाद्यावर फिरणाऱ्या कृश बोटांतून, माणुसकी मोजणाऱ्या चलनीनोटांतून, चंगळ्या बाजारपेठांतून रिकाम्या आतडी पोटांतून मी शब्दांसवेच!

या साऱ्या सहप्रवासात मुखवट्यांचे पापुद्रे चढत उतरत असतात. जोकर ते राजारंकाचे रणकंदन माजत शिजत राहते. बनाव–बेबनाव बेपर्वा होत मीच कोलाजतो आतून. ओकारीसारखे मळमळून भडभडून येतं मग, जे जे वांछील, तसा माझा टाहो लेखणीतून कागदभर. शब्दलाह्या, शब्दसाहित्य...

तो लिहीत राहिला एक कागद फुल्ल. आयला मराठी चांगलंय आपलं म्हणत पुन्हा शब्द उतरवला..

एका दमात एका कोऱ्या कागदावर एवढं लिहून गौस, गाडीला गचका लागावा तसा गपकन ग्राहकाच्या आवाजाने थांबला.

*तूरडाळ पावशेर,*
*येशेल तेल ३० रु,*
*आर.ए. ब्रॅन्ड चटणीपूड २ नग,*
*साखर अर्धा किलो.*
*पावडर १०ची.*
*तांदूळ अर्धा किलो.*

गौसने चिठ्ठीवरून नजर फिरवली.

''कोण लिवलंय?''

''मी'' पोरीन सांगितलं.

फाटलेल्या चिठ्ठीवरची ही यादी वाचून समोरच्या पोरीला साहित्य देऊ लागला. स्टुलावरून उठून हाताशी असलेल्या म्हणजे ज्यावर मघाशी लिहलंय त्याच कागदात तूरडाळ बांधली. पुड्या बांधून, रद्दीच्या पेपरम धून तिच्या एका हातात दिल्या.

खरं साहित्य हेच जगण्यासाठीचं.

असलं सहज बरळत त्याने मुलीकडे पैसे मागितले.

''आईनं सांगितलंय लिहून ठेवा खात्यावर. पगाराच्या दिवशी देईन म्हणलीया.''

एवढं बोलून पोरगी धूम पळती झाली.

'गुरुवार असतो पगाराचा दिवस. म्हणजे उधारी पडलीच. असू दे.. अक्षर भारीय मुलीच, शिकायला पायजे ही', असं म्हणत गौस मोनालिसी हसल्यावानी कौतुकत राहिला स्वतःला आतून.



फुटक्या आरशाला बाजूला करून तो पुन्हा बसला स्टूलवर धडपणे.

गौसचं किराणा दुकान छोटं, गल्लीच्या शेवटी सरकारी लाईटच्या खांबाखाली, किडूकमिडूक धान्यदाणे. गोळ्याबिस्किट, चॉकलेट, गल्लीच्या लायकीप्रमाणे पूर्वापार चालत असलेलं पोटदुकान.

एका पायानं अधू असणारा गौस, पोलिओच्या तापानं पाय उजवा कमजोर, डाव्या पायावर भार देऊन चालायचा. बैठी काम म्हणून दुकान टाकलंय. लहानपणी योग्य उपचार झाला नाही. याला ताप आला होता, तेव्हा वडील होते जमातीत चार महिन्यांसाठी, आईचा जीव कळवळला, गल्लीतल्या लोकांनी माणुसकी दाखविली.

गौस चालायला लागला. पॉवरलूम अॅटोलूम झाले, मंदीच्या मारात वडलांचं काम गेलं, तेव्हापासून गौसचा बाबा सैफुद्दीन नमाजी झाला. आताही सैफुद्दीन गावाबाहेरच. गौस शिकला; पण अपंगाच्या सवलतींचा योग्य लाभार्थी न होता आल्याने जेमतेम एक्सटर्नल बीए मराठी झाला. पान शॉपला वाढवून किराणा दुकान थाटलं. गौस स्टूलवर बसूनच सारी कामं करतो दुकानात, हाताला येतील एवढ्याच आसपास उंचीवर सगळा माल... गल्लीतले याला 'गौश्यागोचडी' म्हणतात. गोचिड.. नेहमीच खुर्चीला चिकटलेला तो, बायको भारीय गौश्याची, गरीब घरातलीच पण चतुर. रंगाने सावळीकाळी, दूरच्या नात्यातली. मकतब, नमाज, सगळं काही करणारी, गौस–गुल्ली.

गुलनार नाव तीच आणि सैफुद्दीनबाबा एवढाच गोतावळा. छोट्या गावातलं छोटं कुटुंब. गोचडीगौसला जे जमत नाही ते गुल्लीला सहज जमतं. म्हणजे ती दुकानमाल उधारीवर देत नाही.

''उनको उधार दे को हम क्या खाने का?'' तिचं नेहमीचं.

''इत्ता हमना कत्ता लगतय? चलतयतो!'' तो.

''तुमें चूप बैठो, चार आने की मुर्गी बारा आने का मसाला. खपेसो माल का तो पैसा पल्लू में पडीं देतो'', ती.

''व्हय, इता हमना का बालबच्चे हैं''

गौसच्या या वाक्यावर ती हार पत्करायची.

यांना मूलबाळ नाही.

लग्नाला पाचेक वर्ष झाली.

गौसच्या घरी हौस नाहीच. पण यावरून कधी वाद–तंटा झालाच नाही.

'नसिबमें ज्यो हाय वो हुइंगा', म्हणत दोघांनीही स्वीकारलंय कदाचित तात्पुरतं वांझपण दोघांचं!

दिवसभराच्या व्यापाराची चिल्लर मोजून झाली. शहरातल्या होलसेलरची देणी भागवून घरातला बाजार भरता येईल. इतकेतरी शिल्लक पैसे गौसने वरच्या खिशात टाकले. हफ्त्यावरचा जिओस्मार्टफोन वाजला.

''सलामलेंकूम बेटा, सबेरे फज्रराफज्रर आपली गाय बेचको छोड जल्दी'' सैफुद्दीन.

''वालेकूमसलाम, तुमे आवो फिर देखिंगे बाबा''

''नै. नै. हालात खराब है, झंझट नको. बेचको छोड''

''बाबा, क्यातोच, रहने द्यो, तुमारी तब्बेत कैसी है?''

''ठीक हाय, तेरी फिकर हाय बेटा. बेच दे गाय को.'' सैफु.

हां नां म्हणत डावीकडे कानावर फोन दाबत दुकानाला कुलूप लावून गौस लगंडत रस्त्याला लागला.

पटेलमळ्यात जुन्या दर्ग्याजवळ तीन–चार वर्षापूर्वी मिनारवाली म स्जिद बांधलीय. पूर्वी ईदलाच वर्षातून नमाज व्हायची.. गौशा जायचा बाबासोबत पलीकडेच्या गावात चारेक किमीवर. रात्रीच्या अजानचा बारीकसा दुरून येणारा आवाज ऐकत, गावठी कुत्र्यांना हुसकत गौशा घरात पोचला.

घरातला टीव्ही नवा.

शेतात कामाला सुट्टी असली की, शेजारणी बसायच्या काहीबाही बघत. बायको गुलनार स्वैपाक आवरून टीव्हीसमोर. शंकऱ्याने केबल जोडून चार–पाच महिने झालेत.

ती म्हणाली, ''सबेरे उसको केबलभाड़ा द्यो दुकान को जाते जाते, नै तो मैंच देतू.''

''आक्कूमौशी का केबल कट करे दूपेरका.''

''अगे रिमोट दे जरा, और खाने को बी दे, बातम्या देकतू'', म्हणत त्याने चॅनेल बदललं.

*।। गोरक्षकांनी भरचौकात केली गोमातेची महापूजा ।।*

*।। मंत्र्याच्या हस्ते सामूहिक महाआरती संपन्न ।।*

*खालच्या पट्ट्यांवरून बातम्या सरकत होत्या. चॅनेल बदललं.*

*।। फ्रीजमध्ये गोमांस असल्याच्या संशयावरून मुस्लिम म्हाताऱ्याला मारहाण ।।*

*।। गोरक्षकांनी अखलाकला ठार मारल्याचे सिद्ध.।। मंदिरमस्जिद वादावर संतमहंताची चर्चा सुरू ।।*

तो पटपट बटणं दाबत राहिला. च्यानेल बदलले तरी बातम्या–

*।। गोमाता मंदिर उभारणीसाठी देणगी खासदार फंडातून।। गोपुरात गौशाळेवर शिबीर ।।*

*।। गावशहरांची नवीन नावे अभ्यासक्रमात ।। रस्त्यांवर आंदोलनाची गळचेपी ।।*

एकामागोमाग एक उगीच मनाला वेदना झाल्यासारख्या वाटल्या. तिनं ताट ठेवलं समोर,

''तू खायी क्या?''

''दसमिन्टा पैले खायी मैं, गुरवके घरशी भारी मसालेभात आनि आमटी लाको देते. सो खाई मैं''

*।। गावात तणाव गटांतील भांडणाला धार्मिक रंग ।।*

*।। इंधन दर वाढले भाजीपाला कडाडला ।।*

बातम्या ब्रेकिंग होतं होत्या.

गुरव असो की माळी, जाधव, पाटील एकमेकाच्या घरातलं गोडधोड पार्सल व्हायचं, चोरून बिर्याणी किंवा बुर्जी गुल्लीभाभी पोचवायची गुपचूप अधेमधे शेजारी.

*।। काश्मिरी तरुणाचा उद्रेक ।।*

*।। गोळीबारात चार आतंकवादी ठार ।।*

*।। तबरेज नावाच्या गुंड तरुणाला जमावाने ठेचून मारलं ।।*

*।। जय श्रीराम म्हणण्याला नकार देणाऱ्याला ट्रेन मधून ढकललं ।।*

*।। मेट्रोचे उद्घाटन, बुल्लेट ट्रेनची घोषणा ।।*

*।। सबका विकासाची घौडदौड ।।*

*।। भिंत कोसळून मजूर ठार।।*

*।। तीन तलाकवर महाचर्चा थोड्याच वेळात ।।*

तिने चिकन रस्सा वाढला.

चव हरवल्यासारख काहीतरी, सपकतेने एकेक घास घश्यात घालत गौस गप्प होता.

गुल्लीच्या हातच्या चवीला काय झालं की आपला घसा बोंबललाय, की संवेदना वगैरे काही जागली की काय आपल्यात उगाच, की बाबांचा कॉल सतावतोय मघाचा ..कळेना!

तीन तलाकची महाचर्चा रंगताना त्याने न्यूज बदलली, गाण्याचं चॅनेल लावलं.

कुणीतरी लिटल च्याम्प गात होता सलमान नावाचा.

'जिसका कोई नै होता उसका तो खुदा है यारो'

आवाज कमी करत त्याने हात धुतले.

बाजूला पाठ टेकून बसताना म्हणाला,

''गुलनार, आपली गाय, बेचको देना अब.''

''आं, क्यूंजी?'' ताट आत आणून तिनं आपटलं.

''बाबा कने लगेते की शहर–गावां में मुसलमान और गाय पर लई जोरका मसला चलरेंय.''

''तो?''

''तो क्या? कल कोन बी उठिण्गा और मान्या तो हम्ना..''

''हमारे यहाँ वैसा क्या नई जी, कै को शंका करतय''

तिचं खरं होतं गाव शांततेनं नांदायचं गरीब गाव छोटंसं. धर्मांधतेच्या कोणत्याच खाणाखुणा अजून तरी ठाशीव दिसल्या नव्हत्या तिला, जाणवल्याही नव्हत्या. अधेमधे अलीकडे शहरात मोर्च्याला जाणाऱ्या एक गठ्ठा बायका–पुरुष बघून तिला काहीतरी चुकल्यासारखं वाटायचं जरा.

''पण, तनाव बडनेच लगे, अबी हमारे शेजारगाव के जवान छोरे भी परसो आये थे, तलवार दौड करते गाँव में''

खिशातली पेन हातात धरून गौस बोलला. त्याला लिहायची आवड, रद्दीत आलेल्या पुस्तकपानातील उतारे उतरवत बसायचा तो किंवा वाट्टेल ते लिहीत राहायचा.

''नै क्या हुता, शेजारपाजार क्या माणुसकी छोडे क्या?'' ती पुन्हा.

गावाचा लोकाचार, हवं तर लोकसंस्कृती म्हणू. पक्की माणुसकी जपणारी. सगळ्या जातीचे रहिवासी गावचे. मुसलमानांची दोन–चार घरं फक्त! धर्मसंस्कृतीचा ठेका मात्र नव्हता. पण गेल्या काही वर्षापासून मात्र त्याला बदल जाणवू लागलाय. हक्कानं, कधी दमदाटी, कधी चेष्टेनं गणपतीची पट्टी मागणारी गावातली गणेशमंडळं आता गौसकडे येत नाहीत. आरतीला डीजेचा कर्कश जोर वाढलाय. टाळी द्यायला पण थांबणं होतं नाही.

ग्रामपंचायत निवडणुकीत आपल्या घराला कुणी विचारलंसुद्धा नाही. गल्ली देते तिकडं मत देऊन गौस मोकळा. गावातल्या वेशीजवळ छ. शिवाजींचा पुतळा. त्याला शिवाजी पुतळा स्टॉप म्हणून वडापगाड्या, एखादी एसटी थांबायची. गेल्या दोन वर्षात ते 'शिवतीर्थ' झालंय. कुठली कुठली नामधारी पोरं जमून काहीबाही करत असतात. लंगडत कधी जाणं व्हायचं. तेही बंद आता, का कुणास ठाऊक?

पटेलमळ्यातल्या पटेलचाचानं मस्जिदीला जमीन दिली. बांधकामाला सुरुवात झाल्यापासून टोपीवाले, दाढीवाले, बाहेरगावचे लोक तबलिगी दावतसाठी येऊ लागले. शेतातल्या कामावरून परतणारे मजूर असणारे, संध्याकाळच्या मगरीब नमाजला जायचे, गौसला दावत यायची, अजानचा आवाज. बाबा तर पूर्णवेळ मस्जिदीतच!

गावातल्या पूर्वापारच्या गोतावळ्याशी असणारं नातं हल्ली

(पान २८ वर)


## नव्यानं वर्गणी भरायची आहे?

वर्गणी मनीऑर्डरने किंवा 'निरामय पब्लिक चॅरिटेबल ट्रस्ट'च्या नावे डिमांड ड्राफ्टने /**AT PAR** चेकने पाठवावी. वर्गणी इंटरनेट बँकिंगद्वारे तसेच, मिळून साऱ्याजणीच्या www.miloonsaryajani.in या वेबसाईटवरूनही भरता येईल.
यासाठी आमचे खाते क्रमांक आहेत –

| भारत | | | |
|---|---|---|---|
| | वार्षिक | ३ वर्षे | १० वर्षे |
| व्यक्ती | ५००/– | १४००/– | ५०००/– |
| संस्था | ७००/– | १९००/– | ७०००/– |

| भारताबाहेर | | |
|---|---|---|
| | वार्षिक | ३ वर्षे |
| व्यक्ती | ५० यु.एस. डॉलर्स | १२० यु.एस. डॉलर्स |
| संस्था | ६० यु.एस. डॉलर्स | १५० यु.एस. डॉलर्स |

**युनियन बँक, कर्वे रोड, पुणे**
Saving Ac. No. - **370002010908793**
IFSC - **UBIN0537004.**

**बँक ऑफ महाराष्ट्र, कर्वे रोड, पुणे**
Saving Ac. No. - **60029908172**
IFSC - **MAHB 0000116.**

A/C Name :
**Niramaya Public Charitable Trust**

**एक महत्त्वाची सूचना –** वर्गणी ऑनलाईन भरल्यानंतर ७४४७४४९६६४ या क्रमांकावर नांव, पत्ता, वर्गणीची रक्कम आणि वर्गणी कोणत्या बँकेत भरली याची SMS करून माहिती द्यावी, म्हणजे खात्यात जमा झालेली वर्गणी कोणाची आहे हे आम्हांला कळू शकेल.

**आकलन निबंध स्पर्धेतील विजेता निबंध**

# गृहिणींच्या घरकामाचं आर्थिक मूल्यांकन – काळाची गरज?

प्रियांका तुपे

**हिंगणघाट येथे आजीवन कार्यरत राहिलेले डॉ. मल्हार कावळे यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ 'मिळून साऱ्याजणी' आणि 'मार्गी' यांच्या संयुक्त विद्यमाने 'आकलन' ही वैचारिक निबंध स्पर्धा आयोजित केली होती. या स्पर्धेतील प्रथम आणि द्वितीय क्रमांक विजेते अनुक्रमे नेहा शहा आणि विवेक घाडगे यांचे निबंध इंग्रजीत असल्याने ते प्रसिद्ध करता आले नाहीत. हे निबंध** www.misaonline.in **वर उपलब्ध आहेत. तृतीय क्रमांक प्रियांका तुपे यांना मिळाला. त्यांचा हा विचारप्रवृत्त करणारा निबंध.**

'दिनूचं बिल' ही आचार्य अत्रेंची कथा आपण लहानपणी वाचली असेलच. एखादं छोटंसं काम सांगितल्यावर त्याचा कंटाळा करणाऱ्या, आईला उलट बोलणाऱ्या दिनूला, आईनं केलेल्या कामांची आणि त्यासाठी तिला मिळणाऱ्या मोबदल्याची यादी मिळते. आईला घरातल्या सगळ्या कामांचा मोबदला 'शून्य रुपये' मिळतो, हे वाचून त्याचे डोळे उघडतात. अत्र्यांनी ही गोष्ट ज्या काळात आणि परिप्रेक्ष्यात लिहिली, जो वाचकवर्ग समोर ठेवून लिहिली ते पाहता गोष्ट योग्य आणि महत्त्वाचा बोध देणारीच आहे, पण आजच्या काळातल्या प्रत्येक दिनूच्या आईला, आई नसलेल्या बायकांनाही त्यांच्या घरातील कामाचा मोबदला मिळायला हवा. कारण, आईचं बिल वाचून डोळे उघडणारे दिनू आज आजूबाजूला नाहीत, 'आई कुठे काय करते?' घरीच तर असते, असं म्हणत सदैव तिचा अपमान करणाऱ्या बबड्यांची चलती असणाऱ्या काळात गोष्टी बदलायला हव्यात. आता गृहिणींनीही त्यांच्या कामाच्या दरपत्रकाचा गंभीरपणे विचार करण्याची गरज आहे.

सध्या समाजमाध्यमांवर 'द ग्रेट इंडियन किचन' या मल्याळी सिनेमाची जोरदार चर्चा सुरू आहे. सिनेमातली नायिका आणि भारतातल्या बहुसंख्य गृहिणी सतत काहीतरी चिरत, कुटत, निवडत, निथळत, कापत, शिजवत, उकडत, भाजत, शेकवत असतात. स त त... स्वयंपाकघरात अथवा घरात राबत असतात.

'इंटरनॅशनल लेबर ऑर्गनायझेशन'नं २०१८ पासून २०२१पर्यंत केलेल्या संशोधनानुसार जगभरातील महिला दिवसातून सरासरी ४ तास २५ मिनिटं इतका वेळ मोबदलाविहीन श्रम करतात. यात घरातील कामाचा, लहान मुलं–वृद्ध यांची काळजी घेणे इ. बाबींचा समावेश होतो. तेच पुरुषांबाबत बघायचं झालं तर, जगभरातील पुरुष दिवसाला सरासरी १ तास २३ मिनिटं मोबदलाविहीन श्रम अर्थात घरातली कामं करतात. एकाच प्रकारचे श्रम करण्याच्या पुरुषांच्या आणि स्त्रियांच्या कालावधीतली तफावत घरकाम, मोबदलाविहीन श्रमांच्या बाबतीत किती मोठ्या प्रमाणात लिंगभेद आहे, हे दाखवण्यासाठी पुरेशी आहे.

घरात काम करणारी बाई मग ती सधवा असो की विधवा, घटस्फोटित असो की अशिक्षित किंवा अपंग वा अजून काही. ती दिवसभर घरात करत असलेल्या कामांमध्ये तिचे श्रम, ऊर्जा आणि आयुष्यातला मौल्यवान वेळही खर्च होतो, तरी त्याची दखल घेतली जात नाही. त्या कामाला प्रतिष्ठा नाही, मुळात त्याला कामाचा दर्जाच दिला जात नाही. शिवाय या कामांमध्येच गुंतून पडल्याने तिच्यातील सर्जनशीलताही मारली जाते.

घरातल्या कामांच्या रेट्यामुळे, गृहिणीनं शिक्षण घेणं अथवा आवडीच्या गोष्टी करणं, छंद जोपासणं यासाठी वावच राहत नाही. अर्थात, घरातलं काम सांभाळून स्त्रियांना अर्धवेळ नोकरी किंवा एखादा कोर्स करण्याची 'परवानगी देणारे' उदार लोकही आहेत. पण पितृसत्ताक समाजाची मुख्य अपेक्षा हीच, बाईने घरातलं काम चोख आणि वेळेवर केलं पाहिजे.

भरपूर शिक्षण घेतलेल्या; पण नंतर पूर्णवेळ संसारात रमून, तिन्ही त्रिकाळ स्वयंपाकघरात खपणाऱ्या काही स्त्रियांचं 'इतकी मॉडर्न सून आहे, पण संस्कार चांगले हो... लग्नानंतर घराबाहेर पाऊल टाकलं नाही, सगळं घर कसं आरशासारखं

लख्ख ठेवते' असं म्हणत कौतुक केलं जातं. घर आरशासारखं ठेवणाऱ्या सुनेकडे घराची मालकी मात्र नसते. मुलाप्रमाणेच सुनेच्याही नावावर घर करण्याचा विषय निघाला की, लगेच कालपर्यंत घराची नायिका असलेल्या सुनेला खलनायिकेचा किताब बहाल केला जातो.

खरं तर, गृहिणींच्या जीवावर घरातील इतर सदस्य विशेषत: पुरुष नोकरी, व्यवसाय, करिअर, शिक्षण सगळं करतात. देशाच्या सकल राष्ट्रीय उत्पन्नाला हातभार लावतात, पण हे शक्य होतं ते गृहिणी घरातली जबाबदारी उचलतात, त्यामुळेच. म्हणूनच 'गृहिणींचे घरातील श्रम' हे सकल राष्ट्रीय उत्पन्न (जीडीपी) याला हातभार लावतात. त्यामुळे जीडीपी मोजताना त्यात स्त्रियांच्या या घरकामाचा समावेश करावा, अशी स्त्रीवादी गटांची मागणी हल्ली जोर धरू लागली आहे. मात्र, भांडवली व्यवस्थेत, हे श्रम जीडीपीमध्ये कसे मोजावेत, यावर कोणतंही उत्तर नाही.

या श्रमांचं मूल्यांकन नेमकं कसं करावं, याबाबतही चर्चा होण्याची गरज आहे. अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, स्त्रीवादी गटांनी मिळून यावर काम केल्यास याचं काही उत्तर मिळू शकेल.

सर्वोच्च न्यायालयानं गृहिणीच्या श्रमांची दखल घेणारा जानेवारी २०२१ मध्ये दिलेला एक निर्णय या दृष्टीनं फार महत्त्वाचा आहे. रस्त्यावरील अपघातात एका दाम्पत्याचा मृत्यू झाल्यावर, ज्यांच्याकडून तो अपघात झाला, त्या आरोपींनी मृतांच्या वारसांना नुकसान भरपाई देण्यासंदर्भातला हा निर्णय होता. यातील मृत दाम्पत्यातील स्त्री ही गृहिणी होती. त्यामुळे ती कमावती नसल्याने, तिच्या वतीनं नुकसानभरपाई देण्याची गरज नाही, असा आरोपींच्या वकिलांचा युक्तीवाद होता. त्यावर 'मृत पुरुषाच्या नोकरीनुसार, वारसाला जेवढी नुकसानभरपाई दिली जाणार आहे, तेवढीच रक्कम पत्नीच्या नावानेही वारसाला दिली पाहिजे, पत्नी गृहिणी असली तरी तिच्या कामाचं मूल्यांकन पतीच्या कामाच्या मूल्यमापनाप्रमाणेच असेल.' असं सर्वोच्च न्यायालयाने या निकालात म्हटलं आहे. हा एक महत्त्वाचा निकाल असला तरी, हे चित्र केवळ अपघात वा अपवादात्मक परिस्थितीत न दिसता सर्वत्र दिसण्याची गरज आहे.

गृहिणींच्या घरकामाचं मूल्यांकन कसं आणि कोण करणार? हा एक महत्त्वाचा प्रश्न. तर, याचं उत्तर शोधताना अर्थतज्ज्ञ, समाजशास्त्रज्ञ, स्त्रीवादी गट, संशोधक यांच्याप्रमाणेच मुख्य भागधारक गृहिणींनाही सामावून घेतलं पाहिजे. त्यांना याबद्दल काय वाटतं? त्यांच्या दृष्टीनं किती मोबदला योग्य आहे, या मोबदल्यात त्यांच्या सामाजिक सुरक्षांचा अंतर्भाव आहे का? तसंच हा मोबदला नेमकं कोण आणि कसा देणार? घरातली दुसरी कमावती व्यक्ती की सरकार इ. प्रश्नांची सांगोपांग चर्चा होणं गरजेचं आहे.

केरळमध्ये होऊ घातलेल्या विधानसभा निवडणुकांमध्ये तर तिथल्या कम्युनिस्ट पक्षानं, राज्यातील स्त्रियांना घरकाम भत्ता देण्याचं आपल्या जाहीरनाम्यात म्हटलं आहे. असं खरं तर सर्वच पक्षांना त्या त्या राज्यातील स्थानिक पातळीवर अथवा केंद्रीय सत्तेतील सत्ताधारी पक्षाला करता येणं शक्य आहे, मात्र त्यासाठी राजकीय इच्छाशक्तीची, आणि लिंगभाव समता मानणाऱ्या धोरणकर्त्यांची गरज आहे.

गृहिणींच्या श्रमाचं आर्थिक मूल्यांकन करून, त्यांना त्याप्रकारे मोबदला देणं तर गरजेचं आहेच; पण हे करताना त्याचा 'जेंडर रोल्स'वर काय परिणाम होईल, हेही तपासलं पाहिजे आणि त्याचाही विचार केला पाहिजे. गृहिणी असल्यावर त्याचा मोबदला मिळतोय म्हणून अधिकाधिक स्त्रिया घरीच राहणं पसंत करतील आणि पुरुष उंबरठ्याबाहेर जाऊन काम करेल, असं तर होणार नाही ना? हे पाहिलं पाहिजे. तसं झालं तर तो एक लोभस सापळा ठरेल, स्त्रियांना उंबरठ्याआतच अडकवून ठेवण्याचा. श्रमाचा मोबदला तिला मिळेल, ही चांगलीच गोष्ट असली तरी स्त्रीला उंबरठ्याबाहेर पडता यावं, यासाठी स्त्रीवादी चळवळीनं जो संघर्ष केला, तो दोन पावलं मागे येईल. म्हणूनच केवळ गृहिणींना घरकामाचा मोबदला देण्याच्या विचारापेक्षा घरकाम करणाऱ्या 'व्यक्तीला' मग ती स्त्री असो की पुरुष अथवा इतर जेंडरची व्यक्ती – त्या व्यक्तीला घरकाम करण्याचा मोबदला देता येईल. जेणेकरून स्त्रियाच पुन्हा गृहिणीच्या भूमिकेत अडकणार नाहीत आणि पुरुषांनाही एक प्रकारे गृहिणी बनण्यासाठी, घरातली कामं करण्यासाठी प्रोत्साहन मिळेल. व्यक्ती कोणीही असली तरी तिला घरातली कामं करण्याचा मोबदला मिळणार असल्याने अमूक कामं स्त्रियांची आणि अमूक कामं पुरुषांची अशा चौकटी बळकट होणार नाहीत, कोणालाही कोणत्याही कामाचा आनंद घेता येईल. याचा आणखी एक फायदा म्हणजे 'बाहेरून कमवून आणाच' असं पितृसत्ताक व्यवस्थेनं, मर्दानगीच्या कल्पनांनी पुरुषांवर लादलेलं जोखड फेकून द्यायला पुरुषांनाही अल्पशी मदत होईल. कुटुंबाच्या आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडण्याचा पुरुषांवरही एक अदृश्य पण प्रचंड (पान २७ वर)

झुंजूमुंजू

# आम्ही कर्तृत्ववान कशा?

श्वेतल परब

**सावित्रीबाई फुले जयंतीनिमित्त किरकोळ भाजी, फुलं, फळं, मासे विकणाऱ्या कष्टकरी बायकांचा जाहीर सन्मान करताना पितृसत्ताक समाजातील त्यांच्या खडतर आयुष्याचा, त्यांच्या दैनंदिन संघर्षाचा आणि वेदनांचा ठाव घेणारा लेख.**

तीन जानेवारीला आमच्या गावात, सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करायचं ठरवलं. त्या कार्यक्रमाला भाजीवाल्या लताबाईंना प्रमुख पाहुण्या म्हणून बोलावण्यात आलं. तिला जेव्हा मी सांगितले की, 'तू कर्तृत्ववान आहेस, म्हणून तुला या कार्यक्रमात महिलांना मार्गदर्शनासाठी बोलावण्यात आले आहे.' त्यावर त्या बाई म्हणाल्या, 'ताई, तुम्ही सगळ्या जणी शिकल्या सवरलेल्या, शाळा–कॉलेजात, ऑफिसमध्ये काम करणाऱ्या, एकापेक्षा एक कर्तृत्ववान बायका असताना माझ्यासारख्या, अडाणी, रस्त्यावर बसणाऱ्या बाईला, पाहुण्या म्हणून कशापाई बोलावताय? आम्ही कर्तृत्ववान कसल्या?'

तिच्या या प्रश्नाने मी अंतर्मुख झाले. त्यावेळी एका अल्पशिक्षित बाईनं घातलेलं कोड आठवलं. 'बाई, फांदी तुटली तर पक्ष्याचं काय होतं?' मी म्हटलं, 'त्याचा आसरा निघून जातो.' ती बाई म्हणाली, 'ओ ताई, फांदी तुटली म्हणून पक्ष्याचं काही बिघडत नाही, त्याच्या पंखातच एवढं बळ असतं की, तो स्वतःहून उडून जातो.'

हेच बळ मला त्या लताबाईंसारख्या कित्येक, किरकोळ भाजी, फुलं, फळ, मासे विकणाऱ्या, तसेच घरगुती काम करणाऱ्या बायकांच्यात दिसत.

रोजच्या रहाटगाडग्यात आमचा दिवस कधी संपतो तो आमचं आम्हाला कळत नाही, अशी आपली कर्मकहाणी ऑफिसमधल्या बायका येता जाता सगळ्यांना सांगत असतात. ऐकणारा ऐकून घेतो, अगदी निमूटपणे. काही वेळेला सहानुभूतीचे दोन शब्दही फेकत असतो अंगावर. 'हेही नसे थोडके,' असं मानून त्या समाधानानं पुढच्या कामाला लागतात. पण असा योगायोग कष्टकरी बायकांच्या वाट्याला कधी येतो का? त्यांचं म्हणणं कोणीतरी कधीतरी ऐकून घेतलंय, आणि त्यांना मार्ग दाखवलाय, त्यातून वाट काढायला शिकवलंय असं कधी होत नाही. त्या स्वतःच स्वतःच्या वाटेवर पेरलेले काटे बाजूला करत पुढे पुढे जात असतात. अगदी यशस्वितेची शिखर गाठतात. तरीही, त्यांचं नाव कोणाच्या ओठावर देखील येत नाही. माझ्यासारख्या तुमच्याही आसपास अशा बायका असतीलच; पण मला समजलेलं सत्य कदाचित तुमच्याहून वेगळही असेल!

मी घरातून बाहेर पडते तेव्हा, डोक्यावर टोपली घेऊन भाजी, फळे, मासे, किंवा सणासुदीच्या काळात फुलं विकणाऱ्या बायका माझं लक्ष वेधून घेतात. त्यात मला दिसते ती एक कृषिसंस्कृती जपणारी बाई. जिच्या अंगावर अंगभर वस्त्रे असतात. कपाळाला ठसठशीत कुंकू असतं आणि असलंच तर गळ्यात काळ्या मण्यांचं डोरलं. काल–परवापर्यंत त्या अनवाणीच असायच्या, अलीकडे त्यांच्या पायात वहाणा दिसतात. पण कपाळावरची भाग्यरेषा अगदी तशीच, जशी मी तीस चाळीस वर्षापूर्वी ग्रामीण बायकांच्या चेहऱ्यावर पाहिलेली होती तशीच, चालणंबोलणं अगदी तसंच नैसर्गिक. त्यात आधुनिकतेचं वेड असलेल्या शहरी जगाचा मागमूसही नसतो. अलीकडे, त्यांच्या हातात मोबाईल दिसत असले, तरी त्यांचा उपयोग त्या क्वचितच करताना आढळतात. आपल्या मुलाबाळांची काळजी घेण्यासाठी म्हणून त्या आपल्याकडे मोबाईल ठेवतात. त्यांना वाटत नसेल का, आपणही इतर बायकांसारखं टापटीप राहावं, खावंप्यावं, आराम करावा? त्यांची स्वप्नं काय असतील? केवळ व्यापार आणि पैसा यापुरतीच मर्यादित की, त्याच्याही पलीकडे जाऊन स्वातंत्र्य, समता आणि स्वतंत्र अस्तित्वाच्या कल्पनेनी भारलेली असतील? याचा विचार करताना एकूणच मला आजच्या काळातील या किरकोळ विक्रेत्या व घरगुती स्वरूपाची कामं करणाऱ्या बायका आणि त्यांच्या या समस्यांनी

जागं केलं.

*अहिल्या द्रौपदी सीता*
*तारा मंदोदरी तथा।*
*पंचकन्या स्मरे नित्यं*
*महापातकनाशनम।।*

या संस्कृत सुभाषिताची ताकद ओळखणारी आपली भारतीय संस्कृती खरोखरच स्त्रीत्व आणि स्त्रियाना वंदन करते का? जर मी या कष्टकरी बायकांकडे पाहिलं, तर मला या आत्माभिमानी स्त्रियांच्या वाट्याला आलेले भोग बघता ही गोष्ट दुर्मीळच म्हणावी लागेल. प्रेम, आदर, आपुलकी, सन्मान या सगळ्या गोष्टींना या बायका मुकलेल्या असतात. खरं तर, आपल्या भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये यांचंही योगदान मोलाचं आहे, हे विसरून चालणार नाही. स्थानिक कृषी आणि मत्स्योत्पादनाला बाजारभाव मिळतो तो याच बायकांमुळे.

माझ्या शेजारी राहणारी फुलवाली सखू ही घराचा आर्थिक भार एकट्यानं पेलते. अशा वेळी पुरुषसत्ताक व्यवस्थेमधून आलेली पुरुषांची मनमानीही तिला सहन करावी लागते. नवरा आहे; पण तो कुंकवाचा धनी! बाकी सकाळी उठून रात्री झोपेपर्यंतची सगळी कामं मुकाट्यानं तिलाच करावी लागतात. कधी कधी मुलांना दया आली, तर तीही तिला घरात पाणी भरणं, झाडलोट करणं या कामात मदत करतात. तिच्या सासू-सासऱ्यांची सेवा, औषधपाणी, मुलांची शाळा, अभ्यास, त्यांच्या तब्येतीची काळजी घेणं ही कामं ती अगदी मनापासून करते. सणवार व्रतवैकल्यामध्येही ती कधी खंड पडू देत नाही. नवरा पूर्वी कधी रिक्षा चालवायचा, आता त्याच्या आजारपणामुळे त्याला तेही जमत नाही. त्याचं घरी बसून असणं, चिडचिड करणं, मुलांशी वाद घालणं, आईवडलांवर राग काढणं या कटकटींनादेखील ती खंबीरपणे सामोरी जाते. अशा वेळी बाहेरची माणसे



तिच्याबद्दल काही वेडंवाकडं बोलत असतात, तिच्या चारित्र्यावर शिंतोडे उडवतात. तिला अप्पलपोटी, स्वार्थी म्हणतात. हेदेखील सहन करण तिला काही अंशी सोपं जातं. कारणं ते तिचे कोणी सगे नसतात. केवळ तिच्या कर्तृत्वाचा दुस्वास म्हणून ते तसे वागत असतात. पण जेव्हा घरची माणसं तिची मानहानी करतात, तिला टाकून बोलतात तेव्हा मात्र तिचा आत्माभिमान पराकोटीचा दुखावतो.

अशीच अधूनमधून भेटणारी- मासे विकणारी बाई शारदा. मला तिच्याहून वेगळी आहे, असं कधी वाटलं नाही. सधन माहेर असलेली ती बाई, केवळ नवऱ्याच्या अकाली मृत्यूमुळे, वैधव्य पदरात घेऊन, तीन मुलाचं पालनपोषण, रोजच्या बाजारात मासे विकून करते. तिची मासळी मार्केटात बसायची जागाही निश्चित नसते. बाकीच्या मासेवाल्या बायका तिला उपरी समजून हाकलून लावत असतात. तिला टोमणे मारणं, शिव्या देणं, पांढऱ्या पायाची समजणं अशा प्रकारे मानसिक त्रास देत असतात. हे सगळं ती सहन करते केवळ आपल्या चरितार्थासाठी! ती कधी कुणाकडे हात पसरत नाही. तिची मुलं देखील आईचं दु:ख समजून घेतात. त्यांच्या शिक्षणाला म्हणावा तसा तिला पैसा खर्च करता आला नाही, तरी मुलांना जेमतेम शिकवून तिनं त्यांना पोटापाण्याला लावलं.

जसं नोकरी करणाऱ्या बायकांना नोकरीच्या ठिकाणी अनेक कटकटींना सामोर जावं लागतं, तसंच या बायकांनादेखील बाजारात बऱ्याच अवघड प्रसंगातून जावं लागत. एकतर बसायची जागा निश्चित नसते, त्यात कर वसुली करणारा बळजबरी करत असतो. काही वेळा फळे, मासे, यावर फिनेल वगैरे हानिकारक गोष्टी टाकून त्या बायकांना हुसकावून लावण्यात येतं. तसेच बाजारातील घाण आणि प्रदूषित वातावरणामुळे त्याचं शरीर स्वास्थ्य बिघडतं. धंदा वेळेत झाला नाही, तर घर उपाशी राहील या भीतीनं, त्या न खाता-पिता व्यापार करत राहतात, नाहीतर चहा आणि त्याबरोबर काहीतरी खाताना दिसतात. अशानं त्यांच्यामध्ये इतर बायकांच्या तुलनेमध्ये हिमोग्लोबिन, लोह, इ. कमी असल्याचं दिसतं. धंद्यासाठी काढलेल्या कर्जामुळे, त्यांना सावकाराचं उणंदुणं बोलून घ्यावं लागतं. प्रसंगी चारचौघांसमोर अपशब्द आणि शिव्या ऐकून घ्याव्या लागतात. काही वेळेला तर सावकाराची मजल मारहाणीपर्यंत पोहोचते. ही सावकार मंडळी त्याचं विविध प्रकारे शोषण करत असतात. अशा सर्वस्वाची माती झालेल्या बायका आपल्या आसपास वावरत असताना, आपण पुराणकथातील मिथकांवर नको

तितका विश्वास ठेवत या बायकांकडे तुच्छतेने बघतो. अशावेळी वाटते या कष्टकरी बायकांमध्ये कुणाला आपली आई, बहीण वगैरे का दिसू नये? बारीकसारीक चुकांवरून त्यांना अद्वातद्वा बोलणारे मारहाण करणारे नवरे स्वत:च्या नाकर्तेपणाबद्दल स्वत:ला दोषी का समजत नाहीत?

आपण असंही ऐकतो की, सीता, तुलसी, लक्ष्मी यांना घराबाहेर काढणारे दुसरे तिसरे कोणी नसून, ज्यांची आपण पूजा करतो ते साक्षात देवच होते. पातिव्रत्याच्या चुकीच्या कल्पनांनी त्यांची मनं कलुषित झाली होती. तीच तऱ्हा आणि तेच भोग या कष्टकरी बायकांच्या वाट्याला येतात. नवऱ्यानं सोडून दिलेली बाई म्हणून जगण्यापेक्षा मृत्यूला कवटाळणाऱ्या किंवा नवऱ्याच्या लाथाबुक्क्या सहन करणाऱ्या या बायका मला पुराणातील कोणत्याही पतिव्रतेपेक्षा कमी दर्जाच्या आहेत, असं वाटत नाही.

'यत्र नार्यस्तु पूज्यते रमन्ते तत्र देवत:।' याप्रमाणे मला या कष्टकरी बायकादेखील पूजनीय वाटतात. पातिव्रत्य म्हणजे पुरुषांची आंधळी भक्ती नव्हे. दुसऱ्या पुरुषाच्या अंगठ्याकडे पाहिल्याने शीलभंग होण्याइतकं शील किंवा पावित्र्य लेचंपेचं नसतं. हे दुसऱ्या कुणाला नाही; पण पुरुष म्हणून मिरवणाऱ्या त्यांच्या नवऱ्यांना तरी कळायला नको का? अशा वेळी 'नरेची केला हीन किती नर'! असं वाटल्यावाचून राहत नाही.

बरं, अशा बायकांकडे पाहणारी पुरुषी नजर चांगली नसते असं म्हटलं तर, आपल्यापैकी किती बायका अशा या कष्टकरी बायकांकडे चांगल्या नजरेने बघतात? की स्वत: चार भिंतींच्या आत स्वत:ला सुरक्षित समजून स्वत:ची फसवणूक करून घेत असतात? खानदानाच्या पोकळ बडेजावाखाली त्यांच्या अस्तित्वाची आणि आत्माभिमानाची राखरांगोळी होत असताना त्या मूग गिळून गप्प बसतात. आणि बोट दाखवायची वेळ आली तर, अशा या कष्टकरी बायकांवर शेणाचे शिंतोडे उडवून मोकळ्या होतात. अशा वेळी मला लेखिका ताराबाई शिंदे यांनी स्त्रीपुरुष समानतेसंदर्भात एकोणिसाव्या शतकात मांडलेले विचार आजही प्रत्यक्षात उतरलेले दिसत नाहीत, याची खंत वाटते. खरी गरज आहे, ती स्त्रियांनी स्त्रियांकडे डोळे उघडून पाहण्याची. कार्यालयात बसून पंख्याची हवा येत नाही म्हणून कुरबूर करणाऱ्या आम्ही बायकांनी कष्टकरी बायकांचं उन्हापावसातील राबणं, तब्येतीची हेळसांड करणं, आदि गोष्टींकडे स्त्रीत्वाच्या नजरेने पाहायला नको का? एकमेकांचे वाढदिवस तसेच जागतिक महिला दिनासारखा जाहीर कार्यक्रम करताना या कष्टकरी बायकांचाही बरोबरीनं विचार करायला नको का? त्यांना मदत करणं, ही तर फार दूरची गोष्ट आहे. नुसतं माणूस म्हणून जरी प्रेमानं आणि आदरानं वागवलं, तरी या भूमीशी आणि नदीशी नातं सांगणाऱ्या बायकांचे ऋण फेडल्यासारखे होईल.

लक्ष्मीच्या मागून चांडाळवाडपर्यंत पोहोचणाऱ्या या बायकांना व्यवस्थेने मानाचा मुजरा करावा. अजूनही दिवस उजाडायची वाट बघणाऱ्या या बायकांना, आपल्यातील अर्धा घास देता आला तर, बिनकष्टाचा न देता त्यांच्या कष्टाला योग्य दाम देऊन देता येईल का, याचा जरूर विचार करावा. आपल्या अर्थव्यवस्थेमध्ये मोलाची भर घालणाऱ्या या बायकांकडे स्त्रियांनी पुरुषी चष्म्याने न बघता स्त्रीत्वाच्या नजरेने पाहावं. वाढत्या महागाईबरोबर वाढीव महागाई भत्ता मागणाऱ्यांनी या कष्टकरी बायकांचीदेखील आर्थिक उन्नती व्हावी म्हणून, घासाघीस न करता भाजी, मासे, फळे, फुले इत्यादी गोष्टींची खरेदी करायला हरकत नाही. एकूणच स्त्रीपुरुषांच्या कष्टाला समान सामाजिक दर्जा देणं ही आजच्या काळाची गरज वाटते.

'कर्तृत्ववान' या शब्दाच्या व्याख्येमध्ये फक्त शिकली–सवरलेली आणि नोकरी किंवा प्रतिष्ठित व्यवसाय करणारी माणसं मोडतात का? स्वत:ची तहानभूक विसरून, कुटुंबासाठी म रणयातना भोगणारी ही माणसं, कोणतंच कर्तृत्व दाखवत नाहीत का? अशावेळी मला एक पुराणातील मिथक आठवतं, ज्यामध्ये वाली नावाच्या वानराने, राम आणि सुग्रीव यांच्यासमोर आपली पत्नी तारा हिची प्रशंसा करताना म्हटलंय,

*'सुशेन दुहितायमर्थ सूक्ष्म विनिश्चये।*
*औत्यातिकेच विविधे सर्वात:*
*परिनिष्ठीत।।*
*यदेषांसाध्वीती बृयात्कार्य तन्मुक्त*
*संशयम्।*
*नहि तारामतं किंचिदन्यथा परिवर्तते।।'*

सुशेनाची कन्या तारा सूक्ष्म गोष्टींचा निर्णय करण्याविषयी, आणि संकटे प्राप्त झाली असताना, त्यातून पार पाडणारे उपाय जाणण्यासाठी, सर्वप्रकारे अतिशय समर्थ आहे. ही जे म्हणते ते नि:संशय करीत जा. तारेने सांगितलेल्या व सुचविलेल्या कोणत्याही गोष्टीचा परिणाम विपरीत होत नाही. असा त्या संस्कृत श्लोकाचा मथितार्थ असला, तरी तारा नावाच्या वानरीचं म्हणजेच आपल्या पत्नीचं कौतुक करणारा वाली हा मातृसत्ताक व्यवस्था मानणारा, त्याकाळच्या व्यवस्थेचा प्रतिनिधी मानायला हरकत नाही. शेतीचा शोध लावून कुटुंबव्यवस्थेला स्थैर्य आणणाऱ्या स्त्रीची खरी ओळख आज आपण विसरत चाललोय. कष्टकरी बायकांच्या श्रमालादेखील नोकरी किवा व्यवसाय सांभाळणाऱ्या बायकांएवढीच प्रतिष्ठा आहे, याची जाणीव आज एकविसाव्या युगातही अभावानेच आढळते की, ज्याने या कष्टकरी बायकांना प्रश्न पडावा, आम्ही कर्तृत्ववान कशा?

***श्वेतल अनिल परब,*** *सावंतवाडी.*
*मोबाइल : ९४२३३०१८९२*

●●●

(पान २३ वरून)
दबाव असतो, कदाचित हा ताण हलका होईल. ‘हाऊस हजबंडस्’ची संख्या वाढेल. दुसरा फायदा म्हणजे लहान बाळांची काळजी घेणं, वृद्धांची जबाबदारी, त्यांना केला जाणारा मायेचा स्पर्श इ. बाबी पुरुषांनी घरात राहून केल्या तर त्यांचं मानसिक स्वास्थ्य चांगलं राहतं, असं मानसशास्त्रज्ञ म्हणतात, यावर अनेक संशोधनं झाली आहेत. निबंध लिहिले गेले आहेत. शिवाय, ज्या पुरुषांना घरातली कामं करायला तर आवडतं; पण मग घरीच बसून राहिल्याने, आपण काहीच कमवत नाही, असा न्यूनगंड येतो, तोही टळेल.


गृहिणींच्या घरकामाचं मूल्यांकन करताना आणि त्यानंतर तिला तो मोबदला देताना अर्थसाक्षर करणंही तितकंच महत्त्वाचं आहे. मुख्य म्हणजे हा मोबदला दरमहा काही वेतन वा वार्षिक काही रक्कम अशा कोणत्याही स्वरूपात असला, तरी त्या पैशावरचा संपूर्ण अधिकार त्या गृहिणीचाच असला पाहिजे. तो पैसाही घरातला पुरुषच हिरावून घेणार असेल, तर त्याला अर्थ नाही. आपल्याकडे तर कमावत्या बायकोचा संपूर्ण पगार स्वतःच्या खात्यात घेणारे आणि वर तिलाच प्रवासखर्चाचे पैसे ‘देऊ करणारे’ पुरुष भरपूर आहेत. बाहेर नोकरी करणाऱ्या आणि घरातही खपणाऱ्या महिला, मजुरी करणाऱ्या, शेतात राबणाऱ्या विशेषतः असंघटित क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांनी दुहेरी जबाबदारी पार पाडूनही बऱ्याच महिलांना आयुष्यात एकदाही मनाप्रमाणे हॉटेलिंग करता येत नाही वा एखादी साडीही विकत घेता येत नाही. त्यामुळे तिच्या पैशावरची तिची स्वायत्तताही तितकीच महत्त्वाची आहे आणि त्यासाठी तिला बँकेचे व्यवहार, बचत, गुंतवणूक इ. मूलभूत बाबींचं प्रशिक्षण देणंही गरजेचं आहे.

गृहिणींच्या घरकामाचं आर्थिक मूल्यांकन करताना त्यात एकल स्त्रियांचा अधिक सहानुभूतीने विचार करायला हवा. विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता तसंच अपंग महिला यांना इतर गृहिणींपेक्षा थोडा अधिक मोबदला देणं आवश्यक आहे. अशा महिलांना घरकामात कुणाची मदत मिळत नाही, तसंच त्यांच्या पुढील आव्हानं अधिक असतात, कुटुंबाच्या आर्थिक जबाबदाऱ्या पार पाडायलाही इतर कुणाची मदत नसते. सध्या विधवा स्त्रियांना संजय गांधी निराधार योजनेमार्फत पेन्शन दिली जाते, तसंच वृद्ध स्त्रियांना श्रावणबाळ योजनेनार्फत सरकारकडून पेन्शन दिली जाते. मात्र, त्याची रक्कम अतिशय नाममात्र आहे. अपंग महिलांना घरातली कामं करताना इतर महिलांपेक्षा जास्त शारीरिक श्रम पडतात, याचाही मूल्यांकन करताना विचार केला पाहिजे.

एकंदरीतच गृहिणींच्या घरकामाचं आर्थिक मूल्यांकन करण्याची वेळ तर आलीच आहे; पण घरकाम ही मुळातच केवळ स्त्रियांनी करण्याची गोष्ट नव्हे, ती कुणीही वा सगळ्यांनी करावी, हे ठसवण्याची आणि लिंगनिरपेक्ष घरकामाचा मोबदला देण्याची वेळ हीसुद्धा काळाची महत्त्वाची गरज आहे. या निबंधाच्या निमित्तानं यातील मुद्द्यांवर उलटसुलट, आडवीतिडवी चर्चा जरी सुरू झाली, तरी लिहिण्याचं ईप्सित साध्य होईल.

***प्रियांका तुपे,*** पुणे.
*tupriya2911@gmail.com*

●●●



अंक मिळाला नाही का?

‘मिळून साऱ्याजणी’चा प्रत्येक अंक दर महिन्याच्या १ तारखेला पोस्टाने रवाना होतो. जर वर्गणीदारांना दर महिन्याच्या २० तारखेपर्यंत अंक मिळाला नाही तर त्यांनी सोमवार ते शुक्रवार दुपारी १२ ते ५ या वेळात ‘मिळून साऱ्याजणी’च्या ७४४७४४९६६४ या मोबाईल क्रमांकावर आपली तक्रार द्यावी. म्हणजे आम्हाला आपला अंक परत पाठवता येईल. पुण्यातील वर्गणीदारांनी वर्गणीचे धनादेश पाठवले तरी चालतील; पण बाहेरगावाहून धनादेश पाठवताना चेकवर मॅग्नेटिक स्ट्रिप आहे ना हे बघावे. आपण वर्गणी भरल्यानंतर लगेचच आपला पावती क्रमांक, दिनांक, नाव-पत्ता आणि वर्गणीचा कालावधी संगणकावर नोंदवला जातो. एखाद्या महिन्यात अंक आपल्याला पोचला नाही, तर लगेचच आपली तक्रार आपण ‘मिळून साऱ्याजणी’च्या कार्यालयात नोंदवावी म्हणजे आमच्याकडून काही चूक राहिली नाही ना, हे तपासता येईल.

**– व्यवस्थापक**

(पान २१ वरून)
बारीक निखळल्यासारखं वाटत होतं गौसला!

''कोन कुछ बी नै करते, मैं है नव्हे डर्णेका नै !''

''सब सच हाय, पन मेरा दिल नै मानता.'' तो.

बोलायची नाहीच ती, जबरदस्तीने जास्ती. मौनातल्या संमतीच्या प्रेमगोष्टी तिला कळायच्या, दोघांची समज एक व्हायची लगेच.

गुल्लीने दारातल्या गायीला गवत टाकून बिछान्यावर अंग टाकलं. गपकन लाईट गेली. सगळा अंधारगाव चिडीचूप. गौस कूस बदलून अंधार पिल्यासारखा लख्ख जागाच.

अंधारात पांढरी गाय, तिच्यावर गुल्लीची माया दुधाचे पैसे, बाबांची काळजी सगळं गोंधळून काळोख काळोख.

गायीचं काय करायचं?

गावात गाय विकत घेणारं तरी कोण?

गुल्लीला समजवायचं कसं?

बाबांची भीती खरी खोटी?

गाय विकायचं कारण तरी काय?

गाय घेतली तिने किडूकमिडूक करून, मोलमजुरी करून.

आईची माया करते.

नकोच विकायला.

आपल्याला कुठला कसला त्रास नाही गायीचा? पण,

एक चांगलं होईल गाय विकून हजारात पैसे येतील. गायनोकलॉजिस्ट् डॉक्टरला दाखवू या एकदा गुलनारला? या विषयावर नाहीच बोललो आपण कधी? स्वत:लाही तपासून घेऊ या.

उपाय असतील तर...

तर ...

तरच्या पुढे त्याने तिला जवळ घेतलं कुशीत मायेने डोक्यावरून फिरवत राहिला हात. गुलनार गुलज़ार झाली, उत्तरांचा हौशी उजेड गायीसारखा शुभ्र झाला.

मध्येच गाय हंबरली.

हंबरणाऱ्या गाईपेक्षा रडणाऱ्या चिमुकल्या बाळाचा, हसणाऱ्या छोट्याचा आवाज गोडच! चेहऱ्यावर स्मित हास्याचा गोडवा घेऊन त्याचा डोळा लागला.

कशीबशी समजूत घालून गाय शहरात विकायची, गुरुवार मोठ्या गावात बाजार असतो. बाजाराला जायचं.

दोन दिवस गुलनारगौस यांच्यात कमी संवाद, रात्री तिने त्याला जिंकू दिलं..

म्हणाली, जाऊया शहरात गाय घेऊन.

गुरुवार उजाडला तसं त्यानं घाई केली. समजावलं.

''उधारी के पैसे माँगकर ल्यो, ढिगभर पैसे आईंगे''

''गई नको भीकाने..''

''मेरा बी दिल नै मान रहा''

''पन ज्याना कल वहाँ हुये, हमारे यहां बी हुइंगा कब तो, कै को उसाबर'' गौस.

गुलनारच्या गालावरचा गोरेपणा गायबच.

गुल्लीचा पट्टा सुरूच. गौसनं गाईला अंघोळले.

बादलीभरल्या गंगेच्या पाण्यात त्याला सगळं बुडवून टाकावं किंवा स्वतःचा जीव द्यावा अशी किंचित कीव आली.

आपल्या गावातल्या गरिबांसाठी आपलं दुकान मोकळं जरी केलं तरी आपल्यासाठी काय वैकुंठविमान येणार नाहीच.

बीएच्या वर्षातला तुकोबाचा अभंग आठवला.

''आम्हा घरी धन शब्दांचीच रत्ने'' पण याच्या बोलत्या लिहित्या शब्दांनी याला धन मिळणार नव्हतं.

शब्दांनी सोडा, दुकानातल्या धान्यांनी मिळावं तर उसनवार उधारीच!

गायीचा बछडा सोडवून गायीला आणलं होतं विकत.

आता बायकोपासून सोडवून गायीला घेऊन जायचं.

''हां ना.'' करत दवाखान्याच्या आशेवर तिने व्यवहारी होकार दिला.

खुंट्याला बांधलेला दोर हातात घेतला. गाईच्या पुढे ती, पाठीमागे गौशागोचडी.

गुरुवार बाजार त्यात गणपती आणण्याचा दिवस. शहराच्या वाटेला लागलेली मंडळी, दुचाकी, छोट्या टमटम घेऊन गजाननाला आणण्यासाठीची लगबग. फाट्यापर्यंत गेल्यावर रस्त्यावर एखाद्या टेम्पोला हात करून जाऊया... लोकांची गडबड घाईघाई.

गुल्ली, गौस पायीपायी गाईसोबत.

''काय कुठं चाललावं?'' राम्याचा आगाऊपणा.

''शहरात गाय विकायला'' ती.

मनोज शहरातून शिकून आलेला भिडे मास्तरांचा चेला, चार दोघांसोबत रस्त्यावर. मोठ्या आमराईचा मालक त्यो.

''गौशा, कुठं रं, कसायला देशीलबिशील?''

''गाय आमच्या गौशाळेत दे.'' त्याच्या सूचनेत धमकी होती.

''योग्य किंमत देत असाल तर घ्या की... मी गाय शेतकऱ्यालाच विकणार आहे.'' डावा पाय वाकडा टाकत तो.

''दुभती गाय आहे ही'' मध्येच ती.

मनोज झपाझप पावले उचलत पुढे गेला.

शिवतीर्थाजवळ गाड्या थांबायच्या, शहराकडे जाणाऱ्या. काही खासगी वाहनं थांबलेली. चहा–टपरी पानशॉप सुरू एका कोपऱ्याला जय भवानी चहा स्टॉल. थांब्यावर गर्दी, दोघांनी चहा घेतला.

गावकरी, तरुण पोरं, मनू टोळीकंपू, गाडीवाले, गुरुवारचं माळवं घेऊन जाणारे शेतकरी. गणपती आणायला जाणारी भक्तमंडळी.

गाय विकायला जाणारे दोघे गौसगुलनार.

गाड्या थांबत नव्हत्या. गणपतीची गाणी गाणारे गोड गायकांचे गळे, गाणी, गप्पा, गणपती, गाजावाजा, गुरुवार, गाड्यांची ये-जा, गाय, गौशा, गुल्ली, गर्दीगोंधळ, गाण्यात गजर गाजत गर्जत होता. गौस थिजून तसाच गाईला घेऊन उन्हात कडेला आणि ती फतकल मारून बसलेली बाजूला. गाड्यागर्दी येत जात होती.. गाड्या थांबत नव्हत्या. अचानक समोरून येणाऱ्या टमटम टेम्पोतल्या तरण्या पोरांना बघून गौशा घाबरला. गुल्लीकडे हातात गाय देऊन, डाव्या पायावर भार देत उन्हात गौस थांबला गाय, गुलनार, गुरुवार. गजानन गजर, गर्दीचा गोंधळ, गाण्याचा गोडवा, गायनॉकलॉजिस्ट्, गचाळ गरिबीचा गच्च गिच्मिड राग या सगळ्यांची चीड गोचिड गौसच्या डोक्यात गुळगुळली. गौश्याने गायीकडे अन् गुलनारकडे दीर्घश्वास घेत नजर फेकली. गाडीला हात न करता थांबला गप्प. इकडे गुपचुप गुलनार गायीसोबत गावच्या वाटेला गावाच्या दिशेने. रस्त्याकडेच्या गवतकाड्या गाय रवंथ करत मागोमाग.

गच्च गोंधळाला गाडून गरीब गौस थिजलेला, टेम्पोवरचे पोस्टर आणि घोषणा ऐकून.

गौमाता की जय,
गोमय्या जान-हमारी शान.

गोबरसे करो इलाज
गौशाला से जुडिये आज !

गायमां जीवनदायी
मूत्रमें ममता समायी.

गुलनारच्या मागे गाय मागे गौस...
गौणमौन होतं सगळं
गाणे गुणगुणत गौस भीती गायब करत होता की गुलनारची तारिफ
गोरी तेरा गांव बडा प्यारा
मैं तो गया मारा...

गयाच्या ऐवजी गाय झालं की खरंच मारले जाऊ.

गौस गपला.. गप्पगार

गोचिडीगत गोवलेली भीती गाडायचा प्रयत्न करून गप्प परतू लागला. गुल्ली गाय गौस निघाले परत गाय घेऊन गावाकडे.

गळीतगात्री गौसला मात्र गंभीर काही लिहायचं सुचत होतं..

लिहायचंय, बीज रुजू लागलंय आत, गच्च लिहायचंच जाऊन म्हंजे आत आहे ते वर उतरवू कागदावर.

शीर्षक तयार झालंय- 'ग'ची बाधा

***साहिल कबीर***

●●●

## आपुलकीचं आवाहन

सस्नेह नमस्कार,

ऑगस्ट २०१९ला साऱ्याजणीनं ३० वर्षं पूर्ण केली. त्यानिमित्तानं आम्ही 'मिळून साऱ्याजणी' ह्या आपल्या मासिकाच्या संदर्भात नवनवीन कल्पना आणि उपक्रम यांच्या योजना आखल्या.

आपल्या भोवतीच्या मुख्य प्रवाहाकडे, त्यातल्या गलबल्याकडे बघताना, आपला स्वर वेगळा आहे हे लक्षात येतंच आणि तो जपण्याचीही गरज भासते. ऐकणं, बघणं, वाचणं, बोलणं यांच्या बहुतेक पातळ्यांवर इतका दिखावा, पोकळपणा, उथळपणा जाणवतो की, तिथे थांबावंसं वाटत नाही. पण असं निरीक्षण फक्त नोंदवून काय होणार? या जाणिवेतूनच 'साऱ्याजणी' आपली भूमिका, आपला ध्यास, घट्टपणे जपण्याचा प्रयत्न करते आहे. त्यासाठी नवनवीन वाटा शोधण्याचा प्रयत्न करते आहे.

वाचकांनी स्वतःशी आणि परस्परांशी संवाद करावा यासाठी नवीन काही करू इच्छिते आहे.

विचार, संवेदनशीलता, सामाजिक न्याय, माणुसकी, समता या साऱ्यांचं अस्तर असणारं, विचार करायला लावणारं आणि तरी वाचनीय असं साहित्य सातत्यानं देता येईल, अशी आमची धडपड आहे. या सगळ्यासाठी साऱ्याजणीविषयी आस्था बाळगणाऱ्या तुमच्यासारख्या सर्वांची साथसोबत अतिशय आवश्यक वाटते. आपल्या परस्परांबद्दलच्या आपलेपणातून, म्हणूनच हे आवाहन करत आहोत की, 'साऱ्याजणी'च्या विकासासाठी, आहे ते सांभाळत, नाविन्याची भर घालण्यासाठी, तुम्ही जमेल तेवढा आर्थिक हातभार लावावा.

तुम्हा-आम्हामधल्या नात्यामुळेच या हातभाराला 'अनुबंध निधी' असं नाव दिलं आहे. आता विद्याताईंच्या निधनानंतर आणि कोरोना महामारीच्या संकटात तर आपल्या भरीव आर्थिक सहकार्याची अधिकच गरज आहे. ऐच्छिक प्रतिसादाची वाट पाहत आहोत.

**धन्यवाद,**
**गीताली वि. मं.**

स्मरणांजली!

# सच्चा अमेरिकन कवी : वॉल्ट व्हिटमन

सुप्रिया सहस्त्रबुद्धे

**अमेरिकन कवी, लेखक, पत्रकार, मुक्त छंदाचा जनक, मानवतेचे मूल्य रुजवणारा वॉल्ट व्हिटमन यांच्या दुसऱ्या मृत्यूशताब्दीनिमित्त त्यांच्या समग्र लेखणीचा घेतलेला आढावा.**

अमेरिकनच नव्हे, तर कोणत्याही इंग्रजी काव्यप्रेमींना वॉल्ट व्हिटमनचे स्मरण होणे अपरिहार्य आहे. कारण ३१ मे १८१९ ला मरण पावलेल्या या प्रभावशाली कवीच्या दुसऱ्या मृत्युशताब्दीचे वर्ष उलटून आहे. व्हिटमनने बालपणापासून कोणतेही औपचारिक शिक्षण घेतलेले नव्हते आणि त्याच्या करिअरची सुरवात ऑफिस बॉय म्हणून झाली होती. पण वृत्तपत्रे, मासिकांमध्ये लिहिता लिहिता सरकारी कारकून, निबंधकार, भटकणारा शिक्षक, पत्रकार अशा विविध भूमिका तो करत गेला. अमेरिकन यादवी युद्धात आपण होऊन परिचारक म्हणून काम करण्यासाठी तो गेला होता. पुढे तो डेम क्रॅटिक राजकारणीही बनला. पण व्हिटम नची मुख्य व खरी ओळख मानवतावादी कवी अशीच आहे. अमेरिकन काव्यावर मोठा प्रभाव टाकणाऱ्या या कवीच्या संगीतकारांनी संगीतबद्ध केलेल्या कविता आजही लोकप्रिय आहेत. त्याला कवितेच्या मुक्त छंदाचा जनक मानले जाते. अनेक समीक्षकांनी त्याला अमेरिकेचा राष्ट्रकवी, अमेरिकेचा पहिला 'लोकशाहीचा कवी' मानले आहे. मेरी बेरेन्सनच्या मते, व्हिटमनने अमेरिकेची संस्कृती अशी काही मांडली आहे की, व्हिटमन व लीव्हज ऑफ ग्रास यांना वगळून तुम्हाला अमेरिका समजणारच नाही. ऑस्कर वाइल्ड, मॉडर्निस्ट कवी इझरा पाउंडपासून, समीक्षक हॅरॉल्ड ब्लूम, महान उद्योगपती एंड्र्यू कार्ने जीपर्यंत कित्येकांनी त्याला सर्वश्रेष्ठ अमेरिकन कवी अशी मान्यता दिली आहे. त्याचे व्यक्तिमत्त्व असे विलक्षण की १९५०-६०च्या दशकातील बीट चळवळीने त्याच्या जीवनशैलीला आपला आदर्श मानले होते व आपण त्याच्या wild children पैकी आहोत, असे म्हटले होते आणि ब्रॅम स्टोकरने त्याला आपल्या ड्रॅक्युलाच्या निर्मितीचे मॉडेल मानले होते. व्हिटमनच्या मरणापर्यंत स्टोकर त्याच्या संपर्कात होता. त्याच्या शवयात्रेला सामान्य जनांचीही अफाट गर्दी लोटली होती. आजही अमेरिकेत त्याचे पुतळे, तसेच वॉल्ट व्हिटमन ब्रिज, वॉल्ट व्हिटमन हायस्कूल, वॉल्ट व्हिटमन शॉप्स वगैरे स्मारके विद्यमान आहेत. वॉल्ट व्हिटमन कम्युनिटी स्कूल ही एलजीबीटी तरुणाईसाठीची पहिली शाळा होती आणि २०१३मध्ये एलजीबीटी लीगसी वॉकमध्ये त्याच्या स्मृतीचा सन्मान केला गेला होता. एकोणिसाव्या शतकातील या कवीचे २००९मध्ये न्यू जर्सी हॉल ऑफ फेममध्ये आदराने स्मरण केले गेले.

अमेरिकन यादवी युद्धाच्या प्रारंभाच्या वेळी व्हिटमनने देशभक्तीची प्रेरणा देण्यासाठी "Beat! Beat!Drums!" ही कविता लिहिली. त्याचा भाऊ जॉर्ज आघाडीवर लढत होता आणि तिथल्या वास्तवाबद्दल तपशीलवार पत्रे लिहित होता. त्या काळातील एक आठवण त्याने दिली आहे. १६ डिसेंबर १८६२ला न्यूयॉर्क ट्रिब्यूनने जखमी सैनिकांची यादी प्रसिद्ध केली. तिच्यात जॉर्जचे नाव होते. ते पाहताच व्हिटमन तातडीने त्याला शोधायला निघाला. वाटेत त्याचे पैसे चोरीला गेले. माहिती मिळवण्यासाठी महत्त्वाच्या माणसांना भेटायचे प्रयत्न करताना काही वेळा त्याला दिवसरात्र पायी फिरावे लागत होते. अखेर जॉर्ज जिवंत सापडला व तो फारसा जखमी झालेलाही नव्हता. पण जखमी सैनिक आणि त्यांच्या तुटलेल्या अवयवांचे ढीग पाहून व्हिटमन इतका अस्वस्थ झाला की, त्याने वॉशिंग्टनची वाट धरली आणि न्यूयॉर्कला कधीही परतायचे नाही असे ठरवले. Drum-Taps मधील अनेक कविता व Memoranda During the War मध्ये त्याच्या या अस्वस्थतेची छाया आहे. अमेरिकेच्या विस्तारशीलतेपेक्षा तिच्या तेव्हाच्या वर्तमान व भविष्यकालीन ऱ्हासाविषयीची जाणीव त्याला ग्रासत असलेली इथे दिसते.

गुलामगिरीविरुद्ध लढा देणारा अमेरिकेचा महान नेता आणि राष्ट्राध्यक्ष

अब्राहम लिंकन याची हत्या झाल्यावर व्हिटमनने त्याला श्रद्धांजली वाहणारी दोन गांभीर्यपूर्ण मृत्युगीते लिहिली. त्यातील "O Captain! My Captain!" प्रसिद्धच आहे. जहाजाच्या रूपकात वर्णन केलेले हे मृत्युगीत सुगम असल्यामुळे आपल्याकडच्या शालेय इंग्रजी पाठ्यपुस्तकांतही अनेकदा आले आहे. अमेरिकन यादवी युद्ध हा अमेरिका या जहाजाचा खडतर प्रवास होता आणि हे जहाज विजयी होऊन सुरक्षितपणे बंदरात आले आहे. प्रचंड जनसमुदाय हार, पुष्पगुच्छ घेऊन त्याला मानवंदना देण्यासाठी किनाऱ्यावर जमला आहे. पण त्याचा कॅप्टन मात्र उभे राहून मानवंदना स्वीकारत नाही आहे. निनादणाऱ्या विजयघंटांचा वा बिगुलचा घोष ऐकत नाही आहे. कवीही जल्लोषात सामील होऊ शकत नाही व मृत कॅप्टनजवळ शोकाकूल उभा आहे, असे तो म्हणतो. अमेरिकन यादवी युद्धाच्या अंताचे स्मरण करणाऱ्या या कवितेचा ताल रणांगणावरच्या सैनिकांच्या संचलनाचा आहे. प्रत्येक कडव्याचा शेवट Fallen cold and dead! असा होतो. व्हिटमनची ही एकमेव कविता अशी आहे; जिच्यात मुक्त छंदाचा जनक असलेल्या या कवीने मुक्त छंद वापरलेला नाही. आठ ओळींचे एक अशी तीन कडवी रचून त्याने तिच्यात AABBCDED अशा विशिष्ट यमकाचा वापर केला आहे. १९८९ मध्ये आलेल्या रॉबिन विल्यम्सच्या "Dead Poets Society' या लोकप्रिय चित्रपटात या कवितेचा परिणामकारक वापर केला गेला आहे. दुसरे मृत्युगीत म्हणजे "When Lilacs Last in the Dooryard Bloom' ही मुक्त छंदात लिहिलेली २०६ ओळींची दीर्घ कविता आहे. पारंपरिक पॅस्टोरल एलेजी या प्रकारच्या या कवितेत अवघ्या अमेरिकेच्या त्या वेळच्या शोकाकुलतेचे प्रतिबिंब पडले आहे. लिंकन किंवा त्याच्या हत्येच्या परिस्थितीऐवजी त्याने लायलॅक फुले, निखळणारा तारा वगैरे प्रतीकांचा वापर केला आहे. पॅस्टोरल एलेजीच्या प्रथेप्रमाणे कवितेत शोकाची जागा हळूहळू मरण या सत्याच्या स्वीकाराने घेतली आहे. युद्धातल्या कारुण्याचे दर्शनही तिच्यामध्ये घडते.

Leave s of Grass ही व्हिटमनची सर्वांत महत्त्वाची रचना. त्याने स्वतःच्या पैशाने १८५५मध्ये प्रसिद्ध केली. तिला दुहेरी प्रतिसाद मिळाला. थोरोने तिचे कौतुक केले. इमर्सनने पाच पानी पत्र लिहून तिच्यावर स्तुतीचा वर्षाव केला. त्याच्या मते बुद्धिमत्ता व शहाणपण यांच्या संयोगाचे असामान्यदर्शन घडवणारी अशी कलाकृती अमेरिकेत प्रथमच निर्माण झाली होती. दुसऱ्या बाजूला पीटर लेस्लीसारख्या काहींनी, बहुधा विशेषतः समलैंगिकतेच्या संदर्भामुळे, व्हिटमनची संभावना भोंदू गाढव अशी करून कविता अश्लील व कचऱ्यात फेकण्याच्या लायकीची ठरवून टोकाची प्रतिक्रिया दिली होती. स्वतः व्हिटमनच्या मते तिच्यात माणसामाणसामधला सुंदर व सुजाण जिव्हाळा टिपण्याचा व सामान्य माणसापर्यंत पोचू शकणारे खास असे अमेरिकन महाकाव्य रचण्याचा प्रयत्न होता, अमेरिकन 'स्वातंत्र्याबद्दलचा गर्व व धृष्टता' होती आणि अजून नीट न घडलेल्या अमेरिकेचे मन आशियाई आणि युरोपियन भूतकाळाच्या घुसमट करणाऱ्या लोकशाहीविरोधी सत्ताधीशांपासून मुक्त करण्यासाठी या गोष्टींची गरज होती. १८९२ मध्ये मृत्यू येईपर्यंत तो या संग्रहावर काम करत त्याचा विस्तार करीत राहिला व त्याच्या सात आवृत्त्या निघाल्या. १८५५ मधल्या आवृत्तीच्या प्रस्तावनेत त्याने म्हटले आहे की, 'तुम्ही खरे कवी असाल तर तुमचा देश व तुम्ही परस्परांना प्रेमाने आत्मसात केलेले असते. कवी व त्याचा समाज यांचे जैविक नाते असते. कवी हा परमेश्वराचा खरा पुत्र असतो आणि तो जगाकडे विस्कळीत असे न पाहता एकरूप म्हणून पाहतो'.

"Passage to India' ही त्याची



शेवटची कविता होती. पुढे १९२४मध्ये ई. एम. फॉर्स्टरने आपल्या कादंबरीसाठी हे शीर्षक निवडले. या शीर्षकातूनच त्याचा पौर्वात्य संस्कृतीचा व गूढवादाचा ध्यास दिसतो, पण भौतिक जग त्याला बिनमहत्त्वाचे वाटत नाही, तर ते आध्यात्मिक जगाकडे जाण्याचे वाहन वाटते. भौतिक विश्वाला डावलून किंवा नाकारून नव्हे तर मिठी घालूनच तुम्ही आध्यात्मिकतेकडे जाऊ शकता, असे मत तो मांडतो. त्यामुळे, या कवितेत प्रथम तो भौतिक शास्त्रे व उद्योगातील यशाचे गुणगान करतो, पण मग मात्र आत्म्याच्या प्रवासामध्ये त्याचे मन गुंतून राहते. भारताला त्याने संस्कृती व धर्म यांचा ऐतिहासिक पाळणा व आध्यात्मिक प्रवासाचा प्रतिनिधी म्हटले आहे. मात्र कवितेच्या शेवटच्या भागात त्याचे ध्येय "Passage to more than India!' असे होऊन जाते. एकोणिसाव्या शतकात सुएझ कालवा, आंतरखंडीय रेल्वेमार्ग, एटलांटिक केबल वगैरेची निर्मिती झाली. भौतिक शास्त्राच्या या प्रगतीचे, दूरसंचार व दूरविहाराचे स्वरूप पाहून व्हिटमनने आता जग आध्यात्मिक एकतेच्या निर्मितीचे अंतिम कर्तृत्व साध्य करण्यासाठी सिद्ध झाले आहे, असे म्हटले होते. आज त्या आशावादाचे काय झाले आहे, ही गोष्ट वेगळी! पण तरीही व्हिटमनसारखे कवी भविष्याविषयी आशावादी स्वप्ने मांडताना थांबत नाहीत व थकत नाहीत.

***सुप्रिया सहस्रबुद्धे***, *पुणे.*
*supriyasyoga@yahoo.com*

●●●

## कविता


### तिचं जगणं म्हणजे...

तिचं जगणं म्हणजे
जणू बुद्धिबळाचा पट
त्या साम्राज्यात ती राणी;
आसपास प्यादे, उंट,
हत्ती, घोडे, वजीर
तसे सगळे अडाणीः

कोणी चाले फक्त सरळ
कोणी फक्त तिरका
कोणी एकच घर ओलांडून
तर कोणी अडीच घरं
कोणी बांधील हुकुमाला
राहतात मर्जी सांभाळूनः

त्या पटावरही आहे
राणीच्या अवतीभवती
कडेकोट बंदोबस्त
एकही चाल चालायला
अनाम अशी बंधनं,
पण तिची एकच चाल
बदलून टाकते डाव
भले जगात कितीही
दाखवू दे नुसताच आव..

***मंजिरी सरदेशमुख,*** *सोलापूर.*
*मोबाईल : ९८५००७३०९३*



### आवडतं मला व्यक्त व्हायला...

आवडतं मला व्यक्त व्हायला
विचारांच्या जाळ्यात अडकून पडायला
अडकलेल्या जाळ्यातील शब्द वेचायला
वेचलेले शब्द वाक्यात ओवायला
ओवलेले वाक्य अर्थाने सजवायला
सजलेल्या वाक्याचे लिखाण करायला
लेखणीच्या स्पर्शाने अक्षरे लिहायला
लिहिलेले पान हे व्यक्त करायला
आवडतं मलाही व्यक्त व्हायला
आवडतं मलाही व्यक्त व्हायला

***भारती सातपुते,*** *पुणे.*
*मोबाईल : ८००७७७७५८८.*

### बिनशाळेची पोरं

या शुकशुकाट रस्त्यांच्या सुन्नबधीर काळात
पोराबाळांच्या बंद शाळा
ऑनलाईनच झंझट लागलंय त्यांच्या मागे
कमी करा म्हणता म्हणता स्क्रीन टाइम वाढलाय
लॅपटॉपवाले मूठभर; हँडटॉपवाले ढीगभर
नि बिन टॉपवाले शीगभर
सैरभैर पांगलीत भिंतीतली पोरं
डांबून ठेवणारी बंद घरं
कुणी शिकताहेत काहीबाही
कुणी काहीच नाही
शाळा ना भिंतीत अटकलेली ना तारेवर लटकलेली
ना निसर्गात भटकलेली
विस्थापित झालेली कष्टकऱ्यांची घरंदारं
तिथे शाळेची काय कथा
बिनशाळेची पोरं उसतोडणी वीटभट्टी झाडूफर्शीवर
हे जीवन शिक्षण मंदिर म्हणावे
की जेवण शिक्षण मंदिर गणावे
कदाचित दोन्हीही बरोबर असावे

***शोभा बडवे,*** *मालेगाव.*
*मोबाईल : ९३२५५०९६७७*

## उषा

तू मीट नीट
टाक तुझे आकार विकार
स्थिर शांत हो!
मग उघड, उलगड
व्यक्त हो,
माझ्या नजरेतून!
माझ्या दंडावर स्थिरावलेले
तुझे नाजूक हात
घे काढून!
आता पडू देत
तुझी पाऊले
आत्मभानाच्या दिशेने
ते पाहा क्षितिज
उजळलेय उषेने!

***मुबारक शेख,*** *सोलापूर.*
*मोबाईल : ९६६५२५७१९१*



गॅसवर तवा तसाच तापता ठेवून
मी लिहून आलेय एक कविता
मोबाईलच्या नोटपॅडवर
मला काळजी वाटत होती
इतक्या निगुतीने केलेले
भावनांचे पूड
करपून जातील याची..
अताशा अताशा
मला समजायला लागलंय
लुसलुशीत फुलका
स्वतःच्याही ताटात घेऊन
चव वाढवता येते आयुष्याची
फक्त तयारी असू द्यावी लागते
काही वेळ तवा तसाच तापता ठेवून
मनातला गारवा ओठांवर येऊ देण्याची!

***योगिता पाटील,*** *चोपडा, जि. जळगाव.*
*मोबाईल : ९६०४९२४१५८*

## ती तर रोजचीच बॉस !

ऑफिसात जाणाऱ्या त्याचं काम
मोजलं जातं पगारात
महिन्याकाठी तो असतो घरचा बॉस
ती मात्र राबते रोजच्या रोज
पहाटेपासून रात्रीपर्यंत अन्
या कोपऱ्यापासून त्या कोपऱ्यापर्यंत
बाहेरच्यांचे प्रसन्न स्वागत करायची
सवय असलेल्या तिच्या पुढ्यात
आव्हानं असतात घरातलीही!
कधी कधी पाणीच येणार नसतं
अन् पाहुणेमंडळी आलेली असतात,
मग घराजवळच्या हातपंपावर,
नाहीतर शेजारणीच्या उपकारावरच
भागवावी लागते तहान तिला सर्वांचीच!
आता तर 'सुपरवूमन' म्हणून
गौरव केला जातो तिचा अन्
कामंच लादली जातात तिच्या माथ्यावर
सुखावलेपणाच्या बुरख्याआड तीही
झेलत राहतेच सारं निमूटमणे...
कारण ती असते 'रोजचीच बॉस'
मग तिला दिलं जातं मोठेपण तकलादू,
हे लक्षातच येत नाही तिच्या,
की लक्षात येऊनही कानाडोळा करते ती
अनाहूतपणे... मुद्दामच?
तरीही तिचं काम मोजलं जात नाहीच,
कुठल्याच पगारात, कुठल्याच महिन्याकाठी
कारण ती असते ना, 'रोजचीच बॉस'

***उत्तमकुमार इंदोरे,*** *पुणे.*
*मोबाईल : ९०११०१७७३५*

६ डिसेंबर महापरिनिर्वाण दिनानिमित्त

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महिलांचे अधिकार

छाया बेले

**‘स्त्री हे जातीव्यवस्थेचे प्रवेशद्वार आहे’ ह्या विधानातून बाबासाहेब आंबेडकर आपल्याला स्त्रीवादाची एक नवी दृष्टी देतात. ही दृष्टी कोणत्याही मुक्तिदायी चळवळीला धर्म, लिंग, वर्ग आणि जात यांना एकत्रितपणे भिडावे लागेल हेच सांगते. बाबासाहेबांच्या या महत्त्वपूर्ण स्त्रीवादी भूमिकेची उकल करणारा लेख.**

*पाण्यामध्ये मासा।। श्वास घेई कैसा।*
*जावे त्यांच्या वंशा।। तेव्हा कळे।*

संतांच्या या उक्तीप्रमाणे भारतीय समाजात स्त्रिया वर्षानुवर्षे अतिशय प्रतिकूल परिस्थितीत आपलं जीवन कंठत आहेत. त्यांचं माणूसपणच मान्य केलं जात नाही, तिथं त्यांच्या अधिकाराचा प्रश्नच उद्‌भवत नाही. पुरुषप्रधान समाजानं लादलेलं उपेक्षित जीवन त्या आपला जन्मभोग समजून जगत जातात. ‘हे सगळं देवानं निर्माण केलं आहे’, असं स्त्रियांच्या मनावर शेकडो वर्षांपासून बिंबवलं गेलं आहे. महिलांना कर्मकांडात गुंतवून त्यांच्यावर मानसिक गुलामगिरी लादली. उंबऱ्याच्या आत अडकवून त्यांचे अवकाश हिरावून घेतले. ‘चूल आणि मूल हेच तुझं जग आहे’, हेच तिच्या मनावर कायम गिरवलं गेलं.

वर्षानुवर्षे झालेल्या या संस्कारांतून स्त्रियांनीही या दुष्ट रूढी पूर्णपणे स्वीकारले आहे. एखाद्या कैद्याला कारागृहाची सवय व्हावी तशीच स्त्रियांना या गुलामगिरीच्या जोखडाची सवय झाली आहे. ‘खुले अवकाश आपल्यासाठी नाही’ असाच त्यांचा समज झाला आहे. मातृसंस्कृतीत राज्यकर्ता असलेला स्त्रीसमूह आपल्या कर्तृत्वाचं तेज आज हरवून बसला आहे. प्रस्थापित व्यवस्थेने या समूहाचा तेजस्वी इतिहास काळाच्या कृष्णविवरात दडपून टाकला आहे. त्यांच्या जगण्यावर अनेक निर्बंध घालून, त्यांना अस्तित्वहीन जीवन जगण्यास भाग पाडले आहे. त्यांचं जगणं–मरणं, हसणं–रडणं, चालणं–बोलणं, श्वास घेणंही पराधीन करून टाकलं आहे. अशा अर्धमेल्या अवस्थेत स्त्रीसमूह आपलं जीवन कंठत आहे. या शोषणव्यवस्थेच्या विरोधात बंड पुकारून क्रांतिबा महात्मा जोतिबा फुले व माय सावित्री यांनी ‘स्त्रियांना सन्मानाने जगण्याचा अधिकार आहे’, हे आपल्या उक्ती व कृतीमधून जगाला ठणकावून सांगितले. मुली शिक्षित झाल्या तर त्यांचे आत्मभान जागृत होईल, त्या आपल्यावर होणाऱ्या अन्यायाला, शोषणाला नकार देतील, म्हणून त्यांनी मुलींसाठी शाळा काढून स्त्रीच्या विकासाचा मार्ग मोकळा केला. फुले दाम्पत्यांनी अडचणींच्या पहाडाचा सामना करत जन्मभर स्त्रीमुक्तीचे कार्य केले. खरं तर त्यांच्या कार्याला स्त्रीमुक्तीचे कार्य म्हणणे हा संकुचितपणा ठरेल. त्यांचं कार्य हे मानवमुक्तीचं महान कार्य आहे. मानवसमूहातला अर्धा समूह गुलामगिरीत जगत असेल, तर मानव समाज विकास करत आहे, असे म्हणणे चुकीचे ठरेल. संपूर्ण मानवसमूहाला जर आपला उत्कर्ष साधण्यात कुठलीही अडचण येत नसेल तरच मानव मुक्त झाला, असे म्हणणे योग्य ठरेल. विश्वकल्याणाचा विशाल दृष्टिकोन ठेवून म. फुले व माय सावित्री या महामानवांनी अखेरच्या श्वासापर्यंत व्यवस्थेविरुद्ध लढा दिला.

पुढे म. फुले यांना गुरू मानून, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी स्त्रियांना न्याय मिळवून देण्यासाठी कायद्यात अनेक तरतुदी केल्या. महिलांच्या सर्वांगीण विकासासाठी समान अधिकाराची आवश्यकता आहे, हे बाबासाहेब जाणून होते. यासाठी शिक्षण ही मूलभूत गरज आहे. मुलींना शिक्षण घेता यावे म्हणून त्यांनी मुलींना मोफत शिक्षण मिळावे, अशी कायद्यात तरतूद केली. बाबासाहेब एवढ्यावरच थांबले नाहीत, हिंदू कोडबिलातून महिलांना संपत्तीत समान अधिकार बहाल केले, जेणेकरून महिलांवरील अत्याचार थांबतील व त्यांचं जगणं सुकर

होईल.

बाबासाहेब म्हणतात, 'कोणत्याही समाजाची प्रगती त्या समाजातील स्त्रियांच्या प्रगतीवरून लक्षात येते.' आजच्या शिक्षित म्हणवणाऱ्या समाजात स्त्रियांची काय अवस्था आहे? हा समाजाच्या आत्मपरीक्षणाचा विषय आहे. बाबासाहेबांना अपेक्षित असलेला सन्मान महिलांना मिळतो का? महिला आज कौटुंबिक, सामाजिक, आर्थिक स्तरावर सुरक्षित आहेत का? किंवा, या पातळ्यांवर स्वातंत्र्य, समता त्यांच्या वाट्याला येते का? या प्रश्नाचं उत्तर नाही असेच द्यावे लागेल. महिला जरी शिक्षण घेऊन सर्व क्षेत्रात कार्यरत असल्या तरीही त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा पारंपरिक दृष्टिकोन अजूनही बदललेला नाही.

आजच्या प्रगत समाजात कमावत्या मुलीच्या लग्नात हुंडा घेतला जातो. हुंड्यासाठी छळ, खुनासारख्या घटना घडतात, स्त्रीभ्रूणहत्याही होते. बाईने चूल आणि मूल सांभाळून नोकरी करावी, सोबतच सर्व घरकामाची जबाबदारी एकटीने आणि घरातील सगळ्यांचं मूकपणे ऐकून आदर्श गृहिणी व्हावं अशा अवास्तव अपेक्षा घरातील लोकांच्या असतात. नोकरीच्या ठिकाणीही महिलांना पुरुषसत्ताक मानसिकतेला सामोरं जावं लागतं. समाजात अन्यायाविरुद्ध आवाज उठवणाऱ्या महिलेला अनेक दूषणं लावून मानहानी करण्याचा प्रयत्न केला जातो. हे सगळे आजमितीला सुरू आहे. हे सगळं व्यवस्थेला तिचं माणूसपण मान्य नसल्याचंच निदर्शक आहे.

खरं तर, स्त्रियांना संविधानानुसार सगळे अधिकार कागदोपत्री मिळाले असले तरी अजूनही प्रत्यक्ष समाजजीवनात पारंपरिक अलिखित नियमानुसार सगळे व्यवहार सुरू आहेत. सगळे बदल वरवरचे आहेत. अजूनही स्त्रीची घुसमट थांबलेली नाही. पूर्वापार चालत आलेलं हे दुष्टचक्र थांबावं म्हणून बाबासाहेबांनी स्त्रियांना हिंदू कोडबिलातून समान अधिकार बहाल केले. त्यातील सर्वात महत्त्वाचा अधिकार मुलीला मुलाप्रम ाणे वारसाहक्काचा आहे. घरातील संपत्तीत समान अधिकार असतील तरच स्त्रियांना सन्मानाने जीवन जगता येईल, हे बाबासाहेब जाणून होते. ते जर नसतील तर तिच्या वाट्याला आश्रितासारखं जगणं येईल ते येऊ नये म्हणून त्यांनी हिंदू कोडबिलाद्वारे मुलींसाठी वारसाहक्काची तरतूद करून ते पास करून घेण्यासाठी एकाकी लढा दिला.

पुरुषसत्तावादी मानसिकतेच्या महिलांनीच हिंदू कोडबिलाला कडाडून विरोध केला ही खरी शोकांतिका. आज कायद्याने वारसाहक्क स्वीकारला असला तरी, समाजमनाने तो स्वीकारलेला नाही. आजही स्त्रीला आपला अधिकार मिळवण्यासाठी वर्षानुवर्षांची दीर्घ लढाई लढावी लागते. अनेक मानसिक ताणतणावला सामोरं जावं लागतं. कधी सामाजिक तर कधी आपल्याच म्हणवणाऱ्या लोकांकडून कौटुंबिक बहिष्कार घातला जातो. या सगळ्या गोष्टींना घाबरून महिला आपला अधिकार मागण्याच्या भानगडीत पडत नाहीत. निराधार अवस्थेत आपलं जीवन कंठत असतात. कुणाचाही भक्कम आधार नसल्याने, भावनिक वेष्टनात गुंडाळून समाजाने लादलेल्या नात्यांची गुलामगिरी करण्याशिवाय पर्याय उरत नाही. तिने प्रवाहाच्या विरुद्ध जाऊन अन्यायकारक रूढींना नाकारण्याचा प्रयत्न करताच समाजाकडून अनेक आघाड्यांवर तिच्यावर हल्ला करून, तिला हतबल करून तिची मागणी दडपून टाकण्याचा प्रयत्न केला जातो.



वारसाहक्काच्या मागणीबाबतही हेच घडतं.

स्त्रियांना न लढता संपत्तीमध्ये समान अधिकार मिळेल, तेव्हा स्त्रियांना खऱ्या अर्थाने सन्मानाने जगता येईल. याकरता स्त्रियांनी सद्सद्विवेकबुद्धी जागृत ठेवून, कुठल्याही दडपणाखाली न येता आपल्या हक्कासाठी समोर येऊन लढायची तयारी दाखवायला हवी. अधिकारासाठी लढणे हा कुठलाही गुन्हा नाही.

समाजात बदल घडवून आणण्यासाठी कोणीतरी सुरुवातीचं पहिलं पाऊल उचलणं गरजेचं आहे. ही लढाई मानवसमूहाच्या अर्ध्या भागाची आहे, म्हणूनच हे मानवमुक्तीचं महान कार्य आहे. शोषणविरहित समाजनिर्मितीसाठी सर्व स्तरांवर समानता येणे आवश्यक आहे. याकरिता मुलींना मुलांप्रमाणे वारसाहक्क मिळणे अत्यंत आवश्यक आहे. या दिशेने वाटचाल करण्यासाठी प्रत्येक महिलेने पुढाकार घ्यायला हवा. तरच महामानवाच्या संकल्पनेतील निकोप समाज निर्माण करता येईल.

**_छाया बेले,_** नांदेड.
*chhayabele15@gmail.com*

•••

मनोगत

# आईविषयी...

प्रतिमा इंगोले

**ज्येष्ठ लेखिका प्रतिमा इंगोले यांच्या आईचा स्मरणदिवस २८ डिसेंबर असून त्यानिमित्तानं त्यांनी आईविषयी लिहिलेलं मनोगत अगदी हृद्य आहे.**

खरंच, आई–लेकराचं विश्वच असते. हा अनुभव केवळ आजारपणामुळेच मला नव्याने आला. आई आणि मी पुण्याला गेलो. कामं आहेत म्हणून नवरोजींनी पळवाट शोधली. मला तर महत्त्वाचं काम होतं. घरचं आणि बाहेरचं दोन्ही काम आता पूर्वीसारखी जमत नाही. मिळालेल्या मधुमेहाच्या देणगीमुळे थकायला होतं. त्यामुळे म्हटलं, आई येते आहे, तर तेवढाच आधार. पण जो आधारच भक्कम ठरला. तिथे जाऊन जीवघेणा आजार आला. गावापासून दूर. जवळ कोणीच नाही. फक्त आई आणि आईच.

असा अनुभव खरं तर येऊ नये, पण आला. आजारपणात जिव्हाळ्याचे चेहरे आठवत राहिले. नंतर तर शुद्धच गेली. आई तेवढी शुद्धीवर राहून धडपडत होती. रात्री तिच्या
सजगतेमुळेच माझा जीव वाचला. कारण डुलकी लागलेल्या डॉक्टरांना तिने हलवून आणले, म्हणूनच मी मृत्यूला हुलकावणी देऊ शकले. त्यामुळे पुन्हा एकदा डॉ. प्रभाकर मांडेंच्या शब्दांची प्रचिती आली. ते नेहमी म्हणतात, 'प्रतिमाताई, तुम्ही म्हणजे तुमच्या आईचा बहिश्चर प्राणच.' आजही तो संवाद मला लख्ख आठवतो.

माझ्या एका पुस्तकाच्या प्रकाशनाला मांडे घरी आले आणि नंतर त्यांच्याशी घरोब्याचे नातेच तयार झाले. त्यातच माझे 'वऱ्हाडी लोकगाथा' हे पुस्तक त्यांनी गोदावरी प्रकाशनतर्फे प्रकाशित केले. त्यामुळे त्यांच्या घरी येणे–जाणे वाढले. पुढे पुस्तक छापून झाले, तरीही पुण्याला जाता–येता सरांकडे जातच राहिलो. आता तर सरांपेक्षा ते काकाच झाले. एकदा त्यांच्याकडे गेलो असता ते म्हणाले, 'अरे, यावेळी तुमच्या आई नाही आल्या?'

'नाही. ती चक्कर येऊन पडली. हाताला प्लॅस्टर आहे.'

'अरे म्हणजे, पुन्हा दुःखच की! तुमच्या आई म्हणजे मला एक मिथकथाच वाटते. त्यांच्याकडे पाहताच असे वाटते, जणू साक्षात दुःखाचीच मूर्ती! त्यांच्या चेहऱ्यावरून वेदना जणू टपकत राहते.'

मला ते क्षणात पटले. कारण तत्पूर्वीच मी तिच्यावर एक 'मावळी' नावाची कविता लिहिली होती. त्यात खालील ओळी आहेत :

'दुःखाचे डोंगर । हसत झेलले ।
झाकून पुरले । मनातच ।।'
(भुलाई, पृ.२८)

वरील कविता १९९७मध्ये प्रकाशित 'भुलाई' कवितासंग्रहात आहे. पण त्यापूर्वीच मी ती लिहिली असावी, नव्वदच्या सुमारास. मी काकांना म्हटलं, 'हो. तिचं आयुष्य तसं दुःखातच गेलं. लहानपणी आई नव्हती आणि लग्नानंतर तीनच वर्षांनी ती विधवा झाली. मी तिची एकुलती एक मुलगी.'

'म्हणूनच त्यांचा तुमच्यात इतका जीव आहे. त्यावरूनच मी म्हणतो, तुमची आई म्हणजे 'मिथ' आहे. म्हणजे लोककथांमधील राक्षसाचा जसा पोपटात वगैरे जीव असतो, तसा तुमच्या आईचा तुमच्यात जीव आहे. तुम्ही म्हणजे त्यांचा बहिश्चर प्राणच. म्हणूनच तर मी मुद्दाम त्यांना मिथकथा म्हटलं.'

मला काकांचं म्हणणं पुन्हा एकदम पटलं आणि वाटलं, अरे, हे कसं आपल्या लक्षात आलं नाही. एखाद्यावरून जीव ओवाळून टाकणं वेगळं आणि एखाद्यात जीव असणं वेगळं. हाच फरक इतरांच्या आईत आणि आपल्या आईत आहे. कारण इतरांच्या आया–माता म्हणून मुलांना जन्म देतात. त्यांच्यावर जीव ओवाळून टाकतात. त्यांचे जीवापाड संगोपन करतात. त्यांच्यावर

संस्कारही करतात. आपल्या अपत्यांचे भले चाहतात. हे जरी सर्व खरे असले, तरी त्यांना इतरही अपत्ये असतात किंवा एखाद्या जोडप्याला एक अपत्य असले, तरी त्यांचा संसार सुरू असतो. त्यामुळे इतर व्यवधाने असतात. बहुतेकांच्या आयांचे असेच असते, त्यांना जगण्याची इतर प्रयोजने असतात. विरंगुळ्याची इतर साधने असतात. किमान इतर जवळचे नातेवाईक असतात. काही व्यवसाय असतात. छंद असतात. किमान त्या धार्मिक तरी असतात, पण आपल्याबाबत मात्र आपल्या आईचं जगण्याचं एकमेव निमित्त म्हणजेच केवळ आपण आहोत. त्यामुळे तिचे व्यवधान आपणच. तिचा विरंगुळा आपणच. तिचा छंदही आपणच. त्यामुळे हा महत्त्वाचा फरक पडतो. जो काकांनी नेमका ओळखला आणि नोंदवूनही ठेवला.

आईच्या आयुष्यात वयाच्या चौथ्या वर्षीच मातृवियोगाचे आवर्त आलं. तेव्हा तिने आपल्या वडलांचा धागा पकडून जगायला सुरुवात केली. पडता पडता कोळ्याने लाळेचाच धागा सर्वस्व मानून त्या पलीकडे जाऊच नये, तसे झाले. आधी तिचे आयुष्य वडील एके वडील असे होते. पण वडलांना शाळा होती, विद्यार्थी होते. तरीही ते जे जे म्हणतील, ते ती प्रमाण मानू लागली आणि त्या आवर्तनातून कशीबशी लग्नामुळेच बाहेर आली, तर पतीनिधनाचं दुसरं प्रत्यावर्त समोर उभं ठाकलं.

त्यापूर्वी सावत्र आईचं परकेपण पुढ्यात होतेच. कारण ही सावत्र आई, आईची पहिली आई. तिला मूलबाळ नव्हतं, म्हणून आईची आई घरात आली, पण ती फक्त मुलाबाळांपुरतीच झाली. कारण तीन अपत्यांना जन्म देऊन ती देवाघरी गेली. तिच्या मागोमाग यथायोग्य संगोपनाअभावी तिची दोन मुलंही तिलाच भेटायला गेली. राहता राहिली आई. आई पहिले अपत्य म्हणून थोडी सटकर होती. कुटुंबातले वादळवारे सोसण्याची तिची क्षमता जास्त होती. कदाचित मुलगी म्हणूनही तिला प्रतिकारशक्ती जास्त लाभली असावी. तरीही, आईच्या अकस्मात मृत्यूमुळे ती उन्मळून पडली असावीच. त्या घटनेचे तिच्या बालमनावर उमटलेले ओरखडे तिच्या आयुष्यावर परिणाम करीत गेले. तिला निराधारपण घेरून उठले. त्यात पोरवयात लाभलेल्या परकेपणाच्या वागणुकीमुळे ती अधिकच बावरली. त्या बावरलेपणात परकेपणा भर घालत असतानाच ती बोहल्यावर चढली. जिव्हाळ्याच्या शोधात हा तिचा नवा प्रवास सुरू झाला.

पण लग्नानंतर लगेच तिसऱ्या वर्षीच आलेलं पतीवियोगाचं महाआवर्त मात्र तिला जीवघेणे ठरले. त्यामुळे जिव्हाळ्याच्या शोधात असणाऱ्या तिला जो वटवृक्ष सापडला होता, तोही उन्मळून पडला आणि तिच्या मनाच्या ठिकऱ्या होऊन त्या दोराफान उडाल्या. खरं तर या वेळी दुःखावेगाने तिने जीव त्यागला असता, अथवा बधीर मनाने विस्मृतीचा, अथवा पागलपणाचा आश्रय घेतला असता, पण या वेळी तिला असे करताच येईना. आतापर्यंत संटी असणाऱ्या तिच्या गळ्यात माझा रेशमी धागा अडकला आणि पुन्हा मग एकवार कोळ्याच्या धाग्याचीच पुनरावृत्ती करीत हा रेशमी धागा तिने कोशासारखा स्वतःभोवती लपेटून घेतला. दुःखाच्या म हाआवर्तातून बाहेर पडण्यासाठी माझे एकमेव निमित्त झाले व त्या पकडलेल्या धाग्याचा कोश बनवून तिने तिच्या व माझ्यापुरते आयुष्य



*श्रीमती विमलाबाई दादाराव कुकडे.*
*श्रीमती विमलआक्का श्यामराव ढाकरे (माहेरचे नाव)*

बंदिस्त करून टाकले. मी त्या वेळी फक्त दीड वर्षांची होते. आजोबांचे खानदानी कुटुंब. त्यामुळे तिला दुसरा पर्यायच नव्हता, असला तरी तिला तो स्वीकारायचा नव्हता. त्या काळी रूढी–परंपरांचा फास होता, कारण त्यामुळे स्त्रीचं जगणं म्हणजेच जाच होता. स्त्रियांभोवती तो जास्तच होता. त्यामुळे विधवा विवाहाचा प्रश्नच नव्हता. स्त्रियांना दुसऱ्या विवाहाचा मार्गच नव्हता. त्यात विधवा तर विचारात न घेतली जाणारी शापित व्यक्ती. अक्षरशः पोतेरेपण सोसणारी. मी आईच्या इच्छेमुळेच शिकत गेले. लग्नानंतर जिद्दीने एम.ए. झाले. घरी बसून एम.ए. करताना निवडक पुस्तकेच मला उपलब्ध झाली. पण माझे सुदैव असे की, त्यात ह. ना. आपटे यांचे 'पण लक्षात कोण घेतो?' मला उपलब्ध झाले. ते मी वाचले. जीवाचा थरकाप झाला. माझ्या आईचे विधवापण माझ्यासमोर उभे ठाकून मला वाकुल्या दाखवू लागले. कदाचित, यमूच्या जागी मला तीच दिसली असावी. पण त्यामुळे मला ग्रामीण स्त्रियांची दुःखं मांडण्याची प्रेरणा मिळाली. माझ्या हाती लेखणी आली. अप्रत्यक्ष निमित्त तीच ठरली.

विधवा झाल्यावर विरंगुळा

म्हणून आई शाळेत जायला लागली. सातवा वर्ग पास असणारी ती, मॅट्रिक झाली. कॉलेजमध्ये गेली. इंटरही झाली, पण सासरी होणाऱ्या जाचामुळे परत इतकं शिकूनही माहेर परतली. अर्थातच, मला घेऊन. त्यामुळे तिला कॉलेजचे शिक्षण पूर्ण करता आले नाही. दानापूरला सातवीपर्यंतच शाळा होती आणि परगावी राहून एका विधवेने त्या काळात शिक्षण घेणे शक्यच नव्हते. आजोबांना शेतीमुळे तिच्याबरोबर परगावी जाणे जमणार नव्हतेच. त्यामुळे तिने शिक्षणाचा नाद अर्धवट सोडला आणि आपल्या सगळ्या आकांक्षा, अपेक्षा, इच्छा, आशा, भावना माझ्याभोवती केंद्रित केल्या. ती माझ्याचसाठी जगायला लागली आणि तिचे अर्धवट राहिलेले शिक्षण मी पूर्ण करावे, म्हणूनही मला शिकवत राहिली. त्यासाठी आठवीनंतर मलाही शहरात ठेवावे लागले. तेव्हा ती खूपच कासावीस व्हायची, पण तेही तिने सोसले. तेव्हापासूनच खऱ्या अर्थाने मी तिचा बहिश्चर प्राण बनून गेले.

आई इंटर शिकूनही खेड्यात परतली आणि खेड्यासारखीच राहत गेली. कारण पाण्यात राहून माशांशी जुळवून घ्यावेच लागते. असे खेड्यातील लोकजीवनाशी समरस होता होता, ती देवभोळीही बनत गेली. खूप देव देव करू लागली. व्रतवैकल्ये, उपासतापास, पूजाअर्चा, नेमधर्म ती खूप भक्तिभावाने करू लागली. निरनिराळ्या लाखोल्या, निरनिराळ्या पानांवर जेवण्याची व्रतं, सारखे तिचे उपक्रम-दिनचर्या माझा निसर्गाशी संबंध प्रस्थापित करत गेली. तिचे गाईला भाकरीचे उंडे लावणे, बैलांची पूजा करणे, कुत्र्याला भाकर घालणे, मला प्राण्यांबद्दल आत्मीयता आणि भूतदया शिकवत गेले. या सगळ्या प्रयोगांमध्ये ती मला मदतीला घ्यायची. त्यामुळे नकळत तेही संस्कार माझ्यावर होत गेले.

आज तिच्याबद्दल विचार करायला गेले, तर ती एक संधी न मिळालेली साध्वी स्त्री आहे, एवढंच पटतं. ती हुशार होती, पण गावात सातव्या वर्गापर्यंतच शाळा होती. त्यामुळे तिला लग्नाआधी त्यापुढे शिकता आले नाही. पण सातव्या वर्गापर्यंत ती पहिल्या नंबराने उत्तीर्ण झाली. लग्नानंतर ती सासरी प्रतिकूल परिस्थितीत शिकली. कारण त्या काळी सूनवायरी स्त्रीही विनाकष्ट राहूच शकत नव्हती. पण इंटरपर्यंतच तिला शिकता आले. माझे वडील गेले, त्यामुळे तिचे शिक्षण थांबले. पण तिथपर्यंत प्रत्येक वर्गात ती पहिल्या प्रयत्नातच उत्तीर्ण झाली. तिला चांगले गुण मिळाले. पण त्याचा तिला पुढील आयुष्यात उपयोग होऊ शकला नाही, कारण दानापूरला गेल्यावर त्या शिक्षणाचा उपयोग होण्याची शक्यताच नव्हती. शिवाय त्या काळी स्त्रियांच्या नोकऱ्या एवढ्या रूढही झाल्या नव्हत्या. विधवा स्त्रीला तर कसल्याच संधी उपलब्ध नव्हत्या. पण आईला सम ाजकार्याची मात्र संधी मिळत गेली. कारण आजोबा स्वातंत्र्यसैनिक होते.

हिवरखेडच्या जंगल सत्याग्रहात त्यांनी सक्रीय सहभाग घेतला होता. त्या काळी आईच्या माहेरापासून हिवरखेड तीन-चारच मैलांवर होते. या सत्याग्रहानंतर सगळे स्वातंत्र्यसैनिक भूमिगत झाले. त्यांना भाकरी पुरवण्याचे काम आजोबांनी केले. आई व आजीने अर्थात, भाकरी करून देण्याचे. आजोबांचे गाव दानापूर, तिथून सातपुडा पर्वत व त्यावरील जंगल हाकेच्या अंतरावर त्यामुळे रोज घोड्यावरून आजोबा जंगलात भाकरी घेऊन जायचे. हे एक आणि दुसरे वसतिगृहातील लेकरांना खाऊ घालण्याचे.

आजोबा पुरोगामी विचारांचे समाजसुधारक होते. त्यांनी मागसवर्गीयांसाठी मोफत वसतिगृह काढले होते. स्वखर्चाने ते हे वसतिगृह चालवत होते. त्यासाठी पाणी ओढायला त्यांनी एक माणूस ठेवला होता. त्याला गावात 'बोर्डिंगचा उकर्डा' म्हणत आणि त्या मुलांचा स्वयंपाक करायला एक म्हातारी ठेवली होती- तिला 'बोर्डिंगची बुडी' म्हणत. ही म्हातारी आपलं नाव-गाव लोप पावल्यानंतर बोर्डिंगची बुडी म्हणूनच जगली आणि बोर्डिंगची बुडी म्हणूनच मरण पावली. पण कधीमधी अडचण आली, तर आईला ह्या मुलांचा स्वयंपाक करावा लागे. आजोबांनी चीनच्या युद्धात सोने दान केले, तेव्हा सिंहाचा वाटा आईनी उचलला. मीही कानातले 'डूल' देऊन खारीचा वाटा उचलला होता. त्यामुळेच मी तिच्यावरील कवितेत म्हटले होते-

'दुसऱ्या घालाचा
भल्लाच उल्हास
कष्टाचा तरास
नायी कसा' (प्रतिमा इंगोले, भुलाई, पृ. २८)

दारावरील लोकांना, नातलगांना पदार्थ करून खाऊ घालण्याचा तिचा शौक होता. त्याला कोणी अटकाव करीत नसे. शिवाय, त्या अर्थाने भाकरी पुरवण्याचे काम करून तिने स्वातंत्र्ययुद्धातही खारीचा वाटा उचलला होता. त्यामुळे पुढेही ह्याच सामाजिक सहकार्याच्या भूमिकेतून ती जगत गेली आणि आयुष्याचं सार्थक करीत गेली. तिच्या दुःखी आयुष्यात हे छोटं-मोठं समाजकार्य हाच विरंगुळा ठरत गेला. तिला क्षणभर आनंद देत गेला.

आईला टापटीप आवडायची. संसाराची वाताहात झाल्यावर ती मग ह्या टापटिपीत आणि देवाधर्मात

मन गुंतवू लागली. तशीही ती भाबडी होती. घराच्या बाहेर पडण्याची फारशी संधी न मिळाल्यामुळे ती व्यवहारचातुर्य अजिबात शिकली नव्हती. त्यामुळेच ती बरेचदा अडचणीत येत गेली. पण अडचणीत आल्यावरही अथवा आपल्याला इतरांनी फसवले आहे, हे लक्षात आल्यावरही तिने आपला स्वभावधर्म सोडला नाही. आपला प्रेमळपणाही तिने कायम राखला. याच प्रेमळपणामुळे तिने अडल्या–नडल्यांची सतत मदत केली. कोणीही आर्जवं केली की, तिला कीव येत असे. आज तिचा प्रेमळपणा आवर्जून लक्षात येतो, तसाच भाबडेपणाही प्रकर्षाने जाणवतो. त्यामुळेच तिचा कोणावरही चटकन विश्वास बसत असे आणि कोणीही तिला सहज फसवू शकत असे.

आईला दुसऱ्यांना खाऊपिऊ घालण्याची आणि दान देण्याची खूप आवड होती. त्यासाठी ती निमित्त शोधत राहायची. कोणी घरी जेवायला असले की, तिची लगबग वाढायची. त्याच्यासाठी हे करू की ते करू असे तिला होऊन जायचे. अशा वेळी ती खूप धावपळ करायची. दुसऱ्यांच्या उपयोगी पडण्यात तिला समाधान लाभायचे.

मावलीचा हात, अमरुताची सर
जेवे घरदार, पोटभर
दारी वाटसरू, पंगतीला राये
जीव शांत होये, भुकेलेला

आजोबा दानशूर आणि सामाजिक कार्यासाठी उधळपट्टी करणारे होते, पण तिने कधी आजोबांना मनाई केली नाही किंवा आडकाठी केली नाही. आहे त्यात भागवून घेण्याची स्त्रियांची पारंपरिक सवय तिच्या अंगी पोरकेपणामुळे आणि वैधव्यामुळे खूपच मुरली होती.

उरलीसुरली, खाये कोरभर
भरला ढेकर, मावलीचा

आईचा दुर्मीळ गुण म्हणजे तिला खोटे बोलणे आणि खोटे दिखाऊ वागणे अजिबात जमले नाही. तिने आपल्या चेहऱ्यावर कधी मुखवटा चढवला नाही, त्यामुळे बदलत्या समाजव्यवस्थेशी तिला जुळवून घेता आले नाही. त्यामुळे ती व्यथित होत गेली. तसेच लांडीलबाडी तिला अजिबात जमत नाही... जमली नाही. त्यासाठी बऱ्याचदा कौटुंबिक पातळीवर तिला बोलही लावला जातो, पण त्याला तिचा इलाज नसतो. अशा वेळी मला आठवणच राहत नाही. मला सुचतच नाही. माझ्या लक्षातच आले नाही, असे म्हणून ती वेळ मारून नेते, पण खोटेपणा तिला जमतच नाही. त्यामुळे नकली वागणे शक्यतो टाळत राहते. त्यासाठी प्रसंगी ऐकण्याची तयारी ठेवते. वागणे असे स्वच्छ आहेच. पण चारित्र्य तसेच स्वच्छ आहे, हे तिचे खास वैशिष्ट्य.

आईची निराळी ओळख तिच्या चारित्र्यसंपन्नतेत आहे. आपले शील तिने निष्कलंक राखले. त्यामुळे स्वच्छ–निर्मळ असे तिला जगता आले. आपले 'विमल' हे नाव सार्थ करता आले. आपल्या प्रतिभेला तिने जिवापाड जपले. दुसरा दुर्मीळ गुण म्हणजे, तिने वडलांची त्यांच्या उतारवयात खूप सेवा केली. कोणाच्याही आजारपणात मनापासून शुश्रूषा करणे हा तिचा धर्मच असावा. याचे मला माझ्या आजारपणात पुन्हा प्रत्यंतर आले, पण आजोबांचे मात्र तिने अतिशय दक्षतेने सारे केले. तेही अजिबात न कंटाळता. ह्या शुश्रूषेतही ती आनंद शोधत असावी. जो तिच्या आयुष्यात दुर्मीळ होता. त्यामुळेच गावात कोणीही आजारी असले, वाड्यात कोणीही आजारी असले की, त्याला नव्हाळीचे काही करून घाल किंवा कोणी बाळंत वगैरे झाले, तर ह्या बाळंतिणीला पथ्य करून नेऊन दे, असे ती आवडीने करायची. शिवाय, त्यात भेदभाव नसायचा. आपण शुद्ध तूप खातो, तर ह्या सर्वांना ती शुद्ध तुपातील पदार्थच करून नेऊन द्यायची. आजोबा तिला तिच्या दुःखी आयुष्यामुळे दुखवायचे नाहीत. तिच्या कारभारात देण्याघेण्यात ढवळाढवळ करायचे नाहीत. त्यामुळे तिला दानधर्माची पूर्ण मुभा होती. आपली ही आवड मात्र तिला मनसोक्त सांभाळता आली. तिचे जगणे सुसह्य करीत गेली.

माझ्याबाबत तिचे योगदान आणि माझ्यासाठी केलेला त्याग आणि कष्ट तर अवर्णनीय आहेतच, पण तिच्या वागण्यामुळे, चारित्र्यामुळे माझ्यावर झालेले संस्कारही अमूल्य आहेत. या संस्काराच्या शिदोरीवरच माझ्या वळणावर फक्त आईच आहे, ही जाणीव बळावत चाललेली आहे. त्या दृष्टीने ती भक्कम आधारसुद्धा आहे. बालपणी आई विश्व असते, पण मोठेपणीही आईच विश्व आहे. यात सगळे आले.

माउलीचे पांग
उरले अथांग
लागे ना थांग
दरियाचा

***प्रतिमा इंगोले,***
*दर्यापूर, अमरावती.*
*मोबाइल : ९८५०११७९६९*

•••

# पुढील अंकात

नवीन वर्षात नवीन सदरे
आणि बरंच काही

#हॅशटॅग लैंगिकता

# लिंग + लिंगभाव = लैंगिकता

जमीर कांबळे

**लिंग + लिंगभाव = लैंगिकता – हे गणित वरवर सोपे वाटत असले तरी ते मानवी नातेसंबंधांची गुंतागुंत खोलवर वाढवणारे ठरते. लिंग, लिंगभाव आणि लैंगिकता यांच्या परस्परसंबंधांचे आपल्या रोजच्या बोलण्या, वागण्या, जगण्यामध्ये उमटणारे पडसाद समजावून सांगणारा 'हॅशटॅग लैंगिकता' या सदरातील तिसरा लेख.**

आपल्या लिंगावर (sex) लिंगभावाचं (gender) आणि त्यावर लैंगिकतेचं (sexuality) राजकारण होत असतं. एक ज्येष्ठ मैत्रीण म्हणते, 'हे समलिंगी लोक हल्ली जरा जास्तच प्रदर्शन करतात आपल्या लैंगिकतेचं! आम्ही विरुद्धलिंगी (heterosexual) कधी ओरडून सांगतो का आमची लैंगिकता?'

खरंच, आम्हाला आमची लैंगिकता ओरडून का बरं सांगावी लागत असेल? बरं, ओरडून सांगण्यामागे आमची काही कारणं असतील, पण ओरडून लैंगिकतेचं प्रदर्शन का नाही करायचं, यामागे इतरांची काय कारणे आहेत? लैंगिकतेचे मुक्त प्रदर्शन याचा संबंध समाजाच्या या विषयाबद्दलच्या मौनाशी आहे. सामाजिक नेणिवेतले हे मौन अनेक स्वरूपांच्या भेदभावांना जन्म देते.

माझ्या भोवताली स्वतःचे, मित्रांचे आणि असंख्य लोकांचे 'सेक्स'विषयी मौन, अपशब्द, शिव्या, चांगले-वाईट अनुभव, विचार, प्रश्न आणि समस्या नांदत असतात. गुगलवर 'सेक्स' टाईप केले की, आधी तर लैंगिक सुख, लैंगिक समाधान, सेक्सची शक्ती, स्तनांचा, शिश्नाचा 'साईज' वगैरे 'उत्पादनांच्या' जाहिराती दिसतात. मग, पॉर्नोग्राफीची संकेतस्थळे दिसायला लागतात. त्यापुढे सेक्सच्या दमनामुळे उद्भवणाऱ्या मानसिक समस्यांविषयीच्या चर्चा सापडतात. शेवटी 'सेक्स आणि अध्यात्म'अशी चर्चा दिसते.

एकीकडे लैंगिक इच्छेबद्दलचे सामाजिक मौन, दुसरीकडे मात्र तिचे बाजारपेठेतील अतिरेकी प्रदर्शन, तिसरे संभोगातून सुचवलेली आध्यात्मिक वाट, असा विरोधाभास आपल्याला दिसतो. हा विरोधाभासच आपल्या सर्व सामाजिक समस्यांचे कारण आहे, असे आध्यात्मिक गुरू ओशोही मानतात आणि याचे निवारण म्हणून ते सेक्सवर लादलेली सगळी बंधने तोडून संभोगाचा मुक्त, बिनधास्त आनंद घेण्यास सांगतात; ह्यातूनच माणूस समाधीकडे वळेल असे वचन देतात. परंतु आज सेक्सची एवढी सारी उत्पादने लोहचुंबकासारखी आपल्याला ओढत असताना संभोगाचे समाधान हे माणसाला कळेल का?

ह्याचे परिणाम आपल्या दैनंदिन जीवनातही दिसतात. सेक्स आपल्या निरोगी मनासाठी गरजेचा असला, तरी तो काही चारचौघात चर्चेचा विषय नसतो. अनेक माणसांना अनेक, गंभीर स्वरूपाच्या लैंगिक समस्या उद्भवतात; पण तरीही आपण त्यांबद्दल उघडपणे बोलत नाही. हेच मौन मानसिक आजारांना जन्म देतं. फ्रॉइडपासून अनेक मानसोपचारतज्ज्ञ मानवी नातेसंबंधांमध्ये उद्भवणाऱ्या समस्यांचे मूळ सेक्समध्ये आहे, हे वर्षानुवर्षं सांगतच आले आहेत. हा विरोधाभास मानवी समाजात तयार झालेल्या लिंग, लिंगभाव आणि लैंगिकता यांच्या एकत्रित राजकारणाचेच फलित आहे.

जन्माच्या आधीपासूनच 'स्त्री' आणि 'पुरुष' हे दोन साचे आपली वाट पाहत असतात. जन्म झाला की लगेच आपल्या जैविक गुणकांच्या (शिश्न, योनी) आधारे आपल्या अस्तित्वावर लिंगाचा शिक्का मारला जातो. मग आपण जगाकडे केवळ 'स्त्री' आणि 'पुरुष' या दोन भिंगांतूनच पाहायला लागतो. त्यामुळे एखाद्या बाळामध्ये शिश्न आणि योनी या दोन्ही अवयवांची लक्षणे दिसली की, अशा बाळांना 'अपवाद' आणि 'वैद्यकीय समस्या' समजून 'द्विलिंगी' (Intersex) असे नाव दिले जाते. 'स्त्री-पुरुष' हा नियम आणि 'इतर'

हा 'अपवाद' असं म्हणून लैंगिक ओळखींची समाजामधील 'जागा' ठरते.

पुरुष, स्त्री आणि 'इतर' हे माणसांचे केलेले वर्गीकरण केवळ वैद्यकीय नसून आपल्या 'तथाकथित' जैविक लिंगाचे सामाजीकरण (socialization) आहे, हे हळूहळू लक्षात येते. तू पुरुष आहेस किंवा स्त्री आहेस म्हणून तू असे केले पाहिजेस किंवा असे नाही केले पाहिजेस! असे वागण्याच्या, बोलण्याच्या, चालण्याच्या, कपड्यांच्या, दिसण्याच्या, सत्तेच्या नियमांचे डोस आपल्याला पाजले जातात. आपल्या आजूबाजूला स्त्री आणि पुरुष दोघे वावरत असताना आपल्याला कोणाचीही प्रतिमा जगायला आवडू शकते. परंतु आई-वडील, नातेवाईक, मित्र, शिक्षक, इतर लोक, प्रसारमाध्यमे, चित्रपट, मालिका इ. सर्व आपल्याला साच्यांची अदलाबदल करू देत नाहीत. आपण आपल्याला मिळालेल्या साच्यातच राहायचं या नियमाचे 'संस्कार' पावलोपावली आपल्यावर केले जातात.

आपल्या लिंगाला जोडलेल्या समाजाच्या 'साचेबद्ध' अपेक्षा आणि प्रतिमा ह्यांना लिंगभाव (gender) म्हणतात. लिंगभाव हा संस्कृती आणि परंपरेच्या माध्यमातून समाजाने रचला असल्यामुळे तो एक सामाजिक आणि सांस्कृतिक रचित (socio-cultural construct) असतो. सिमोन दे बोआ म्हणते, 'आपण स्त्री म्हणून जन्माला येत नाही, आपण स्त्री बनतो.' समाजाने लादलेला लिंगभाव आपली सामाजिक ओळख आणि तिचा संपूर्ण पट ठरवतात. आपल्यालाही ही ओळख हवी असते म्हणून आपणही या साच्यांमध्ये स्वतःला बसवू पाहतो, साच्यांचे अलिखित नियम पाळू लागतो. परंतु हे साचे केवळ पारंपरिक असतात किंवा त्यांच्यात परिवर्तन शक्य नसतं असं नाही. काळानुसार यांचे नियम बदलतात, थोडे शिथिल होतात; परंतु 'साचे' मात्र तसेच राहतात. 'पुरुष' नावाच्या साच्याला परंपरेने मर्दानगी, असंवेदनशील, तार्किक, बलवान, कर्ता, निर्णय घेणारा, कमावणारा, कुटुंबाचा मालक इत्यादि. तशीच 'स्त्री' या साच्याला भावूक, संवेदनशील, प्रेमळ, दुबळी, कुटुंबाची काळजी घेणारी, कुटुंब चालवणारी असे अर्थ चिकटले आहेत.

का करतो समाज आपल्यावर असे संस्कार? का लादले जाते 'लिंगभाव' नावाचे हे सामाजिक, सांस्कृतिक रचित? या प्रश्नांचे उत्तर लैंगिकतेच्या राजकारणात सापडते. याचा इतिहास शोधणे अवघड असले, तरी आपल्याला काही अनुमान लावता येतील. अगदी सुरुवातीला मानवाने लैंगिक इच्छेचा त्यातून मिळणाऱ्या शारीरिक व मानसिक सुखाच्या अनुभवामुळे आनंदाने स्वीकार केला असणार. मानवाला अनेक लैंगिक क्रियांचा अनुभव घेत असताना विशिष्ट क्रियेतून प्रजनन होते ह्या अनुभवातून पहिल्यांदा लैंगिक क्रियेतून होणारा 'फायदा' जाणवला असणार. फायद्याच्या गणितामुळे इच्छा आणि गरज असे वर्गीकरण व्हायला सुरुवात होते. भांडवलशाहीचा उगम हा मानवी तृष्णेत आहे, हे बुद्ध दाखवून देतो. हळूहळू मानव 'प्रजनन' ह्या निकषाच्या कसोटीवर त्याच्या असंख्य लैंगिक क्रियांमध्ये फरक करू लागला असणार. त्यातून विरुद्धलिंगी संभोग हे त्यातील फायद्यामुळे गरजेचे आणि इतर लैंगिक क्रिया- ऐच्छिक असे मूल्य तयार झाले असणार. आता हे मूल्य रुजवायचे असेल तर त्यासाठी संस्कृतीचा, धर्माचा आधार घेऊन या मूल्याचा गौरव केला पाहिजे. अनेक धर्मांचा, बाजारपेठांचा, प्रसारमाध्यमांचा अभ्यास करून पाहा. फार चलाखीने 'इच्छा' आणि 'गरज', 'वैयक्तिक सुख' आणि 'समाजहित', 'संभोग' आणि 'प्रेम', 'लग्न' आणि 'व्यभिचार' अशा असंख्य द्वैतांच्या आधारे मानवी लैंगिकतेवर नैतिकतेचे 'पितृसत्ताक' आणि 'विरुद्धलिंगी'


## चांगलं बाप-लेक नातं निर्माण करण्यासाठी...

बाप-मुलाचं नातं बहुआयामी, बहुपदरी असतं. त्यातला एक-एक पदर उलगडून दाखवणारे अनेक लेख या पुस्तकात आहेत.

एस. एम. जोशी, धनंजय गाडगीळ, व्ही. शांताराम, रा. चिं. ढेरे, रॉय किणीकर, भालचंद्र पेंढारकर आदी मातब्बरांच्या मुलांचे तसेच जयंत नारळीकर, अच्युत गोडबोले, ऐश्वर्य पाटेकर, प्रा. डॉ. नारायण भोसले यांचे आत्मकथन सांगणारे असे एकतीस लेख या पुस्तकात आहेत.

चांगलं बाप-लेक नातं निर्माण करण्यासाठी 'बाप-लेक नात्याचा कॅलिडोस्कोप' हे पुस्तक आपल्याला नक्कीच मदतीचा हात देईल.

**बाप-लेक नात्याचा कॅलिडोस्कोप**
संपादक : गीताली वि. मं.
मूळ किंमत : रुपये ५५०/-
सवलतीत : रुपये ४००/-
गुगल पे : ९९२१२७२५४६

**घरपोच पुस्तकासाठी संपर्क**
अमित प्रकाशन, २०७, १२ अ, साफल्य, डिफेन्सकॉलनी, जनवाडी, गोखलेनगर, पुणे ४११०१६



मूल्य (heteronormativity) थोपवले जाते. या द्वैतांमुळे लैंगिक इच्छेभोवती कुंपण बनून लैंगिकता ही एक सामाजिक समस्या होऊन बसते. तिचे निवारण 'प्रजनन' हे प्रयोजन देऊन बिंबवले जाते. म्हणून आपल्या लिंगाने त्याला नेमून दिलेला लिंगभाव जगला पाहिजे आणि लिंगभावाने 'संभोग कोणाशी, कसा आणि कशासाठी करावा' हे त्याला नेमून दिलेले लैंगिकतेचे नियम पाळले पाहिजेत, अशी समाजाची अपेक्षा असते. परंतु माणसाची लैंगिकता त्याच्यापेक्षाही चलाख असते. ती मुक्त आहे, स्वतंत्र आहे, तिच्यावर नियंत्रण करणे सोपे नाही. लैंगिक इच्छा लैंगिक समाधान मागत असते आणि हे समाधान तिला वारंवार हवे असते. तिच्या समाधानाला काहीच मर्यादा नाहीत म्हणून ओशोंनी सुचवलेला स्वच्छंद सेक्सचा मार्ग समाधीकडे नेऊ शकणार नाही. लैंगिक इच्छा कशानेही आणि कोणामुळेही चाळवली जाऊ शकते यालाही काही नियम नाही. तिचे दमन आपले मानसिक स्वास्थ्य बिघडवते, तिच्यामुळेच आपण प्रेमात पडतो किंवा प्रसंगी अनैतिक कृत्य करायलाही प्रवृत्त होतो. म्हणून समाजात सेक्स ही एक मोठी समस्या आहे आणि त्याचे नियंत्रण केले पाहिजे असे वाटणे साहजिक आहे. परंतु मुळात सेक्सवर नैतिकता थोपवता येते का आणि ही नैतिकता 'समतेची' आहे का हे प्रश्न आपण विचारले पाहिजेत. समाजात लैंगिक समाधानाच्या अनेक शक्यता दिसतात– हस्तमैथुन, विरुद्धलिंगी किंवा समलिंगी संभोग आणि संभोगाच्या क्रियेतही अजून अनेक शक्यता – चुंबन, मुखमैथुन, योनीद्वारे किंवा गुदद्वारे संभोग इ. परंतु समाज या लैंगिक वर्तनाच्या वैविध्याला प्रजजन असा एकमेव निकष लावून नाकारतो, त्यांचे 'नैसर्गिक' आणि 'अनैसर्गिक' असे वर्गीकरण करतो. प्रजननाच्या उद्दिष्टामुळे केवळ विरुद्धलिंगी संभोग नैसर्गिक असतो हा नियमच नाही, तर कायदाही तयार होतो. उदाहरणार्थ, समलिंगी संभोग हा भारतामध्ये कायदेशीर गुन्हा ठरत होता, तो कायदा बदलून आत्ता कुठे तीन वर्षंच होताहेत. पुरुष म्हणून आपल्याला केवळ स्त्रीचे लैंगिक आकर्षण वाटले पाहिजे. या लैंगिक आकर्षणाचे प्रेमात आणि त्याचे 'समाजमान्य' लग्नात आणि कुटुंबात रूपांतर झाले पाहिजे. ह्या अपेक्षा म्हणजेच लैंगिकतेचे राजकारण.

सेक्सच्या नियंत्रणाचा इतिहास पाहिला तर समाजाने वापरलेल्या अनेक क्रूर क्लृप्त्या दस्तऐवज म्हणून सापडतील. स्त्रियांच्या लैंगिकतेचं नियंत्रण, समलिंगी लोकांचं शोषण आणि विरुद्धलिंगी कामजीवनाचा नियम यातून तयार झालेल्या राजकारणातच मानवी लैंगिक स्वातंत्र्याचे, लैंगिक चळवळीचे स्रोत दिसू लागतात. थोडक्यात, लैंगिकता यामध्ये शोषण आणि स्वातंत्र्य या दोन्ही शक्यता तयार होतात. स्त्रीवादी आणि लैंगिकतेच्या चळवळींना शोषणाच्या अनुभवांतूनच राजकीय कंठ फुटतात. चळवळीमध्ये माणसाचे 'शोषित' या ओळखीतून 'राजकीय कर्त्यामध्ये' रूपांतर होते.

आपल्या जैविक लिंगावर घडणाऱ्या लिंगभावाचे राजकारण आधी स्त्रीवादी सिद्धान्तनाने उघड केले; 'लिंग' ठरवण्याला काहीतरी एक वैज्ञानिक आधार असला तरी त्याच्यावर लग्न, कुटुंब इत्यादी पितृसत्ताक, सामाजिक आणि सांस्कृतिक मूल्ये लादणे हे मुख्यतः स्त्रियांचे शोषण करते असे 'ओरडून' सांगितले. इथे पहिल्यांदा स्त्रीवाद्यांनी 'पितृसत्ता' नावाची सामाजिक व्यवस्था, तिचा इतिहास, तिचे राजकारण, स्त्रियांचे शोषण करणाऱ्या तिच्या प्रक्रिया दाखवून दिल्या. कालांतराने मात्र स्त्रीवादी चर्चाविश्वात लिंगाकडून लिंगभावाकडे होणारा माणसाचा हा प्रवास उलट्या दिशेने पाहिल्यावर असे लक्षात आले की जिला आपण वैज्ञानिक आधार आहे असे म्हणत होतो, ती 'लिंग' ठरवण्याची प्रक्रियासुद्धा याच राजकारणाची सुरुवात आहे. आपल्या जन्माच्या आधीच आपला लिंगभाव ठरलेला असतो, 'लिंग' हा फक्त त्या लिंगभावाचा 'अधिकृत' शिक्का असतो. ज्युडिथ बटलर म्हणते तसे, आपले शरीर हे जन्मापासूनच सामाजिक व्यवस्थांच्या भाषेला (साच्यांना, त्यांच्या नियमांना) सुपुर्द केलेले असते.

हे राजकारण दाखवून देताना स्त्रीवादी सिद्धान्तामध्ये पुढे पितृसत्तेची धर्मसंस्था, भांडवलशाही, वर्ण आणि जातिव्यवस्था यांच्याशी असलेली मिलीभगत अधोरेखित केली गेली. म्हणून या सर्व व्यवस्थांच्या विरोधात चालणाऱ्या चळवळींना स्त्रीवादाचा आधार घ्यावाच लागेल, असे लक्षात आले. बाबासाहेब आंबेडकरही त्यांच्या जातीअंताच्या विचाराला स्त्रीवाद जोडतात. कारण जातिव्यवस्थाही लैंगिकतेच्या नियंत्रणातूनच चालवली जाते. LGBTIQA+ चळवळीने लिंग, लिंगभाव आणि लैंगिकतेचे होणारे विरुद्धलिंगी नियंत्रण दाखवून दिले.

शेवटी सगळ्याच मुक्तिदायी चळवळींनी लैंगिकतेचे राजकारण ह्या मुद्द्याला गंभीरपणे घेतले पाहिजे. तेव्हाच आपल्याला समतेची आणि मार्क्सने सुचवलेली 'सार्वत्रिक माणुसकी'ची (generic humanity) वाट सापडू शकते.

***जमीर कांबळे***, *पुणे*
*hashtag.sexuality@gmail.com*

●●●

# #बकेटलिस्ट

## सरिता सोमाणी

#सिनेमागृहात जाऊन चित्रपट पाहायचाय.

#राजकीय नेत्यांशी थेट भांडायचंय, त्यांनीच सारं वाट्टोळं केलंय हे त्यांना सांगायचंय.

#एकदा तरी कुणाच्याही लग्नाच्या वरातीत नाचायचंय, कारण आमच्याकडे फक्त मुलंच नाचतात, मुलींना फक्त बघत राहावं लागतं.

#मैत्रीणींबरोबर एकदा तरी Night Out करायचंय.

#विहिरीवर पोहायला जायचंय.

#सार्वजनिक उत्सवात हात वर करून नाचता यावं, बिनधास्त शिट्टी मारता यावी.

#एक दिवस स्वतःच्या मर्जीने जगायचाय, खूप मज्जा करायची.

#एक दिवस सर्व जबाबदाऱ्या विसरून उगीच बाहेर हिंडायचंय.

नवरा जसा बायकोवर ओरडतो ना तसेच एकदा मला नवऱ्यावर ओरडायचंय, मी जशी त्याची सारी कामं त्याने न सांगता करते तशी एक दिवस त्याच्याकडून करून घ्यायचीय.

#मला एकदा तरी एकटीला प्रवास करायचाय, मल एकटीला अजून हडपसरपर्यंतही कधी पाठवत नाही.

#एकटीने अंधाऱ्या खोलीत भयपट पाहायचा.

#रात्री एकटीने बाईकवर फिरून रात्रीचं पुणे शहर पाहायचंय.

#मला स्वतःला अशा जागेवर पाहायचंय की जिथे माझ्यावाचून कुणाचं तरी एखादं काम अडलं पाहिजे.

#मला एकदा वाईन प्यायची आहे.

#उच्च शिक्षणासाठी पुण्यात जाण्याची, वसतिगृहात राहण्याची इच्छा आहे.

#एकदा ट्रेकला जायचं, तंबूत राहायचं, चांदण्यांनी भरलेलं आभाळ पाहायचंय.

#एकटीने सिनेमा बघायचाय.

#लग्नानंतरही गेल करायचाय, निम्मा पगार आईवडिलांना द्यायचाय.

#एकदा तरी College Gathering मध्ये Dance करायचा.

#तोंडाला स्कार्फ न बांधता बिनधास्त कॉलेजला यायचे, गावात हिंडायचे आहे.

#मैत्रिणींबरोबर सहलीला जायचे, कोकणात समुद्रकिनारी मुक्कामी राहायचे.

#एकच दिवस कोणाच्याही बंधनाशिवाय अनुभवायचा.

#ही Bucket List आहे विशीच्या आतल्या माझ्या काही सोबतीणींची. ग्रामीण भागात शिकतात, पदवी मिळवतात, स्वतःचा अवकाश अजूनही कोसो लांब...मी फक्त संधी देऊ शकते त्यांना, स्वतःच्या आत डोकावण्याची...

---

रात्री झोपण्याआधी पुस्तकाची चार-दोन पाने तरी वाचायची माझी जुनी सवय.. स्वतःला मिटताना पुस्तकही मिटून ठेवते.. काल रात्री कसे कोण जाणे पुस्तक उघडेच राहिले..पहाटे सारी पाने कोरी करकरीत... शब्द कंटाळले असतील वर्षानुवर्ष पुस्तकात राहून...मनाशी म्हणाले..येऊ देत जरा मोकळेपणाने जग पाहून. आता मी घरी परतलेय... पाहते तर शब्दही परतलेत... काहीसे थकले भागले.. दुधारी तलवारीच्या पात्यावरून चालत यावे जणू काही असे रक्ताळलेले.. धक्काही सोसणार नाही इतके अलवार... सायमाखल्या हाताचा स्पर्श झाला तरी अंतर्बाह्य पाणावलेत... आईच्या मायेने कुशीत घेतले कुणी तर त्यांच्या आत आत अंधारलेलं काही अनावर आवेगाने कोसळेल... त्यांच्या जिव्हारी लागलेलं काही मला उमजलंय खरं... पण मी कुरवाळणार नाहीये त्यांना... सोसू देत जगरहाटीच्या ऊनझळा... आजपासून जाणीवपूर्वक पुस्तक उघडेच राहू देत.. ऐकू देत शब्दांना तोफा-दारूगोळ्यांचे आवाज.. अनुभवू देत युद्धाचा उन्माद.. दंगलीतलं रक्तरंजित वास्तव पाहू दे... दिसू देत दीनवाणं जगणं.. सत्तासंबंधांच्या खेळात आपणही केविलवाणेच हे कळो यावे त्यांचे त्यांना... शह काटशहाचे राजकारण करणारी माणसे ओळखायला शिकू देत... वार झेलायला.. चुकवायला तयार असू देत क्षणोक्षणी.. पदोपदीची क्रूर झुंज पाहत शहाणपण यावे त्यांचे त्यांना.. जगण्याचा अर्थ गाभ्यात सामावून अधिकच कणखर होतील...परिपक्वही... मात्र त्यांच्या तीव्र संवेदनशीलतेचे काय करावे हा प्रश्न अजूनही अनुत्तरीतच???

***सरिता सोमाणी**, पुणे*
*saritadarak2050gmail.com*

●●●

मनोगत

# मोहाची फुले

## यशवंत सुरोशे

**अलीकडे मोहाची फुले आणि दारू असाच संबंध ऐकायला मिळण्याच्या काळात लेखकाच्या मोहाच्या फुलांसंबंधीने सांगितलेल्या आठवणी नक्की वाचा.**

माघ महिना सुरू झाला की, उन्हाची चाहूल लागायची. दुपार चटका देणारी असे. पहाटेचा गारवा मात्र डोळ्यांवर स्वप्नांची चादर पसरे. अशा ऊन–थंडीच्या वातावरणात मोहाच्या झाडांना कळ्या येऊ लागतात. छोट्या भोवऱ्याचा मधला आकार नि बाजूला समईसारख्या पाच वातीप्रमाणे पाकळ्या! रानात आजूबाजूला पानगळ सुरू झालेली असते. आंब्याला मोहोर आलेला असतो. मोहराचा वास सर्वत्र दरवळत असतो. संध्याकाळच्या वेळेस कोकीळ आंब्याच्या दाट पानातून कुहूकुहू गात असतो. सुरुवातीला एखादाच कोकीळकूजन ऐकायला येई. पण आपण मात्र समजायचे, निसर्ग रंगाची उधळण करणार आहे.

पण रोज रानावनात, काट्याकुट्यात जाणाऱ्या कष्टकरी माणसांना कुठे वेळ असतो, या निसर्गाच्या रंगाकडे बघायला, निसर्गातील रंग न्याहाळायला! पण निसर्ग मात्र आपला नियम सोडत नाही.

पानगळ सुरू झाली की आईच्या तोंडून अनेकदा ऐकायला मिळे, ङ्गपाला झाडायला सुरुवात केली पायजे. आता मॉहा येतील... सगळ्यांचीच पाला झाडायची गर्दी व्हयल.फ

खरं तर पानगळ होऊन उंच, डेरेदार मोहाच्या झाडाखाली वाळलेल्या पानांचा खच होई. त्यातून सरडा काय, लहानसा विंचू जरी गेला तरी करकर असा आवाज येतो. मोहाची झाडे दाट, जवळजवळ वाढलेली असत. मोहाचे रान म्हणूनच ते ओळखले जाई. प्रत्येक जण आपापल्या मालकीचे ङ्गमोहरानफ राखून असे.

लोखंडी तारांचा पंजा, मोठा चाप आणि मडक्यात पाणी घेऊन आई मोहाच्या रानात जाई. मडके एखाद्या झाडाच्या सावलीत ठेवी, त्यावर चुंबळीचे झाकण ठेवी. मग डोक्यावर पदर घेऊन त्याचे दुसरे टोक कमरेला खोची नि पंज्याने वाळलेल्या पाल्याचे ढीग करी. पाला झाडतांना करकर, करकर आवाज होई. काही वेळानंतर पाला झाडल्याचा आवाज कानात कुंजत राही. पाला बाजूला झाला की, माळरानाची माती उघडी पडे. उन्हात वाळलेले गवतही गोळा होई. मोहाच्या झाडाखालची जागा स्वच्छ होई. पाहता–पाहता निम्म्या माळावर पाला झाडून होई. घामाने आईच्या कपाळावरचे कुंकू नाकापर्यंत ओघळायचे. आई विसावा म्हणून पाण्याच्या मडक्याजवळ येई. तिथेच टेके. चुंबळीचे झाकण काढून मडक्यातले पाणी पेई. थंड झालेले पाणी प्यावेसे वाटे. आणखी ग्लासभर पाणी पेई. मग चुंबळीने नाकावरचे कुंकूपाणी पुसत राहिलेल्या माळाकडे पाही. गंमत म्हणून गोळा केलेल्या पाल्याचे भोगुळ ती मोजे. मग हसत, नव्या दम्याने ती उठे. पंजा हातात घेई नि पुन्हा पाला झाडायला जाई. तोपर्यंत दुपार होई. बाबा शेतावरचे काम आटोपून आले तर ठीक. नाहीतर आई दुपारच्या स्वंयपाकासाठी धावतपळत घर गाठायची. असा हा सात–आठ दिवस पाला झाडायचा कार्यक्रम चाले. त्यात वडील मोठ्या चापात पाल्याचे भोगुळ करत व चाप भरला की, डोक्यावर घेऊन, शेतात नेऊन, राब करीत. पण पाला झाडण्याचे, खरं तर गोळा करण्याचे, बहुतांश काम आईच करे.

एकदा का पाला झाडून झाला की, मोहाची फुले वेचायला एकदम सोपे जाई. स्वच्छ अंगणासारख्या जागेत पडलेली टपोरी, गोटीएवढी मोठी नि पुढे पाकळ्यांचा शंकू झालेला आकार असलेली फुले फारच मोहक! बरं नुसती मोहक नाही तर मादकसुद्धा! म्हणून तर मोहाची दारू बनवतात.

मार्च महिना उजाडला की आम्हा मुलांची साखरझोप बंद! आई पहाटेच उठवी. हातात टोपली नि टिनचा छोटा डबा देई. पुढची सूचना सांगायची गरजच नसे. पावले आपोआप मोहरानाकडे पडत. मोहाची फुले गळण्याची वेळ पहाटे व सकाळची. उन्हं तापू लागली की, फुले टपटप गळत जातात. पण पहाटे गळालेली मोहफुले खायला मोकाट

जनावरे येतात. जनावरांना ही मोहफुले आवडत असावीत, म्हणून तर ती खायला यायची! प्रत्येकजण पहाटेच्या वेळी टोपली, घोंगडी, टिनचा डबा घेऊन मोहरानांकडे निघालेला असे. वर्गमित्र भेटे रस्त्यात सोबत होई. पहाटेचा गारवा अंगाला झोंबे. आकाशात चांदण्या दिसायच्या. कधी–कधी चंद्र मावळतांना नि सूर्य उगवतांना पाहण्याचा योग येई. पण हे सगळं आता आठवतयं त्यावेळेस फक्त मोहांच्या फुलांची राखण करणे, हे महत्त्वाचं काम होतं. आजूबाजूला वर्गमित्र, चुलतभावंडं नाहीतर एखादा चुलता, काका असायचा. त्यामुळे भीती वाटायची नाही. पण मोहाची फुले टपटप आवाज करीत गळायची. उजाडेपर्यंत मोहाच्या टपक्यावरून किती मोहफुले गळाली याचा अंदाज करायचा. पूर्वेला लाल–तांबूस उजेड दिसू लागला की, मोहाच्या झाडाखाली पडलेल्या फुलांचा सडा सुंदर दिसे. जणू रांगोळीसाठी टाकलेले ठिपकेच! कधी कधी अंधारात मागच्या बाजूने एखादी गाय किंवा कालवड यायची. हळूच मोहफुले खात रहायची. पाल्याचा थोडा आवाज झाला की, कळे. नाहीतर शेजारच्या झाडाखालचा आवाज देई. मग दगडी नाहीतर काठीने जनावरांचा पाठलाग करायचा. पाठलाग अशा दिशेला करायचा की, जिकडे दुसऱ्याचे मोहरान नसावे. यामुळे कधी कधी भांडणे होत. कोणी म्हणे, जनावरे मुद्दाम आमच्याच मोहाकडे वळवता. पण भांडण तेवढ्यापुरतेच असे.

प्रत्येकजण एक–एक करत तीन–चार मोहफुले मुठीत उचलून टिनच्या डब्यात टाकायची. टिनचा डबा भरला की, टोपल्यात खाली करायचा. डबा लवकर भरे, त्यामुळे काम केल्याचा आनंद होई. एका कोपऱ्यापासून मोहफुले वेचायला सुरुवात करायची ती सलग रांगेत वेचत जायची. कधी कधी झाडावरून गळणारी मोहफुले डोक्यावर, अंगावर पडत. भारी मजा वाटे. आम्ही



लहानपणी ही गळणारी मोहफुले हवेतच झेलत असू. मातीचा स्पर्श न झालेली फुले खायचो. खूप रसदार नि गोड असतात ही फुले. मोहफुले झाडावरून गळतांना पावडरीसारखा पदार्थ फुलाबरोबर हवेत पसरतो. ते कण भारी मोहक वाटतात. मोहफुले वेचतांना हात ओले होत. माती लागे. मग हात लाल–काळे होत. फुले वेचता–वेचता पुढे जावे नि मागे वळून पाहावे, तर पुन्हा मोहांचा सडा पडलेला दिसे. आम्ही मुले जिथे दाट सडा पडलेला असे, तिथलीच फुले वेचायला सुरुवात करायचो. मग नऊच्या सुमारास दादा, भाऊ किंवा आई मोठी टोपली, भाकरी, पाणी घेऊन यायचे. आजूबाजूलाही असेच चित्र असे. आई आली की कौतुक करायची. म्हणायची, ङ्गजनावरे नव्हती ना आली? महा लेक लय गुणाचा. सकाळपासून मोहा राखतोय.फ असं म्हणत म्हणत ती ताटलीत भाकर वाढी. बाजूला कांद्याची लाल चटणी ठेवी. एका पातेल्यात तिने रात्रीचा पोळलेला भात आणलेला असे. माझा डोळा त्या पोळलेल्या भातावर असे. ती मला मडक्यातून पाणी काढून हातावर टाके. हात धुतांना लाल चिखलाचे पाणी फार सुंदर दिसे. मी पाण्याकडे पाहत राही. मग आई ओरडायची, ङ्गआवर लेका, आपण पटकन नेऊ. उन्हं व्हायच्या आधी वेचून व्हायला पायजेत. तुला शाळेत जायचंय ना?

मला शाळेची आठवण दिल्यावर मी हात भरभर धुवायचो. चुंबळीच्या फडक्याला हात पुसायचो. आईसोबत रानांत जेवतांना मजा यायची. खरं तर भूकही लागलेली असे. आई शेजारच्या पोरांना भाकरी खायला आवाज देई. कोणी चटणी, पापडाची अदलाबदल करी. कधी–कधी एकत्र येऊन जेवायचो. दुरडीतल्या भाकऱ्या संपायच्या, भातही पोटात जायचा. पोटभर पाणी पिऊन झाल्यावर मोहफुले वेचतांना वाकायला जमत नसे. मग कमरेत न वाकता, बसून फुले वेचायची. मग कोणीतरी शाळेची टूम लावे. शाळा गावातच होती. घरी जाऊन आंघोळ करायची, कपडे बदलायचे, दप्तर घ्यायचे नि शाळेत जायचं. बस्स एवढंच. त्यामुळे घाई, गडबड, धावाधाव नसे.

मग राहिलेली मोहफुले घरातील मोठी माणसे वेचून आणत. करवंदीच्या जाळीत पडलेली, विखुरलेली, नंतर गळालेली सारी मोहफुले वेचून दोन–तीन टोपल्या भरत. दुपारपर्यंत वेचून आणलेली मोहफुले अंगणात पसरून वाळवत. अगोदरच्या दिवसाची मोहफुले वाळून लालसर झालेली असत, ती वेगळी वाळत घालत. असे दोन–तीन चौकोन अंगणात रंगीबेरंगी कपड्याप्रमाणे अंथरलेले दिसत. गावातल्या सगळ्या अंगणातील वाळत घातलेल्या मोहफुलांचे विहंगम दृश्य मी कधीतरी स्वप्नात पाहिलंय.

घरातील वृद्ध माणसे वळचणीला बसून ह्या वाळवणाच्या मोहफुलांची राखण करत. संध्याकाळ झाली की, टोपलीत गोळा करून ठेवायची. आठ–दहा दिवस मोहफुले वाळवून कडक

(पान ५० वर)

अनोख्या क्षणांचा कार्योत्सव

# अभिनव भाऊबीज आणि कन्यामेळावा

गोपाळ खाडे

दिवाळी म्हटली की, अंधाराचा, अज्ञानाचा नाश करणारा सण! भाऊबीज म्हटली की, बहीण–भाऊ नात्याचा उत्सव! कामाच्या व्यापात प्रत्येक भावाबहिणींना भाऊबीज एकत्र साजरी करता येतेच असे नाही. हिंगोली तालुका जिल्ह्यातील आडमार्गाला असलेल्या कणका या गावातील भाऊबीज मात्र अनेकांच्या डोळ्यांच्या कडा ओल्या करून गेली.

या गावात बहुसंख्य वर्ग म्हणजे दिवसभर मेहनत करणारे शेतकरी व शेतमजूर! गावात लहानाचा मोठा झालेला प्रत्येक जण प्राथमिक शिक्षणानंतर तालुका जिल्ह्याच्या नाही तर, मोठ्या शहरात शिक्षण पूर्ण करतो. मोठ्या पदावर पोहोचतो व हळहळू कामाच्या व्यापात गावाकडे दुर्लक्ष व्हायला लागतं, कदाचित गावाचं महत्त्वही वाटेनासे होते. मात्र, संजय काटकर अतिरिक्त जिल्हाधिकारी, मुंबई यांनी आपल्या गावाची नाळ तोडलेली नाही. काळ्या मातीशी असलेले नाते अधिकारी पदावर गेल्यावरही जपले आहे, ते अधिकाधिक दृढ केले आहे. सुट्टीमध्ये ते नित्यनियमाने गावी येतात. परिवार आप्तजनांची सुखदु:ख जाणून, समजून घेतात. गावातील लोकसंख्या २५००, त्यापैकी काटकर कुटुंबाची लोकसंख्या ७५० ते ८००. काटकर परिवारातील कन्या महाराष्ट्राच्या विविध जिल्ह्यांत सुखाने नांदत आहेत. मात्र, विधवा स्त्रियांचा प्रश्न संजय काटकर यांच्या मनाला खूप त्रास देत होता.

या दिवाळीच्या आधीपासूनच त्यांच्या मनात विचार आला की, या वर्षी आपण सामूहिक भाऊबीज सर्व परिवार एकत्र येऊन साजरी करायची आणि त्यांनी आपला मानस बांद्रा येथील आपले बंधू उपजिल्हाधिकारी राजेश काटकर, अभियंता शेषराव काटकर, सामाजिक कार्यकर्त्या मनीषा व सुनिता काटकर, पत्रकार अशोक काटकर, डॉ. उषा काटकर, सरपंच अनुसया काटकर, पंचायत समिती सदस्य भिकाजी काटकर, ग्रामपंचायत सदस्य गणेश काटकर, माजी पं.स. उपसभापती (हिंगोली) रमेश काटकर, माजी सरपंच कोंडिबा काटकर व समस्त काटकर परिवाराला बोलून दाखवला. सर्वांनी या कन्या मेळाव्याला व सामूहिक भाऊबिजेला दुजोरा दिला. संजय काटकर यांच्या शेतात या मेळाव्याचे आयोजन करायचे ठरले. हे काम वाटते तितके सोपे नव्हते. सर्वप्रथम परिवारातील लग्न झालेल्या मुलींची यादी तयार करण्यात आली. यादी तयार झाल्यानंतर त्या सर्वांना सहपरिवार आमंत्रण देण्याची धुरा पार पाडली ती विशाल काटकर, गोपाळ काटकर, आत्माराम काटकर, मयुर काटकर, व भैय्या काटकर यांनी. आमंत्रणपत्रिकेसह तब्बल ९२ बहिणींच्या घरी गाडीने जाऊन खास सहपरिवार अगत्याने येण्याची विनंती केली. महाराष्ट्रातले कित्येक जिल्हे यांनी पालथे घातले आपल्या बहिणींसाठी.

संजय काटकर यांनी या कन्या मेळाव्याच्या व सामूहिक भाऊबिजेच्या कार्यक्रमाची भूमिका विषद केली. ते म्हणाले की, महिलांच्या आर्थिक, सामाजिक व कौटुंबिक प्रश्नांची उकल करून त्यावर मार्गदर्शन करणे, विधवा स्त्रियांना समाजात आदराचे स्थान मिळावे, त्यांच्याकडे पाहण्याचा समाजाचा दृष्टिकोन बदलावा ही काळाची गरज आहे.

एकदाचा तो दिवस उजाडला. मेळाव्याची जय्यत तयारी झाली होती. विशेष म्हणजे ऐन वेळेला आलेला पाऊस व एसटीचा संप या महत्त्वाच्या संकटांवर मात करीत ९२ पैकी तब्बल ७२ पेक्षा जास्त बहिणी दुचाकी, रिक्षा व भाड्याने मिळेल त्या वाहनाने माहेरी आल्या. गावातील भावजयीसुद्धा आपल्या नणंदांचे स्वागत करण्याकरता उत्सुक होत्या. पावसामुळे ठिकाण बदलावे लागले, तरी कुठलीही गडबड न करता सगळा कार्यक्रम ठरल्याप्रमाणे शिस्तीत आणि

आनंदात पार पडला. यात वीस वर्षांची रेश्मा खाटमोडे ही लहानातील लहान ते नव्वद वर्षांच्या सुंदराबाई जाधव या अगदी गुडघ्यांच्या दुखण्यावर मात करीत, सर्वात मोठ्या बहिणीच्या रूपात सामील झाल्या होत्या. एरवी धार्मिक कार्यात कित्येक वेळी अपशकुन होऊ नये म्हणून विधवांना स्थान दिले जात नाही.

या कार्यक्रमात राजमाता जिजाऊ व छत्रपती शिवरायांच्या प्रतिमांचे पूजन विधवा बहिणींच्या हस्ते करून त्यांचा सन्मान करण्यात आला. बहिणींनी भाऊ व वडिलांना ओवाळले. इतकेच नव्हे तर आलेल्या माहेरवाशिणींचा सन्मान साडी–चोळी देऊन विधवा, सुना व सासूंच्या हस्ते करण्यात आला. कायम स्मरणात राहणाऱ्या या भाऊबिजेने जीवनाकडे बघण्याचा नवा सकारात्मक मार्गच दाखवला, असे मत व्यक्त केले गेले. ९० वर्षांच्या सुंदराबाई जाधव सद्‌गदित होऊन म्हणाल्या– 'सध्या माझे वय ९० वर्षे आहे. या ९० वर्षांत कधीही अशी भाऊबीज मी अनुभवली नव्हती.' सर्व परिवाराला सर्व राग, लोभ विसरून एका छताखाली बघून सगळ्यांच्या डोळ्यात आनंदाश्रू आले. यावेळी नगरपरिषद जुन्नरच्या मुख्याधिकारी डॉ. जयश्री काटकर, कणका येथील पहिली आचार्य–पदवीधारक माधुरी काटकर, इंजिनियरिंग पूर्ण झालेली जागृती काटकर, कोमल काटकर यांचा सत्कार करण्यात आला. या सामूहिक भाऊबिजेच्या कार्यक्रमाला एक हजारच्या वर गावकरी उपस्थित होते. उपजिल्हाधिकारी राजेश काटकर यांनी ९२ कुटुंबांतील मुलाबाळांचे शिक्षण व स्पर्धा–परीक्षांबाबत मार्गदर्शन आणि यासाठी आपण नेहमीच प्रयत्नशील राहू असे सूतोवाच केले.

सामाजिक कार्यकर्त्या मनिषा काटकर यांच्या भावना वेगळ्या होत्या. नव्या आशाआकांक्षा व उमेदीने जगण्यासाठी महिलांना सक्षम करण्याचे आव्हान करीत त्या आपल्या ओळखीच्या नातेवाईक, आप्तगण यांच्या अनुभवांचा लाभ घेत सर्वच महिलांनी आपआपल्या क्षेत्रात अग्रेसर होण्यास सांगितले.

पत्रकार अशोक काटकर यांनी शिक्षणाशिवाय तरणोपाय नाही. शिक्षणामुळे कुटुंबाच्या, गावाच्या आणि समाजाच्या समस्या चांगल्या पद्धतीने सोडवता येऊ शकतात, त्यामुळे प्रत्येकाने आपला कल लक्षात घेऊन त्या दृष्टीने शिक्षण घ्यावे असे त्यांनी मार्गदर्शन केले. पेशाने डॉक्टर असलेल्या उषा काटकर यांनी महिलांचे आरोग्यविषयक सामाजिक भान व चालीरीती याविषयी मार्गदर्शन केले. डॉ. विजय काटकर यांनी गाव, घर, परिसर यांची स्वच्छता तसेच प्रत्येक घरात शौचालय तयार करून त्याचा वापर करणे यामध्ये स्वतःसह गावाच्या आरोग्याचा विचार प्रत्येक महिलेने करणे गरजेचे आहे व चांगल्या आरोग्यामुळे कामाचा दर्जा वाढणार असल्याने स्वच्छतेचा मंत्र प्रत्येकाने जपावे, असे आव्हान त्यांनी केले. कार्यक्रमानंतर सुग्रास भोजनाचे आयोजन करण्यात आले होते. यामुळे शासनाच्या 'लेक वाचवा, लेक शिकवा' या अभियानाला गती मिळणार, गावात संघभावना वाढीस लागणार, बहिण–भावात प्रेमभावना वाढीस लागणार यात शंकाच नाही. असे उपक्रम इतर गावांनीही राबवावेत असे वाटते. एकीकडे संपत्तीसाठी, शेतीमातीसाठी बहीण–भावांचे मुडदे पडत असताना कणका या गावाने राबविलेला हा उपक्रम एक नवी दिशा देणारा ठरणार यात शंकाच नाही.

***गोपाल खाडे,*** *कारंजा लाड.*
*मोबाइल : ७७९८६९७३६९*

●●●

## पुरुषार्थाचा सिद्धांत..

जातीवाद तर जनुकातच भिनलाय
पाण्यातल्या क्षारासारखा.
जमातवादाचा मारक्या बैल पुष्ट केलाय
विखारी कार्यक्रमांची खुराक चारून.

अन्याय तर पदोपदीच
मुक्कामी गांजर गवतासारखा.
व्यवस्थेचा ढिम्म दगड साधा हलतही नाही
जीवानिशीच्या आघातांनंतर...

तरीही लाचारीकडे प्रस्थान करवणारे
पुल उद्ध्वस्त केलेच पाहिजेत
निद्रस्त व्यवस्थेच्या कानाजवळ
शंखनाद केलाच पाहिजे.

बाहूतील बळावरच अवलंबून नसतो
पुरुषार्थाचा सिद्धांत.

***श्रीकांत संजय राऊत,***
*मुर्तिजापूर जि.अकोला.*
*मोबाइल ७७०९०६६४७२*

●●●

# अनपेक्षित देणगी

कल्याणी गाडगीळ

सगळे जगच एका अनपेक्षित मोठ्या संकटातून ४-६ महिन्यांचा अखंड झगडा करून आता कुठे जरा पूर्वपदावर येऊ पाहत होतं. देश पुढारलेले असोत वा प्रगतिशील, हजारो संख्येने लोक मेले होते. घराबाहेर न पडण्याचे आदेश मोठमोठ्या शहरातून दिले जात होते. उत्पादनच नाही, तर विक्री कुठून होणार आणि विक्री नाही, तर संपत्ती कुठून येणार, हे एक आर्थिक संकटही खूपच प्रकर्षाने जाणवू लागले. करोनाच्या विषाणूंनी जीवन-मृत्यूचा मांडलेला खेळ आता जरा आटोक्यात येऊन प्रतिबंधात्मक लशींची निर्मिती होऊन जग जरा हुश्श म्हणू पाहत होते.

नव्याने अनेक गोष्टींची सुरुवात करायला हवीच होती. गेलेल्यांविषयीची खंत मनात नक्कीच होती; पण पोटापाण्याचा प्रश्न सोडवण्यासाठी काहीतरी करायलाच हवे होते. याच वेळी अत्यंत संवेदनशील असलेल्या म्युनिसिपल कॉर्पोरेशनमधील स्वच्छता प्रमुख अधिकारी श्री. मानेसाहेब यांनी या कठीण काळात अजिबात न कंटाळता स्वच्छतेचे काम करणाऱ्या कामगारांचे जाहीर कौतुक करण्यासाठी सभा बोलावली होती.

जेव्हा लोक जनसंपर्क टाळण्यासाठी घरात बसून होते, घरून काम करीत होते, एक-दोन तासांच्या फिरण्याची मुभा असलेल्या काळात दूध, भाजीपाला, किराणा-सामान घरी घेऊन येत होते. त्या काळात ऐन उकाड्याच्या दिवसातही हे स्वच्छता कामगार- स्त्रिया, तरुण व पुरुष सकाळी सहा वाजल्यापासून रस्तेसफाईच्या कामात मग्न होते. मोठमोठ्या खराट्याने रस्ते झाडून, पानांचा पडलेला कचरा, झाडांच्या गळून पडलेल्या फांद्या, कुत्र्या-मांजरांनी केलेली घाण मोठ्या ड्रममध्ये भरत होते, ते ड्रम मोठ्या पेट्यांत ओतत होते व मोठ्या पेट्यांतून भरलेला कचरा मोकळ्या ट्रकमधून उचलून आणून त्याचे ढोबळमानाने विलगीकरण करून ते कचऱ्यासाठी केलेल्या खड्ड्यात नेऊन टाकत होते. शहरातले रस्ते कधी नव्हे इतके स्वच्छ दिसू लागले होते. आणि याचे सगळे श्रेय या कामगारांनाच होते.

याच वेळी नगरपालिकेने ज्यांना कुणाला या संकटकाळी कामासाठी व कामगारांसाठी मदत म्हणून काही दान करायची इच्छा असेल त्यांच्यासाठी ठिकठिकाणी दानपेट्याही निर्माण केल्या होत्या. निर्बंध उठल्यावर अनेक नागरिकांनी १० रुपयांसारख्या किरकोळ रकमेपासून ते हजारो रुपयांपर्यंतचे दानही या पेट्यांमधून केले होते. या सगळ्याचे जाहीर कौतुक करून पुढच्या आव्हानाला तयार राहण्यासाठी व त्यांचे मानसिक धैर्य वाढविण्यासाठी मानेसाहेबांनी सहकाऱ्यांशी चर्चा करून ही सभा आज बोलावली होती. या कार्यक्रमासाठी मुख्यमंत्र्यांनीही वेळात वेळ काढून येण्याचे कबूल केले होते. त्यामुळे कार्यक्रमाच्या जागी एकूण खूपच उत्साही वातावरण दिसत होते.

ठरल्या वेळेला मुख्यमंत्री आले. त्यांच्याबरोबरचे काही नगरसेवकही आले. या मोठ्या संकटातून सहीसलामत सुटल्याबद्दल रीतसर देवाची प्रार्थना होऊन कार्यक्रम सुरू झाला. मानेसाहेबांनी भाषणाला सुरुवात केली. ''या संकटकाळात घराबाहेर पडणे महाकठीण होते. डॉक्टर, नर्सेस, अधिकारी, मुख्यमंत्री एवढेच नव्हे, तर पंतप्रधानांनीसुद्धा घर न सोडण्याविषयी सतत आवाहने केली होती. पण या स्वच्छता कामगारांना घराबाहेर पडून स्वच्छता करणे हेच त्यांचे काम होते व त्यांचे काम ही सर्व समाजासाठी एक अत्यावश्यक गोष्ट होती. ती त्यांनी मनोभावे पार

पाडली. त्यांचे आभार मानावे तितके थोडेच आहेत. त्यांच्या या अतुलनीय सेवेसंबंधी थोड्याच दिवसात पंतप्रधानांकडून खास आर्थिक बक्षिसे दिली जाणार असल्याचे खात्रीपूर्वक समजले आहे. त्याआधी या क्षणी आपण पुष्पवृष्टी करून या सर्व स्वच्छता कामगारांचे कौतुक करूयात.''

हे म्हणताक्षणी जिथे कामगार लोक बसले होते, तिथे हॉलमधील वर बांधलेल्या गुलाब पुष्पांच्या पाकळ्यांचे मोठमोठे पुडके त्यांच्यावर पुष्पवृष्टी करू लागले. गुलाबाच्या वासाने, टाळ्यांच्या कडकडाटाने, आनंदित हसऱ्या चेहऱ्यांनी वातावरण दुमदुमून गेले. मानेसाहेबांनी शेजारी बसलेल्या मुख्यमंत्र्यांना चार शब्द बोलण्याची विनंती केली. त्यांनी खरोखरच मोजक्या शब्दात या गुणी कामगारांचे कौतुक करून भाषण आटोपते घेतले. मानेसाहेबांनी त्यांच्या हाताखाली काम करणाऱ्या सौ. भिसेबाईंना चार शब्द बोलण्यासाठी पाचारण केले.

भिसेबाई पुढे आल्या. त्यांचा चेहरा अत्यंत समंजस व भावूक. ऑफिसमध्येही अत्यंत प्रेमळ, मितभाषी; पण कामाच्या बाबतीत कोणतीही हयगय खपवून न घेणाऱ्या म्हणून त्यांचा नावलौकिक होता. आपली खाजगी बाब, शंका, अडचणी सोडवून घ्यायला सगळे कर्मचारी हक्काने त्यांच्याकडे येत व त्या त्यातून योग्य तो मार्ग काढून देत. भिसेबाईंना खास वेगळे काय सांगायचे असेल, अशी सर्वांनाच उत्सुकता लागली.

''सर्व मान्यवर, उपस्थित सहकर्मचारी व त्यांचे प्रेमळ कुटुंबीय यांना इथे पाहून मला खूप आनंद झाला. गेल्या काही काळात आपण सर्वांनीच कधी न कल्पिलेल्या संकटाचा सामना केला. अनेकांचे जीव व जिवलग गेले. पण आपण पुन्हा नेहमीच्या आयुष्याला भिडण्यासाठी तयारीला लागलो आहोत. तुम्ही सर्व स्वच्छता कामगारांनी केलेल्या कामाचे कौतुक करण्यासाठी माझ्याकडे पुरेसे शब्द नाहीत. तुमची कामावरील ही श्रद्धा पाहून मला भरून येते. हीच बाब मदतीसाठी केलेल्या हाकेला आलेल्या उत्तरासंबंधी. समाजातून अक्षरश: दोन रुपयाच्या नाण्यापासून ते शंभर–पाचशेच्या नोटांपर्यंत लोकांनी स्वेच्छेने हजारो रुपयांची मदत केली. त्याबद्दल सर्वांचे मनापासून आभार. हा निधी आता योग्य त्या कारणासाठी वापरला जाणार आहे. सगळ्या कामगारांना महानगरपालिकेकडून उत्तम कामगिरीबद्दल प्रशस्तिपत्रके दिली जाणार आहेत. ती या आठवड्यात सर्वांना दिली जातील. शिवाय, आर्थिक बक्षिसांसंबंधी मानेसाहेबांनी पंतप्रधानांच्या योजनेविषयी उल्लेख केलेलाच होता. मला आता लक्ष्मुबाई सरवटे यांना स्टेजवर बोलावून त्यांचा सत्कार करायचा आहे.''

या लक्ष्मुबाई कोण आणि त्यांचा सत्कार कशासाठी? सगळ्यांनाच कुतूहल वाटत होते. थोड्याच वेळात जरा वाकलेल्या नऊवारी साडी नेसलेल्या व कपाळावर मोठे कुंकू लावलेल्या एक बाई स्टेजच्या दिशेने जाताना सर्वांनी पाहिल्या. हात देऊन भिसेबाईंनी त्यांना वर घेतले. डोक्यावर घेतलेला पदर आता तोंडावर हाताने गच्च धरून लक्ष्मुबाई उभ्या राहिल्या होत्या. त्यांना बसण्यासाठी खुर्ची पुढे करताच लाजून त्या जमिनीवरच बसू लागल्या. शेवटी त्यांना जास्त लाजायला न लावता भिसे बाईंनी त्यांच्या हातात एक मोठी काचेची फ्रेम दिली व ती सर्वांना दाखवण्याची विनंती केली. लक्ष्मुबाईंनी ती डोक्यावर क्षणभर धरली व पुन्हा खाली मानेने त्या तोंडावर पदर घेऊन उभ्या राहिल्या. भिसेबाईंनी सर्वांना टाळ्या वाजवायला सांगितल्या व लक्ष्मुबाईंना पुन्हा प्रेक्षागृहात नेऊन बसवायला आपल्या मदतनिसाला विनंती केली.

प्रेक्षकांना त्या फ्रेमचे कोडे अजून


### आम्ही एकत्र, आमची एकजूट

**सामाजिक परिवर्तनासाठी या साऱ्यांची भूमिका एकच आहे.**
**म्हणून आम्ही एकत्र आहोत हातात हात घालून**

**अक्षरस्पर्श ग्रंथालय :** ०२०-२५४२४९१५,
**नारी समता मंच :** ०२०-२४४७३११६,
**साथ-साथ विवाह अभ्यास मंडळ :** ९४२२०८९१२१,
**सखी साऱ्याजणी** (सखी मंडळाचं नवं नाव) : ०२०-२४५३८७६३,
आणि **मिळून साऱ्याजणी :** ७४४७४४९६६४
अशा आमच्या पाच संस्था/संघटना म्हणजे एका मनगटातून उगवलेली पाच बोटं. आणि त्याला फुटलेलं सहावं बोट म्हणजे,
**पुरुष उवाच** – ०२०-२५६५२३२४.

**अमेरिकेत मराठी स्त्रियांसाठी हेल्पलाईन – मैत्रिण**
अमेरिकेत कुणी मराठी स्त्री अडचणीत असेल तर ती मदत मागू शकते.
तेथील संपर्क :
सुनीता धुमाळे २०३ ६९५ ९९५१ (हा नंबर टोल फ्री नाही)

उलगडले नव्हतेच. त्यासाठी भिसेबाई पुन्हा उभ्या राहिल्या. ''लोक हो, लक्षुंबाईंना तुम्ही आत्ताच पाहिलेत. याही आमच्याकडे स्वच्छता कामगार म्हणून गेली तीस वर्षे अविरत काम करीत आहेत. घरी मुले, नातवंडे सगळे आहेत. कोणतेही व्यसन नसलेले कुटुंब व कष्टाळू कुटुंबीय यांमध्ये ही स्त्री सुखी आहे. कधीही कोणत्याही गरजेसाठी आजवर माझ्याकडे कधीही त्या आल्या नव्हत्या. पण गेल्या महिन्यात मात्र मला भेटण्याची त्यांनी विनंती केली. मी त्यांच्याशी जुजबी बोलले व मला भेटण्यामागचे कारण विचारले तेव्हा त्यांनी मला मदत म्हणून काहीतरी द्यायचे आहे, असे सांगितले. तशा वयस्कर झालेल्या स्त्रीकडून खरे तर माझी काहीच अपेक्षा नव्हती. पण त्यांची इच्छा ऐकून मी दानपेटीकडे त्यांचे लक्ष वेधले. त्यांनी लाजून तोंडावर पदर घेतला व नाही मला दुसरेच काहीतरी द्यायचे आहे, असे सांगितले. मी काय? असे विचारताच त्यांनी हातामागे दडवलेला एक भलाभक्कम खराटा माझ्यापुढे केला. हे काय? मी विचारले तेव्हा त्या उत्तरल्या, 'अमी किनई रस्त्यावर लै ठिकाणी पडलेल्या, टाकलेल्या नारळाच्या झावळ्या घरी आनून त्यातल्या काड्या काढूनश्यान त्याचे खराटे बनिवतो. लै साल आमचा ह्यो धंदा चालू हाय. लोक आमच्याकडून ह्ये झाडू इकत घेत्यात. माझ्या संसारातून पैक्याने तुम्हाला मदत करण्याची माझी लै विच्छा व्हती. पण माझ्या हाती दमडी येईल व रोजच्या भाजीभाकरीतून ती वाचल तेव्हा खरी. म्हणून मी एक युगत काढली. तुम्हाला हा झाडूच द्यायचा. ह्ये पहा बाई इकला तर त्याचे ८० रुपये सहज येत्याल. हीच माझी तुम्हाला मदत.' तिचा तो खराटा पाहून मला अक्षरश: भडभडून आले. तिची दानाची इच्छा मला कळली व तिचे थोर हृदय पाहून मी भारावून गेले. म्हणून आज तुम्हा सर्वांसमोर तिने करोनाकाळात केलेल्या कामाचे तर अफाट कौतुक वाटलेच; पण तिच्या दातृत्वाने मी अवाक् झाले. आज या कार्यक्रमाच्या निमित्ताने ह्या महिलेचे आपणा सर्वांना दर्शन व्हावे ही इच्छा तर होतीच; पण अशा गुणी माणसांचे प्रशस्तिपत्रक देऊन केलेले कौतुक लक्षुंबाईनाच नव्हे तर त्यांच्या घरात येणाऱ्या जाणाऱ्या सर्वांनाच दिसावे व त्यातून आपणही कार्यशील व्हावे ही कळकळीची इच्छा होती. त्यासाठी थांबल्याबद्दल तुम्हा सर्वांची मी आभारी आहे.''

भिसेबाईंचे बोलणे संपले होते. सगळे प्रेक्षागृह अवाक झालेले होते. अनेकांचे डोळे पाणावले होते. कार्यक्रम लगेच आटोपला आणि पाहता पाहता लक्षुंबाईंच्या पायावर डोके टेकण्यासाठी लोकांनी ही गर्दी केली.

***कल्याणी गाडगीळ,*** *पुणे.*
*मोबाईल : ९७६७५९९९३७*

●●●

---

(पान ४५ वरून)

व्हायची. मग साठवणुकीला ठेवून द्यायची. पण याच मोहफुलांच्या विक्रीतून गूळ-चहा आणला जाई. पाडव्याला पोळ्यांचा नैवेद्य करायला सामान याच मोहफुलांमुळे घरी येई. पेप्सीवाला, आईस्क्रीमवाला आला, तर मुले मोहफुले विकून पैसे आणीत. बर्फाचा गोळा खात. खाऊ खात.

गावातला वाणी अशी किरकोळ मोहफुले खरेदी करायचा. मग कधीतरी एखादा व्यापारी टेम्पो घेऊन रात्री येई नि पोत्यांनी भरलेली मोहफुले घेऊन जायचा.

आम्हा मुलांना ही मोहफुले आर्थिक उत्पन्नाचा स्रोत वाटे. प्रत्येक मुलाचा मोहफुलांमध्ये वाटा असे. ही माझी मोहा, ही माझी असं म्हणत हक्क सांगितला जाई. आई-बाबा हौसेने मोबदला देत. मग मुले मनापासून मोहफुले वेचायचं काम करायची.

काही मुले याच पैशातून दुसऱ्या वर्षाच्या वह्या-पुस्तकांची तजवीज करीत. कोणी कपडे शिवत. कोणी चपला घेई तर कोणी यात्रेत मजा करी. काही मुले मोहफुले राखायला जातांना सोबत शाळेचे पुस्तक घेऊन जात. अभ्यास करत. जनावर दिसलं, तर हाकलायला उठायचं. पुन्हा अभ्यासात मग्न होऊन जायचे. अशा मुलांचा आदर्श गावभर सांगितला जायचा. मग आम्हीही नवनीत घेऊन जायचो. पण पानभर वाचून होईपर्यंत एखादी गाय टोपलीभर मोहफुले खायची. दोन्हीकडे लक्ष देणे जमायचं नाही. अभ्यास करता आला नाही; पण काम करता-करता अभ्यास करणाऱ्या सवंगड्याचे आदर्श कायम नजरेसमोर ठेवले. या सोबत्यांचे कष्ट वाया गेले नाहीत. आज मोहरान कमी झालंय. झाडे तोडली गेली आहेत. मोहफुलांचा व्यापार थंडावलाय. एक-एक मोहफूल उन्हं खात वेचणे मूर्खपणाचे मानले जातेय. कमीपणाचे मानले जात आहे. तरी मोहफुले गळतात. त्यांचा मोहक नि मादकपणा मनात रिचून गेलाय. काही जुनी मोहाची झाडे पाहिली की, त्यांच्या सहवासातले दिवस आठवतात, सवंगड्याचे आयुष्य आठवते नि मोहफुलेसुद्धा.


प्रादेशिक शब्द :
१. भोगुळ : वाळलेल्या पानांचा ढीग.
२. पाला : पानगळ झालेली वाळलेली पाने.
३. पंजा : वाळलेली पाने, गवत गोळा करायचे साधन (लोखंडी सळीपासून बनवलेले).

***यशवंत तुकाराम सुरोशे***
*मु.महाज, पो.धसई, ता.मुरबाड, जि.ठाणे*
*मोबाइल : ९६२३१६९४०३*

●●●

**डायनॉसोरचे वंशज ।दिनानाथ मनोहर**

प्रकाशक : समकालीन प्रकाशन,पुणे । किंमत : रु. २५०/- । पृष्ठसंख्या : १८४




दिनानाथ मनोहर हे नाव, आज जे वाचक साठीत आहेत, त्यांना लख्खकन एका अत्यंत प्रभावी अशा कादंबरीची आठवण करून देते. एकोणीसशे पंचाहत्तर सालची– 'रोबो' नावाची अस्तित्ववादाच्या धाग्याने विणलेली, 'रोबो' बनणे ही पूर्वअट असलेल्या सैन्यदलातील एका संवेदनशील अशा युवकाची होणारी जीवघेणी घुसमट व्यक्त करणारी विलक्षण कादंबरी. त्यांचाच 'डायनॉसोरचे वंशज' हा विज्ञान कथासंग्रह.

विज्ञान कथा मराठीत रुजवल्या त्या दि.बा.मोकाशी, बाळ फोंडके, निरंजन घाटे आणि अर्थात, या वेळच्या मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड झालेल्या आदरणीय जयंत नारळीकर यांनी. आता त्यात दिनानाथ मनोहर यांनी भर घातली आहे.

कथा आणि कादंबरी यातली सीमारेषा हा नेहमीच समीक्षकांचा कुतूहलाचा आणि वादाचा विषय राहिला आहे. कथा तिच्या सीमित कक्षेत एखादा पैलू चमकदार–भेदक रीतीने कसा आणते त्यावर तिची कसोटी ठरते. मोपासा, चेकॉव्ह आणि सॉमरसेट मॉम या कथाकारांनी अनेक वेळा धक्कादायक शेवट अतिशय समर्थपणे वापरला. दीनानाथ मनोहर लेखक जवळपास या सर्व कथांमध्ये याच तंत्राचा वापर करतात. आज जगात माहितीचा विस्फोट झाला आहे. आणि विज्ञान कथेत नवीन धक्का काय आणावा हा आजच्या विज्ञानलेखकापुढे मोठा यक्षप्रश्न आहे. त्यामुळे निश्चितच काही वाचकाना खूप काही मोठा धक्का बसला नाही, तरी कथेच्या मांडणीमुळे ती आकर्षक ठेवण्यात दिनानाथ मनोहर यशस्वी झाले आहेत यात शंका नाही.

दिनानाथ मनोहर या दहापैकी बहुतेक कथांमध्ये, आपल्या प्रतिभेच्या गोलामध्ये विज्ञानाचे भविष्य बघण्यात यशस्वी झाले आहेत. आज कुतूहलाच्या सीमेवर असलेले– कॉम्प्युटर, मेंदू विज्ञान, टेस्टट्यूब बेबी असे भविष्यवेधी कल्पनास्थित वैज्ञानिक वास्तवाचे संभाव्य चित्र ते समर्थपणे उभे करतात. तर काही कथांमध्ये ते भूतकाळात असलेल्या संस्कृतीशी धागा जोडतात. एखाद्या कथेत उत्क्रांतीचा सिद्धान्त वापरतात. तर अजून एखाद्या कथेत वैज्ञानिक प्रयोगपद्धतीचा वापर करतात.

पण विज्ञानकथेचा लेखक हा फक्त विज्ञान कल्पनांची चमत्कृतीजन्य जंत्री करत नसतो. कथा तेव्हाच जन्म घेते, निबंध न राहता कथा होते, जेव्हा त्या कथेत माणूस जिवंतपणे उतरतो. या सर्व कथांमध्ये माणसे त्यांच्या गूढ अशा स्वभावधर्मासह आणि बारकाव्यासह उतरली आहेत. कथानायक–नायिकेचे भावविश्व सहजपणे वाचकाला कवेत घेते. त्याला परकाया प्रवेश करायला भाग पाडते. मूल्यव्यवस्था हे भावविश्वाइतकेच कोणत्याही साहित्याचे मूळ अंग असते. ही मूल्यव्यवस्था अतिशय सहजपणे या कथांमध्ये वावरते. मग ती साध्यसाधन संघर्षाची असो, जग बदलायला निघालेल्या वेड्या राक्षसी धुंदीची असो – अगतिक हुंकारातून विनाश जवळ करणारी असो किंवा भावनिक घुसमट असो. दिनानाथ मनोहरांची सामाजिक नाळ सहजपणे वाचकाला कॉर्पोरेट बिझनेस विश्वात घेऊन जाते, त्यांची पात्र भूतकाळाच्या पानांशी वीण जोडून आजचा श्वास घेतात. क्वचित आदिवासी–नागरी असे कंगोरे सहजतेने आणि तरलतेने घासले जातात.

कुणाही लेखकाचे यश असते ते त्या त्या पात्राचे नैसर्गिक वाटण्यात. इतर कोणत्याही चांगल्या पुस्तकात घडते तसेच समर्थपणे इथेही घडते. लेखक बोलत असतो त्याच्या पात्रांच्या मुखातून. पण वाचकाला हा बोलणारा लेखक न दिसणे आणि पात्ररूपी जिवंत व्यक्ती समोर हाडामांसासह उभी आहे असे वाटणे, हा लेखकाच्या यशाचा मानदंड या कथासंग्रहात अनुभवायला येतो. वाचक स्थळकाळ विसरतो आणि पुस्तकाच्या द्विमितीय कागदातून चतुर्मितीय भासमय जगात सहज प्रदार्पण करतो. नव्हे कधी कधी अनेक मितीय जगाच्या अद्भुत अशा जगातसुद्धा!

विज्ञान कल्पनेची झेप, भावभावनांचा जिवंत स्पर्श हे तर हवेच; पण तेवढंच पुरेस नसते. कथा दर्जेदार होण्यात लेखकाने केलेली कारागिरी महत्त्वाची असते. कादंबरी ही विस्तीर्ण असल्यामुळे, कादंबरीसाठी प्लॉट असतो हे वाचक सहजपणे समजू शकतो; पण कथेतही तो असतोच. भाषा ओघवती असणे, पात्राच्या आजूबाजूचा भवताल उभा होणे, बेतलेला शेवट समोर ठेवून जरी कथेची सुरुवात केली असली तरी ती वाचकाला अजिबात न जाणवणे, सुरुवात आणि शेवटामधल्या प्रवाहाची नागमोडी वळणे, चकवे, अडथळे आणि प्रवाही ओढ असणे हे सगळ चांगल्या कथेची भट्टी जमण्यासाठी आवश्यक असते. ती भट्टीसुद्धा या कथासंग्रहात जमली आहे.


वेगाने लिखित भाषा हे माध्यम कालबाह्य होत आहे. दृश्यमाध्यम पगडा घेत आहे. अशा या एका संक्रमणाच्या काळात भाषा दृश्यमय असणे हे वाचकाने हातातला मोबाईल सोडून पुस्तक जवळ करण्यासाठी अत्यावश्यक झाले आहे. हे आव्हानसुद्धा लेखकाने सहज पेलले आहे.

नक्कीच एक लक्षणीय विज्ञानकथेचे पुस्तक वाचकांची वाट बघत आहे. या पुस्तकाचे वाचक स्वागत करतील अशी आशा वाटते.

***अरुण गद्रे**, पुणे*

●●●

# पटेली : बंडखोर सौंदर्यशास्त्र आणि समकालीन अस्तित्व शोधाचा प्रवास



**पटेली । अविनाश उषा वसंत**

प्रकाशक : ललित पब्लिकेशन,मुंबई । किंमत : रु.२५०/- । पृष्ठसंख्या : १९६

'पटेली' प्रकाशित होऊन आठ महिने झालेत आणि या आठ महिन्यात समाजमाध्यमांवर वेब पोर्टलवर 'पटेली'बद्दल भरपूर लिखाण झालं आहे. म्हणजे अनेक तरुण वाचकांनी यावर भरभरून लिहिलं आहे. तसेच काहींनी समीक्षाही केली आहे. पुण्यात तिच्यावर महत्त्वाचा परिसंवाद देखील झाला. पटेली संदर्भात लेखकाच्या विविध पोर्टलवर मुलाखती झाल्या आहेत. पटेली काय आहे? 'पटेली' सध्याच्या काळातली एक वेगळी कांदबरी आहे. काही तिला नवे बंडखोर सौंदर्यशास्त्र म्हणतात. तर काहीजण महानगरीय जीवन जाणिवांचा जीवनपट म्हणतात.

'पटेली' हा शब्द अनेकांना लक्षात येणार नाही, पटेली म्हणजे बोलघेवडेपणा किंवा चतुरपणाने बोलणे वागणे होय. पटेली हा बंबया बोलीतील एक शब्द आहे. मुंबईतील लुंपेन वर्गाच्या बोलीतील हा शब्द आहे. कादंबरीचं कथानक उलगडतं मुंबईमधील गिरणगावच्या चाळ संस्कृतीभवती व त्या चाळीत राहणाऱ्या नायकाभवती. १९८२च्या संपानंतर जी पडझड गिरणगावात झाली, याचे परिणाम दिसतात. भांडवली व्यवस्थेत विषमतेच्या दरीत एका दबलेल्या कष्टकरी वर्गातून येणाऱ्या तरुणांना स्वत:ला सिद्ध करण्यासाठी, एका वर्गातून दुसऱ्या वर्गात जाण्यासाठी पटेली म्हणजे चतुरपणा करावा लागतो. त्यामुळे पटेली हे नाव कादंबरीला योग्य ठरतं. पटेलीचं मुखपृष्ठ बोलकं आणि सुंदर आहे. मागच्या साइडपासून पुढपर्यंत गिरणगावातील चाळ दिसते व बंद पडलेल्या कापड गिरणींची चिमणी आहे. अंधार दाटून आलाय आणि या अंधारात मागे मोठाले स्कायस्क्रॅपर उभे आहेत, ज्यांनी गिरणगावाला गिळंकृत केलं आहे. पुढे बल्बच्या प्रकाशात कॅरमचे चित्र चाळीचे सांस्कृतिक चित्रण सांगणार आहे.

असं काय आहे यात ज्याने लोक पटेलीकडे आकर्षित झाले. विशेषतः ती तरुण वर्गाच्या पसंतीला उतरत आहे. यामध्ये फक्त कादंबरीच्या कथानकाचा व त्यातील आशयसूत्राच्या मुद्द्यापुरते मर्यादित मी बघत नाही, तर त्या अनुषगांने आजूबाजूचं सामाजिक, साहित्यिक विश्व ढवळून निघण्याकडे ही पाहत आहे. त्याकडे ही बघायला लागेल. पटेली प्रकाशित होण्याआधी तिचे छोटे टिझर समाज माध्यमांवर टाकले होते, ते ही छान झालेले, ते नीट ऐकून समजून घेऊनच कादंबरी मागवली होती. अशा प्रकारे वाचकांपर्यंत पुस्तक पोचवण्याची आयडिया भारी वाटली. कादंबरीमध्ये अर्पण पत्रिका, प्रस्तावना नाही. डायरेक्ट सुरुवात. पटेलीचं प्रकाशन मुंबई मराठी ग्रंथ संग्रहालयाच्या पायरीवर ३ जानेवारीला सावित्रीमाईंच्या जन्मदिनी साध्या पद्धतीने झालं. त्या पायरीला विशेष असा काही विद्रोही इतिहास आहे. प्रकाशन गिरणी कामगारांच्या प्रश्नावर काम करणाऱ्या महत्त्वाच्या कार्यकर्त्याकडून झालं. हे सर्वच बोलकं आणि अर्थपूर्ण आहे. त्यामागे विचार आहे तो समजण्यासाठी या इतर गोष्टींचा उल्लेख केला. असं अनेक प्रकारे वेगळेपण आजच्या काळात पटेलीने जपलं आहे.

'पटेली' ही कथा आहे- समुद्र नावाच्या गिरणगावच्या चाळीत राहणाऱ्या पस्तिशीतील बहुजन तरुणाची जो आयटीमध्ये काम करतो. पण त्याला साहित्याची आवड आहे. हा नायक तरुणपणांतील गोष्टींनंतर स्वत:ला काय पाहिजे हे शोधत जातो. त्याच्या आयुष्यात मुख्य स्त्रिया आहेत त्या म्हणजे ऊर्जा, गजल आणि हेमा. या तिघींचा समुद्रवर जीव आहे; पण त्या कुठेच स्वतःला त्याच्यासाठी गमावत नाहीत. तिघीही सक्षम, बंडखोर स्त्रिया वाटतात, त्या त्यांच्या आयुष्याचे निर्णय स्वतः घेतात, व त्या निर्णयांची जबाबदारी ही स्वतः घेतात. उलट, वेळोवेळी नायकामधील पुरुषीपणावर बोट दाखवतात. चाळीतील अनेक पात्रं, तिथलं त्यांचं एकमेकांसोबतच वावरणं हे चाळीची संस्कृती दाखवणारं आहे. समुद्र, ऊर्जा आणि गजल ही समर्पक नाव आहेत. अनेक ठिकाणी समुद्रची संवेदनशीलता दिसून येते. यात गावाशी जोडल्या असण्याचा उल्लेख, वर्णन आहे; पण गाव की शहर हा वाद इथे नाही. तो आत्मशोधाचा प्रवास आहे. म्हणजे एकीकडे चंगळवादी व्यवस्थेत व्यक्तीचं तुटलेपण, विखुरलेपण आहे ते नात्यांमध्येही दिसतं; पण मानवी स्वभाव, वर्तन दाखवताना कुठेही आततायीपणा वाटत नाही.

चाळ, सार्वजनिक संडास, सार्वजनिक नळ, एकत्र सण साजरे करणं हे समूह पातळीवरचं जगणं आनंद आणि त्रास देणारं, फेसबुक किती जवळचं आणि आयुष्यावर परिणाम करणारं माध्यम आजकालच्या मुला-मुलींसाठी बनलं आहे, हे

ठळकपणे दिसतं. बाकी मुंबईची ठिकाणं, चाळ, यांची वर्णन ते शेती, भाषा, सिनेमा सामाजिक काम, गिरणी कामगार, संघटना, पॉलिटिकल पार्टी आणि यांवरच पॉलिटिकल टिप्पणी आणि स्वतःचा शोधावरचे लिखाणही यात वाचायला मिळते. काही गोष्टींची नेणिवेच्या पातळ्यांवर किती सवय झालेली असते, वेगळी दृष्टी मिळाली की खडबडून जागं झाल्यासारखं वाटतं, असे अनेक प्रसंग वेगळा दृष्टिकोन देणारे पटेलीमध्ये आहेत.

पटेलीची सुरुवातच तिच्या सौंदर्यशास्त्राची जाणीव करून देणारी आहेत. म्हणजे कॉमन संडासापासून सुरुवात आहे. याच संडासात बसून आपल्याला जगाचे विचार सुचत असतात. तसंच काहीसं आध्यात्मिक पहिल्याच पानावर लेखक मांडतो. पहिल्या पाच पानांत तुमचा इंटरेस्ट वाढतो व तुम्हाला लक्षात येतं ही महत्त्वाची कादंबरी आहे.
कादंबरीमधील सगळ्यात महत्त्वाची व वैशिष्ट्य जपणारी बाब म्हणजे तिची भाषा. लेखक भाषेबद्दल विद्रोही मत मांडत नाही, तर प्रत्यक्ष तशी भाषा वापरून तो विद्रोह दाखवतो. आपण ज्याप्रकारे विचार करतो मनात किंवा बोलतो तेव्हा व्याकरणाचा विचार करत नाही तो विचार लिखाणातही लेखक करत नाही. त्याचं व्यक्त होणं नैसर्गिक वाटतं. अनेक ठिकाणी लिखाणातले संदर्भ समजून घ्यावे लागतात. ते करण्यात मजा आहे. आणि हे प्रमाण भाषा व बोली भाषा यात फरक करून भाषा शुद्धतेचा आग्रह धरणाऱ्या, शिवराळ भाषा यांवर नाक मुरडणाऱ्या लोकांना विविध अंगाने चॅलेंज करणारी पटेलीची भाषा आहे. लेखक अनेक साचे, ठोकताळे नाकारतो ते फक्त दाखवण्यापुरतं नाही, तर त्याच्या मागे काहीतरी विचार आहे. पटेलीचा ढाचा कादंबरीचा असला, तरी लेखक एका मुलाखतीत तिला कथात्मक अभिव्यक्ती म्हणतो.

पटेलीतील सर्वच पात्रं ही हळूहळू पुढे सरकत विकसित होत गेलीत, त्यांच्या त्यांच्या पातळीवर म्हणून ती सक्षम होत जातं, अस्तित्वाच्या शोधात सक्षमपणे निर्णय घेतात. आजची उत्तराधुनिक जगण्यातील विशेषतः तरुणांच्या तुटलेपणाच्या, विखुरलेपणाच्या जाणिवा पटेलीत दिसतात. आजची पिढी लादलेलं, वाट्याला आलेलं स्वीकारून जगायला तयार नाही, हेच अधोरेखित होतं. त्यांची स्वतःला शोधण्याची प्रक्रिया तीव्र होत जाणारी आहे. त्याला विविध आयाम आहेत. महत्त्वाचा, चंगळवादाचा आणि जुन्याच विषम रूढी परंपरामधून बाहेर पडण्याच्या संघर्षाचा. या सगळ्यात महत्त्वाचा आहे कादंबरीच सौंदर्य ज्याला समाजात घाण किंवा गलिच्छ समजलं जातं ते नेमकं कुठून येतं! ज्या प्रकारच्या लोकांना, भाषेला असं समजलं जातं, ही समज कशी बनते तर संस्कृतीतून आणि साहित्य हे महत्त्वाचं माध्यम आहे हे दाखवणारं, त्याबरोबर समाजात संस्कृती रुजवणारं. त्यामुळे पटेली समजून घ्यावी लागते.

सामाजिक कामात असल्यामुळे यातील सामाजिक, राजकीय भाष्य यांनी मला विचार करायला भाग पाडलं. अनेक ठिकाणी जात, वर्ग, लिंगभेद याचे संदर्भही असे आहेत की, याला अनेक अर्थांनी बंडखोर म्हणावं लागतं. समाजात ज्या ब्राह्मणी जात वर्गाने स्वतःचे वर्चस्व राखले आणि त्या अनुषंगाने संस्कृतीचंही वर्चस्व जपलं. इतरांना वगळून तुच्छ लेखून जी संस्कृती जपली आहे, त्याला साहित्य ही अपवाद नसणार म्हणून पटेली जी आजच्या तरुण पिढीचं, त्यांच्या जगाचं वर्णन करते ती फक्त अस्तित्व शोधापुरती मर्यादित बघून चालणार नाही किंवा तिला फक्त वेगळा प्रयोग म्हणता येणार नाही. तो एक आवाज आहे ब्राह्मणी जातिव्यवस्था व भांडवलशाही विरुद्धचा. उत्तर आधुनिक काळात चंगळवादी व्यवस्थेत कुचंबित झालेल्या; पण तरी काहीतरी करू पाहणाऱ्या तरुणाईचा.

मुंबई तुम्ही पहिली नसेल तरी सार्वजनिक ठिकाण, बाहेर खाण फिरणं हे सगळे एन्जॉय करतात. अनेक ठिकाणांना सामाजिक अर्थ आहे. लेखक राजकीय टिप्पणी करतो समाजाबद्दल, साहित्याबद्दल; पण समुद्र म्हणून चाळीतील तरुण नायक प्रामाणिकपणे दाखवतो तो पॉलिटिकली करेक्ट राहून लोकांची मर्जी सांभाळत नाही, तर तो प्रामाणिकपणे स्वतःला शोधायचा प्रयत्न करतो. या प्रवासात त्याचं साथीदार असणारं फेसबुक हे पात्र आहे, ज्या समाजमाध्यमावर तो सतत व्यक्त होत राहतो. मनात असंख्य विचार येतात ते विचार विषयाशी जोडलेले आहेत. कठडा, वगळ, वेग हे असे आहेत. एक आयुष्य असतं जे प्रत्यक्ष जगत असतो आणि सोशल मीडियामुळे virtual जगात ही डोकावत असतो आणि आपल्याला वाटतं की हे वेगवेगळं आहे ते एकत्रित होऊन त्याचा खूप परिणाम आपल्या आयुष्यावर होतो हे पटेलीत दिसतं. पटेलीची आणि तुमची व्हेन डायग्राम होऊ शकते, ज्यात तुम्ही स्वतःला रिलेट करू शकता. मुंबईत न राहणाऱ्या शहरात राहणाऱ्या किंवा गावातल्याही तरुण व ज्यांना भेदभाव व वगळण्या विरुद्धचा विद्रोह महत्त्वाचा वाटतो अशांना नक्कीच आवडणारी कादंबरी आहे. जरूर वाचा.

***प्रिया रुपाली सुभाष***, *पुणे*
*ppriyars22@gmail.com*

●●●

## बोलकं पत्र

गीताली,

मी इथे ओझर नाशिकला आहे. घराबाहेरचं जग सध्या अजिबात दिसत नाही. परिचित, नातेवाईक यांच्यापैकी जवळजवळ सगळ्यांच्या घरात कोरोना पेशंट आहेत. जवळचे लोक बघता बघता सोडून चाललेत. त्यामुळे जीव सलामत ठेवणे एवढी एकच जबाबदारी सध्या पार पाडत आहोत.

तरीही आमच्याकडे असणाऱ्या मदतनीस सोनी शिंदे हिला मी सगळी कामं झाल्यावर जुन्या अंकातले काही लेख वाचून दाखवते. तिच्याही घरी सध्या कोरोना अनुषंगिक पडझड आहे; पण विरंगुळा म्हणून का होईना (आणि म्हाताऱ्या पेशंटचं मन कसं मोडावं म्हणून, असं तीच दीपालीजवळ म्हणाली होती... ते 'म्हाताऱ्या' म्हटल्याची सल मनातच दाबली मी आपली.) ती माझं वाचन ऐकून घेत असते.

नुकत्याच झालेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीच्या आधीचा आमचा संवाद...

सोनी : आजी, मी उद्या लवकर जानार. बाबासायबांची जैंती हाय.

मी : छानच. काय काय करणार उद्या?

सोनी : मरण्या कोरोनामुळं कुटं काय करता आजी? निसती बत्ती लावनार आनि अंगनातच डीजे लावून नाचनार. नायतर लय मज्जा आस्ती. सगळ्या वाडीतली मान्सं येत्यात. मोटमोटे लोकंबी दारू पिऊन आसले नाचत्यात का नई ! आत्ता कुटलं काय?

मला बसलेला धक्का न दाखवता–

मी : सोनी, बाबासाहेबांनी काय शिकवलं माहीत आहे ना? त्यांनी ...

सोनी : तेंनी एकत्र यायला सागितलं आज्जी. येत्यातच की समदी एकत्र.

मी : तसं एकत्र नाही. संघटित व्हा म्हणजे एकी करा. आपापसात भांडू नका. आणि दारू पिऊन नाचा असं नाही शिकवलं.

सोनी : मला जसं आटवतं का न्हाई आजी, तसं तर आशीच करतात जैंती. आम्हाला वंदना बी करावी लागती पन मोबाईलमदी बगून म्हंतो.

मी : ती पाठ नाही?

सोनी : टाईमच नाय भ्येटत आजी. लोकाची कामं कवा करावी आन् वंदना कवा पाठ करावी?

एकंदरित मला सोनी ही अशा लोकांची प्रतिनिधी वाटली की, जी अजूनही बाबासाहेबांच्या शिकवणुकीपासून लांब आहेत. पोट भरण्यासाठी काबाड करूनच जिंदगी संपते. सोनीचे वडील व्यसनापायीच बरबाद झाले. आई आणि मुली डिफेन्समध्ये मेड सर्वंट म्हणून कामं करत राहिल्या.

सरकारी योजना सगळ्याच यांच्यापर्यंत पोचलेल्या नाहीत. जातीपाती, अंधश्रद्धा आणि इथेही असलेली व्यसनासक्त पुरुषप्रधानता बघून आता समाज बदलत चालला आहे, हा माझा फुगा फटकन फुटला आहे.

मी मिसाच्या अंकातले लेख सोनीला वाचून दाखवले. बाबासाहेबांबद्दल मला माहीत आसलेली सगळी माहिती सांगितली.

'पुढच्या वर्षी जैंती आजीनी सांगितली तशी करनार', असं तिने म्हटलं तेव्हा 'आजीनी' या शब्दाची मी 'बाबासाहेबांनी आणि मिसानी' अशी दुरुस्ती लगेचच केली.

जुने अंक ती कुतूहलाने चाळते. वाचायला जमत नाही. मी निवडक लेख, कथा वाचून दाखवते.

घनघोर अंधारात मिणमिण पणती लावण्याचा हा प्रयत्न आहे. सोनी एकटीच भेटू शकते. सध्या कोणालाच कोणाकडे जाता येत नाही. तेव्हा सोनीच्या मैत्रिणींपर्यंत पोचणं अवघड. शिवाय डिफेन्समधले अधिकाऱ्यांच्यासाठी असलेले कडक निर्बंध. यामुळे मला मनात असूनही इतकंच जमतं आहे.

तुम्हा सगळ्यांच्या पोस्ट वाचून मला अपराधी वाटलं की, मला भरीव काम काही करता येत नाही.

पण सोनीच्या चेहऱ्यावर दिसणारा 'समजल्याचा' भाव मला दिलासा देऊन गेला.

तुमची सगळ्यांची धडपड कौतुकास्पद आहे.

***वैशाली पंडित,** मालवण*
*मिळून साऱ्याजणी प्रतिनिधी*

●●●

---

'मिळून साऱ्याजणी'चा जुलै २०२१ चा अंक आणि मुखपृष्ठ आवडले. नीलिमा शिकारखाने यांच्या निर्मितीची जबाबदारी या लेखातून छपाई क्षेत्राची माहिती मिळाली. शाळा–महाविद्यालय, खासगी ग्रंथालये यातील कलात्मक शिक्षण–व्यवसायातील कर्तव्यनिष्ठा याची माहिती मिळाली. रेऊ कथा स्पर्धेतील पारितोषिक प्राप्त कथा पावसातील माणूस आवडली. डिजिटल युगात वावरताना त्याला अनुषंगाने असलेला कौमुदी अमीन यांचा लेख आवडला. इतर लेख आणि कविताही नेहमीप्रमाणे छान आहेत.

***समीर कुलकर्णी,** कोल्हापूर*

●●●

'मिळून साऱ्याजणी'चं सामाजिक पालकत्व

# बालकांचे हक्क आणि सामाजिक पालकत्व

क्रांती अग्निहोत्री – डबीर

**'मिळून साऱ्याजणीचं सामाजिक पालकत्व' या विशेष विभागात सामाजिक पालकत्वाच्या बहुविध पैलूंचा सविस्तर आढावा घेतला जाणार आहे. पण पालकत्व, पालक यांविषयी तपशिलात जाण्यापूर्वी बालक आणि बालकांचे हक्क व अधिकार यांची माहिती घेऊयात.**

'सामाजिक पालकत्व' या संकल्पनेचा विचार केला तर या संकल्पनेचा 'वसुधैव कुटुंबकम्' व 'हे विश्वची माझे घर' इतक्या व्यापक पातळीवर त्याचा विचार व्हायला हवा असे वाटते. समाजातील प्रत्येक घटकाने फक्त स्वत:च्या पाल्याची जबाबदारी न मानता जगभरातील बालकांबाबत संवेदनशीलपणे विचार करत त्यांचे सर्वांगीण हित जपत, बालकांच्या हक्कांचे उल्लंघन करणार नाही व होऊ देणार नाही यासाठी कटिबद्ध असणे गरजेचे आहे.

बालकांचे जन्मजात हक्क घोषित करणारा जाहिरनामा संयुक्त राष्ट्रांनी २० नोव्हेंबर १९५९ रोजी प्रसूत केला. जगातील सर्व बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांना समृद्ध आणि सुखी जीवन मिळावे हा या जाहीरनाम्याचा प्रमुख उद्देश आहे.

संयुक्त राष्ट्रसंघाने केलेल्या मानवी हक्कांच्या वैश्विक घोषणेनुसार प्रत्येक व्यक्ती सर्व मानवी हक्क व स्वातंत्र्य मिळवण्यास पात्र आहेत. यात लिंग, वर्ण, जात, धर्म, भाषा, मालमत्ता, प्रांत, राजकीय अथवा इतर मतप्रवाह या आधारावर कोणत्याही प्रकारच्या भेदभाव व त्यानुसार विचार–वर्तन यांना स्थान नसेल. बालकांना 'स्वतंत्र व्यक्ती' म्हणून बघितले जावे त्याच बरोबर 'बालक' म्हणून त्यांना येणाऱ्या मर्यादाही लक्षात घेतल्या पाहिजेत. शारीरिक व मानसिक अपरिपक्वतेमुळे बालकांसाठी अधिक काळजी, संगोपन व संरक्षणाची आवश्यकता असते.

१९८९ मध्ये संयुक्त राष्ट्र संघाने 'बालक हक्कांची सनद' बनवली व या अंतरराष्ट्रीय करारावर स्वाक्षरी करत भारताने ११ डिसेंबर, १९९२ रोजी मंजुरी दिली. ज्याद्वारे भारत या कराराच्या अंलबजावणीसाठी कायदेशीररीत्या बांधील आहे. भारतात ० ते १८ या वयोगटातील मुले व मुली कायदेशीरदृष्ट्या 'बालक' या कक्षेत येतात.

**बालक हक्कांचा ठराव –**

बालकाला समृद्ध बाल्य लाभावे, स्वतः साठी तसेच समाजाच्या भल्याकरताही त्याला सर्व अधिकार व स्वातंत्र्य उपलब्ध करण्यात यावे; त्याचप्रमाणे पालक, ऐच्छिक संघटना, स्थानिक संघटना, राष्ट्रीय सरकारे यांनी बालकांच्या हक्कांची जाणीव लक्षात घेऊन त्यांचे विधिवत पालन करावे.

**बाल हक्कांचा जाहीरनामा प्रामुख्याने चार मूलभूत तत्त्वांवर आधारित आहे :**

बालक हक्कांच्या जाहिरनाम्यात समाविष्ट केलेले सर्व हक्क प्रत्येक बालकाला, जात, वर्ण, लिंग, भाषा, धर्म, राजकीय वा अन्य मतप्रणाली, राष्ट्रीयत्व अथवा आर्थिक स्थिती यांचा विचार न करता मिळावयास हवेत.

१. कुठल्याही प्रकारच्या भेदभाव व हिंसेपासून बालकांच्या संरक्षणाचा हक्क –

अ) बालकाला सर्वप्रथम संरक्षण व साहाय्य मिळणे आवश्यक आहे. बालकाच्या गरजेप्रमाणे विशेष संरक्षण मिळावे.

ब) क्रूरता, पिळवणूक व दुर्लक्ष या सर्व प्रकारांपासून बालकाला संरक्षण मिळावयास हवे. त्याचा कोणत्याही प्रकाराने अपव्यापार करण्यात येऊ नये. किमान वयोमर्यादेपर्यंत बालकाला नोकरीवर वा कामास ठेवू नये, त्याचप्रमाणे त्याच्या जीविताला हानी वा धोका संभवेल अशा कोणत्याही अनारोग्यकारक व्यवसायात त्याला गुंतवू नये.

क) जातीय, धार्मिक वा अन्य प्रकारचा भेदभाव उत्पन्न करणाऱ्या प्रवृत्तींपासून बालकाचे रक्षण केले पाहिजे.

२. कुठल्याही परिस्थितीत बालकाचे सर्वोत्कृष्ट हित महत्त्वाचे व ते जपले जाण्याचा हक्क –

अ) जन्मापासून बालकाला नाव व

राष्ट्रीयत्व मिळण्याचा हक्क आहे.

ब) शारीरिक, मानसिक किंवा सामाजिकदृष्ट्या अपंग असलेल्या बालकाला विशेष प्रकारची वागणूक, शिक्षण देण्यात येऊन त्याची विशेष प्रकारची काळजी घेण्यात यावी.

क) बालकाच्या पूर्ण व सुसंवादी व्यक्तिम त्त्वाच्या विकासार्थ त्याला प्रेम व सलोखा यांची गरज असते. कोवळ्या वयातील बालकाला, अत्यंत अपवादात्मक परिस्थिती वगळता, त्याच्या मातेपासून दूर करू नये. अनाथ व निराधार बालकांची विशेष काळजी वाहणे आणि त्यांना आधार देणे, हे

समाजाचे व शासनाचे कर्तव्य ठरते.

३. बालकाचा गुणवत्तापूर्ण जीवन जगण्याचा व विकासाचा हक्क –

अ) बालकाचा शारीरिक, मानसिक, नैतिक, आध्यात्मिक व सामाजिक दृष्टीने विकास होऊ शकेल, अशा संधी–सुविधा त्याला कायद्याने वा अन्य मार्गांनी उपलब्ध करावयास हव्यात.

ब) बालकाला मोफत व सक्तीचे किमान प्राथमिक शिक्षण मिळणे आवश्यक आहे.

४. बालकाचा स्वत:च्या आयुष्यातील निर्णयांबाबत सहभागाचा हक्क –

अ) बालकाचे सामर्थ्य वाढेल, त्याच्या निर्णायक बुद्धीचा विकास होऊन त्याच्या ठायी नैतिक व सामाजिक जबाबदारीची जाणीव निर्माण होईल आणि समाजाला त्याचा उपयोग होईल, अशा प्रकारचे शिक्षण बालकाला उपलब्ध करावयास हवे.

ब) बालकाला सामाजिक सुरक्षेचे सर्व लाभ मिळावयास हवेत.

सामाजिक पालकत्वाच्या अनुषंगाने चर्चा करायची झाली, तर अर्थातच प्रत्येकाचा निरनिराळा दृष्टिकोन असू शकतो. मी – माझी मुले व त्यांची जबाबदारी या पलीकडे जास्त विचार करण्याची परवानगी सध्या असलेली कोविड परिस्थिती, त्यातून आलेल्या मर्यादा आणि तयार झालेली असुरक्षित मानसिकता देत नाही, असे अनेकांना वाटू शकते. तसेच 'सामाजिक पालकत्व' म्हणजे 'आर्थिक मदत' केली की 'जबाबदारी उचलली' असेही बऱ्याचदा वाटते. या पलीकडे आम्ही आणखी काय करू शकतो? असा प्रश्न अनेकदा विचारला जातो. बालकांच्या सोबत किंवा त्यांच्यासाठी काम करताना बऱ्याचदा मर्यादा पडतात.

आपल्या मुलांसोबत जगताना तसेच समाजातील बालकांसोबत वावरताना, वर उल्लेखलेल्या बालकांच्या चारही हक्कांचा विचार आपल्या जवळपासही फिरकत नाही. कारण बालकांचे असे काही हक्क – अधिकार आहेत या बाबत जाणीव आणि माहिती दोन्ही नसते. त्यामुळे बऱ्याचदा सजग पालकत्व म्हणजेच सामाजिक पालकत्व असे वाटू शकते. माझ्या पाल्यांना मी एक 'सुजाण नागरिक' बनवेन हे सजग पालकत्व हे सामाजिक पालकत्व या व्यापक संकल्पनेचा एक भाग आहे.

सजग पालकत्वामध्ये आपल्या पाल्याचे संगोपन अधिक सजगतेने, संवेदनशीलपणे करण्याची गरज सध्याच्या काळात पालकांना जाणवते आहे. गेले दीड वर्ष करोना साथीच्या काळात चोवीस तास आपल्या मुलांबरोबर राहिल्यामुळे मुलांच्या शाळा, अभ्यास, घरातल्या कामांच्या जबाबदाऱ्या आणि घरातूनच चालणारे १८ ते २० तासाचे ऑफिस या कसरतीतून जाताना बालकांना सतत (चार भिंतीत) कसे व्यग्र ठेवायचे, त्यांचे मन कुठे रमेल, नवीन काय शिकता, शिकवता येईल, आपले पाल्य मागे तर पडणार नाही ना, या धास्तीत पालक जगताना दिसतात. जगण्याच्या या शर्यतीत पळताना स्वत:च्या व मुलांच्या आर्थिक–भावनिक गरजांना पालक इतके मेटाकुटीला येत आहेत की, अनेकदा बालकांबाबत आपल्याच घरात, आजूबाजूच्या भवतालात घडणाऱ्या, दिसणाऱ्या अप्रिय घटना, निर्माण झालेली अवघड– गुंतागुंतीची परिस्थिती याकडे कधी नकळत, तर कधी जाणीवपूर्वक दुर्लक्ष केले जाते. कधी 'माझ्या मुलाचा तर हा प्रश्न नाही ना', असा दिलासा स्वत:ला देत तर कधी 'दुसऱ्याच्या प्रश्नांमध्ये आपण कशाला नाक खुपसा!' असे म्हणत अंतर्मनात जागृत झालेली जबाबदारी 'खाजगीपणाच्या' नावाखाली जाणीवपूर्वक दाबून टाकली जाते. यात प्रौढांच्या मनोव्यापाराचा मोठा भाग असतो; पण बालककेंद्रित दृष्टिकोनाचा संपूर्णत: अभाव असतो.

बालककेंद्रित दृष्टिकोन म्हणजे नक्की काय हे समजून घेताना, बालकांचे हक्क कोणते आहेत, त्यांची आवश्यकता का पडली इ. इ. समजून घेणे तसेच मी म ाझ्या बालकावर कळत नकळत अन्याय, भेदभाव तर करत नाही ना? हा प्रश्न वारंवार स्वत:ला विचारणे आणि असे बरेच प्रश्न सतत विचारत राहणे जसे की, मी माझ्या पाल्यांना वाढवताना त्यांच्या हक्कांकडे संवेदनशीलपणे पाहतो का? माझ्या मुलांना शिस्तीच्या नावाखाली मारहाण तर करत नाही ना? माझ्या मुलांकडे मी एक 'स्वतंत्र व्यक्ती' म्हणून बघतो–बघते की मालकी हक्काने बघतो–बघते? माझे मूल घरात असुरक्षित तर नाही ना? माझ्या मुलांच्या हक्कांचे उल्लंघन पालक म्हणून मी करत तर नाही ना? व या सर्व प्रश्नांची जर 'हो' अशी उत्तरे आली तर त्याचे आपण समर्थन करतो का? या सगळ्या गंभीर प्रश्नांमध्ये दडलेला आहे. मूल जर स्वत:च्या घरात असुरक्षित असेल, त्याला पालकांच्या अपूर्ण स्वप्नांची 'पूर्तता' करण्याचे साधन म्हणून बघितले जात असेल, कौटुंबिक हिंसा, व्यसनाधीनता अशा ताणतणावाच्या वातावरणात बालक राहत असेल तर कुटुंबांमध्येही बालककेंद्रित, जबाबदार व सजग पालकत्व किती शक्य आहे?

सरकारी यंत्रणा, शाळांमध्ये काम

करणारे शिक्षक, इतर कर्मचारी वर्ग, पोलीस, बाल हक्कांसाठी काम करणारे कार्यकर्ते यांचा स्वत:च्या मुलांपलीकडे समाजातील इतर बालकांशीही संपर्क येतच असतो व ते ही काही प्रमाणात कळत नकळत सामाजिक पालकत्वाची भूमिका बजावत असतात तरीही बालकांची सुरक्षितता धोक्यात आहे, त्यांच्या हक्कांची पायमल्ली सहज होताना दिसते व त्याची जाणीव ना पालकांना असते, ना बालकांसाठी काम करणाऱ्या यंत्रणांना असते.

स्त्री लिंगी गर्भपात, मुलींप्रती केला जाणारा भेदभाव, रस्त्यावर भीक मागणारी बालके, आपल्याच घरात अथवा घराबाहेर हिंसेला अथवा लैंगिक अत्याचारांना बळी पडणारी बालके, बालविवाह, चोरी, दरोडे, तस्करी, खून यासाठी केला जाणारा बालकांचा वापर अशी आणखी अनेक उदाहरणं सांगता येतील जिथे सामाजिक पालकत्वाची नितांत गरज आहे.

सामाजिक पालकत्वात नेहमीच 'बालकहित' केंद्रस्थानी असते. सामाजिक पालकत्व फक्त आपल्याच पाल्यांच्या हिताचा विचार न करता आजूबाजूच्या पर्यावरणात राहणाऱ्या सर्वच बालकांचे हित जपणे, त्यांचे रक्षण करणे, त्यांचावर होणाऱ्या भेदभावांबद्दल संवेदनशीलता बाळगणे व आवश्यक तेव्हा न कचरता योग्य ती कार्यवाही करणे यासाठी सजग असते.

***क्रांती अग्निहोत्री-डबीर,*** *पुणे*

*krantianant@gmail.com*

●●●

# मानस-शास्त्रीय दृष्टिकोनातून पालकत्व

रोहिणी पाटील

आजकाल पालकत्व या शब्दाला प्रचंड वलय निर्माण झाले आहे. त्यामध्ये काही अती जागरूक, जागरूक आणि अती निष्क्रिय असेही पालक आहेत. सजग पालकत्वही काळाची गरज आहे; पण अती जागरूक आणि अती निष्क्रिय दोन्हीही पाल्याच्या नैतिक विकासाच्या (moral development) दृष्टीने घातक ठरू शकतात. पालक ही भूमिका वेगवेगळ्या अडथळ्यांना व वेगवेगळ्या टप्प्यांवर पार करत, पूर्ण करण्याचा प्रयत्न करत असतात.

वैयक्तिक भान (स्व-भान) व सामाजिक भान हे 'परस्परपूरक व परस्परावलंबी' आहे. स्व-भान हे व्यक्तिकेंद्रित असते आणि सामाजिक भान हे समाजातील विविध घटकांची, घटनांची 'जबाबदारी घेण्याची वृत्ती' व त्याचबरोबर 'कर्तव्याची जाणीव' असणारे असते. व्यक्तिमत्त्वाचा विकास कुटुंबापासून सुरू होतो व समाजात विकसित होतो.

प्रत्येक व्यक्तीची मूल्यव्यवस्था, जगाकडे पाहण्याचा दृष्टिकोन, रीतिरिवाज, जीवनशैली या त्याच्या 'संस्कृतीचा भाग' असतात. स्व-उन्नती बरोबरच सामाजिक उन्नतीसाठीही प्रयत्न करायला हवेत जेव्हा अशा प्रकारचे समाजभान आपण स्वतःमध्ये व पाल्यामध्ये रुजवण्यात यशस्वी झालो, तर आपला समाज सुदृढ, सशक्त, समजून व सामावून घेणारा, संवेदनशील असणारा, सहवेदना जाणणारा, सहजाणीव असणारा, आस्था निर्माण करणारा असेल.

'व्यक्तीचा विकास' हा वेगवेगळ्या घटकांवर व टप्प्यांवर होत असतो. व्यक्तीचा 'नैतिक विकास' हा खूप निकडीचा व गरजेचा आहे. व्यक्तिमत्त्व विकासामध्ये नेहमी सुधारणेला वाव असतो, तो बहुअंगांनी होत असतो. यामध्ये शारीरिक, मानसिक, बौद्धिक, सामाजिक, वर्तनानुसार, जीवनमूल्यांप्रती, मनोसामाजिक अशा पद्धतीने होत असतो; पण हा 'व्यक्तीचा विकास' नक्की कसा होतो, कोणकोणत्या घटकांवर अवलंबून असतो, या अनुषंगाने येणाऱ्या घटकांचे विवेचन व विचार, मानसशास्त्रीय दृष्टिकोनातून महत्त्वाचा असतो.

***रोहिणी पाटील***

*मनोचिकित्सक व समुपदेशक*

●●●

## छापता छापता ...

अखेर सत्याचा विजय झाला. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केंद्राचे तीन कृषी कायदे मागे घेण्याची घोषणा केली आहे. गेल्या वर्षभरापासून प्राण पणास लावून ऊन, वारा, पाऊस कशाचाही विचार न करता निष्ठेने व प्रभावीपणे आंदोलन करणारा, ज्यामध्ये अनेकांना आपले प्राणही गमवावे लागले.. असा अन्नदाता शेतकरी अखेर जिंकला. किसान चळवळीचा प्रचंड विजय असो.. किसान सभा आणि सर्व शेतकरी संघटनांचे तसंच आंदोलनाच्या समर्थकांचे मनःपूर्वक अभिनंदन. आंदोलनाच्या प्रक्रियेत प्राण गमवाव्या लागलेल्या सर्व शहीद किसानांना लाल सलाम..

# प्रतिनिधी यादी

**हे मासिकाचे विस्तारित कुटुंबच आहे. प्रतिनिधी म्हणजे मासिकाच्या विस्तारित कुटुंबाचे घटक. प्रतिनिधी विनामानधन काम करतात. आपणही 'साऱ्याजणी'च्या संदर्भातील कामासाठी त्यांच्याशी संपर्क साधू शकता. वर्गणीही देऊ शकता.**

**महाराष्ट्र प्रतिनिधी**
सरिता आवाड :
मो. ९८३३९८७५६८

**अहमदनगर**
प्रज्ञा हेन्द्रे–जोशी :
मो. ९८५००७५४४३

**अकोला**
दीप्ती जोशी :
फोन ०७२४/२४२१६१३
मो. ९४२३१५०५१५

**अमरावती**
शोभा रोकडे :
मो. ९९६०९३७७६९

**आंबेजोगाई**
अरुंधती पाटील :
मो. ९४२२७४४१६६

**औरंगाबाद**
सुलभा खंदारे :
मो. ९४२२२०११२१
प्रतिभा अहिरे :
मो. ९२८४१९६३०४,
७२१९१३१३६८

**बेळगाव**
मनीषा सुभेदार :
फोन. ०८३१/२४०३९३८
मो. ९३४२५४१८८६

**बीड**
हेमलता पाटील :
फोन. ०२४४२/२२२४२०
मो. ९८२२६३११४४

**बारामती**
सीमा गोसावी :
फो. ९८५०९३४३४२

**बार्शी**
भारती रेवडकर :
मो. ९६०४५१५५२३

**बुलडाणा**
नरेंद्र लांजेवार :
मो. ९४२२१८०४५१

**बेंगळुरू**
नीता जाधव :
मो. ०९८४५०६६१७३

**चाळीसगाव**
वैशाली निकम :
मो. ९४२१५१२५३३

**चंद्रपूर**
गीता देव्हारे–रापुरे :
मो. ९९७५३४९५५५

**दौंड**
अरुणा मोरे :
मो. ९८५००१४५७३

**गोवा(पणजी)**
उज्ज्वला आचरेकर :
मो. ०९४२११५७९४६

**हैदराबाद**
शुभांगी परळीकर :
मो. ९२९६०५०००२
फोन. ०४०/२४६०८५६६

**जळगाव**
शमा सुबोध :
मो. ९३७३०३५५३५

**कणकवली**
शमिता बिरमोळे :
फोन. ०२३६७–
२३२९०९/२३२५०७

**कऱ्हाड**
सविता मोहिते :
मो. ९८२२४०३७७१
(वेळ : सां ५ ते ६)

**कोल्हापूर**
उज्ज्वला हिरकुडे :
मो. ९८९०८३८६५५
समिक्षा फराकटे :
मो. ८००७१९०१०५

**इचलकरंजी, जि. कोल्हापूर**
प्रियंका म्हेत्रे :
मो. ७२४९८९२०८४

**पद्मानगर, लातूर**
शैलजा बरूरे :
मो. ९४२३७१४५३४

**महाबळेश्वर**
नीता भिसे :
मो. ९४२०७७१५४३

**मालगुंड**
अस्मिता रुग्गे :
फो. ०२३५७/२३५०१३
मो. ९६२३६९९१५४

**मुंबई**

**मालाड (प.)**
मीनाक्षी दादरावाला :
फो. ०२२/२८८२३२४९

**मुलुंड**
रजनी करंदीकर :
मो. ९८९२४७३३२७

**विलेपार्ले (पू.)**
विनिता हाटे :
फो. ०२२/२६१३०६४२
(वेळ : सायं. ८ नंतर)

**वाशी (नवी मुंबई)**
शरयू देशपांडे :
मो. ९३२५००१९६२

**मालवण**
वैशाली पंडित :
फोन ०२३६५/२५२९९२
मो. ९४२२०४३०२५

**नागपूर**
सुभाष तुलसीता :
मो. ९३७१५९९९२३
वर्षा पतके थोटे
(शब्दाली) :
मो. ७५५८४१९७६५

**नंदूरबार**
रामकृष्ण पाटील
मो. ९४०८८८५७७५

**नांदेड**
अनघा जोशी मुधोळकर :
मो. ९४२२४३४४४०

**नाशिक**
मेधा वैजापूरकर :
फोन ०२५३/२५३०१०३

**निपाणी**
शोभा तळेकर :
मो. ८३१७४६६३१५

**परभणी**
ज्योती चौंडे :
मो. ९०९६५०५१७६

**पुणे**
सुनीता भागवत
(स्वारगेट) :
मो. ९४२२३१०३७८
दीपा देशमुख
(बाणेर–बालेवाडी) :
मो. ९५४५५५५५४०
गौरी जानवेकर
(सिंहगड रोड) :
मो. ९८८१८८७५९०
मीरा कुलकर्णी (पाषाण) :
मो. ९४२२१८९२६४

**पुरंदर जि. पुणे**
अजरुद्दीन नदाफ :
मो. ९१३०५७६६९६

**सफाळे जि. पालघर**
स्वाती भोईर :
मो. ८१०८३२२३९९

**सातारा**
श्रीकांत के. टी. :
फोन ०२१६२/२३२०६०
मो. ९८२२०६४८००

**देऊर, जि. सातारा**
तरुजा भोसले :
मो. ९५६१०९३८३८

**सावंतवाडी**
अर्चना वझे :
फोन ०२३६३/२७२८२८

**शिंदखेडा, जि. धुळे**
संदीप गिरासे :
मो. ९४२३४९४५१५

**सोलापूर**
सरोजनी तमशेट्टी :
मो. ९९६०१०३२९४

**सांगली**
छायाश्री जाधव :
फोन ०२३३/२३७६८६१
मो. ९८६००४९८८०

**सांगली जिल्हा**
सोनिया कस्तुरे :
मो. ९३२६८१८३५४
नामदेव कस्तुरे :
मो. ९४२२४१०८५४

**तासगाव, जि. सांगली**
मिनल कुडाळकर :
मो. ९४२३८७२४१६

**सिंधुदुर्ग जिल्हा**
अर्पिता मुंबरकर :
मो. ९४२०२६११९६

**रिसोड, जि. वाशिम**
चाफेश्वर गांगवे :
मो. ९०९६६७५००१

**यवतमाळ**
आशा देशमुख :
मो. ९४२३४३६०४३
मंगला सरोदे : फोन
०७२३२/२४२८२९

## परदेशातील प्रतिनिधी

**VIDWANS SHAILA** :
10, Inverness Drive, Kendall Park, **NJ** 08824
Email : Shaila@vidwans.com

**ADITI KELKAR HATE :**
Flat no. 410, Burj I Nahada Tower, I Nahada 1, P. O. Box No. 341235 Dubai, **UAE.** PH. 971-4-2389467, Mobile- 971-56-1798331
Email : aditikelkar21@gmail.com

**DEVINA ASHISH DEVALEKAR :**
12, Bushnell place, Maidenhead. Post Code - SL65FD London. **UK.** Ph - 0044 7961099087.
Email - ddevalekar@yahoo.com

**JYOTI KANITKAR :**
13228 Stable Brook Way, **Herndon**, VA20171
Phone no : 703-478-2680
Email : jyoti@kanitkar.com

**खालील ठिकाणीही 'मिळून साऱ्याजणी'ची वर्गणी स्वीकारली जाईल.**
(१) हिराचंद नेमचंद वाचनालय : १३४, 'मुरारजी पेठ, सोलापूर – ४१३००१. फोन : २७२६६२०
(२) साधना : ४३०–३१, शनिवार पेठ, पुणे – फोन : २४४५९६३५

**आमचे वितरक :**
पूनम एजन्सी – २४४९४६६८, बी. डी. बागवे आणि कंपनी, मुंबई– २३८५७०१२

# साथी हाथ बढाना...

**ज्यांच्या सहकार्याशिवाय अंकाचं काम अशक्य आहे अशा सख्या आशा देशमुख, विद्या देवकर, सुनीता शिंदे आणि अनिता साळी यांच्या हस्ते ऑक्टोबर-नोव्हेंबर (जोडअंक)चं प्रकाशन करताना खूप आनंद होत आहे.**



विद्या देवकर



आशा देशमुख



सुनीता शिंदे आणि अनिता साळी


## ऑक्टोबर-नोव्हेंबर २०२१ (जोडअंक)चे प्रकाशन करताना



डावीकडून रसिका, मानसी, पूनम, आणि पूर्वा



प्रगती



जमीर



उत्पल आणि गीताली

**REGISTERED**
License to post without prepayment of postage No.: **WPP - 34**
RNI Regd.no. MAHMAR/2000/02001 Declaration No SDO/Pune City/ SR/11/2021
Postal Regd.No. PCW/043/2021-2023
Published & Posted on 01/12/2021
Posting at PSO, Pune GPO - 411001

# भारताचे संविधान
# उद्देशिका

**आम्ही भारताचे लोक, भारताचे एक सार्वभौम**
**समाजवादी धर्मनिरपेक्ष लोकशाही गणराज्य**
घडविण्याचा व त्याच्या सर्व नागरिकांस:
सामाजिक, आर्थिक व राजनैतिक **न्याय**;
विचार, अभिव्यक्ती, विश्वास, श्रद्धा;
व उपासना यांचे **स्वातंत्र्य**;
दर्जाची व संधीची **समानता**;
निश्चितपणे प्राप्त करून देण्याचा
आणि त्याच्या सर्वांमध्ये व्यक्तीची प्रतिष्ठा
व राष्ट्राची एकता आणि एकात्मता
यांचे आश्वासन देणारी **बंधुता**
प्रवर्धित करण्याचा संकल्पपूर्वक निर्धार करून;
**आमच्या संविधानसभेत**
आज दिनांक २६ नोव्हेंबर १९४९ रोजी
**याद्वारे हे संविधान अंगीकृत आणि अधिनियमित**
**करून स्वत:प्रत अर्पण करीत आहोत.**